Mrgabharti_75000

मार्च–एप्रिल २०२५/पाने ६८/किंमत ₹१०

# लोकराज्य



## भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष

Mrgabharti_75000

CMF

# मुख्यमंत्री फेलोशिप-२०२५

महाराष्ट्र शासन



## 'चला महाराष्ट्राच्या विकासासाठी एकत्र काम करूया'

**आजच अर्ज करा!**

### युवकांसाठी दुर्मिळ व अद्वितीय संधी

- महाराष्ट्र शासनासोबत काम
- राज्याच्या विकासात योगदान
- आयआयटी मुंबई यांचे प्रमाणपत्र
- विपुल ज्ञान आणि अनुभव

अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक ०५/०५/२०२५

अकॅडमिक पार्टनरः



अर्ज करण्यासाठी भेट द्या

https://mahades.maharashtra.gov.in/FELLOWSHIP

Helpline: 8411960005 | Email: cmfellowship-mah@gov.in

Mrgabharti_75000

## ६ सक्षम राष्ट्र उभे करण्याचा ध्यास...

महाराष्ट्राचा विकास म्हणजे भारताच्या प्रगतीत महत्त्वाचा वाटा आणि याच उद्देशाने आम्ही मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करत आहोत. भारताच्या विकसित वाटचालीत महाराष्ट्र आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रात मजबूत असला पाहिजे, यासाठी २०१४ पासून रचलेल्या पायावर आता इमारत उभी केली जात आहे. त्यातून एक सक्षम समाज, सक्षम नागरिक आणि सक्षम राष्ट्र उभे करण्याचा आमचा ध्यास आहे. **- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

## ८ विकासगतीला चालना!

औद्योगिक विकासात महाराष्ट्र आघाडीवर राहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात येईल, अशा तऱ्हेने या अर्थसंकल्पामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'मेक इन महाराष्ट्र'द्वारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण आखण्यात येणार आहे. **- एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**

## ९ महाराष्ट्र आता थांबणार नाही...

'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र' ही संकल्पना अर्थसंकल्पाचा मूळ गाभा असून वर्ष २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पपूर्तीच्या दिशेने महाराष्ट्राने टाकलेले आश्वासक पाऊल आहे. शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती, सर्वसमावेशक विकास या पाच प्रमुख क्षेत्रांवर अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही, विकास आता लांबणार नाही...' हा विश्वास या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला देण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री**

## ३० महिला उन्नतीची नवी दिशा

''समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महिला सबलीकरण अत्यावश्यक आहे. कारण समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासाशिवाय देशाचा संपूर्ण विकास शक्य नाही. महिलांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम केल्याशिवाय समृद्ध आणि संतुलित समाजाची निर्मिती होऊ शकत नाही. जर समाजाला प्रगती करायची असेल, तर महिलांचे सबलीकरण अनिवार्य आहे.''

## ४२ व्याघ्र संरक्षणातून वन संवर्धनाकडे...

''वनांचे महत्त्व ओळखून त्यांचे संरक्षण करून जागरूकता वाढविण्यासाठी २१ मार्च रोजी जागतिक वन दिवस साजरा केला जातो. जागतिक वन दिनाची या वर्षाची थीम वन आणि अन्न (Forests and Food) अशी आहे. अन्न सुरक्षा, पोषण आणि उपजीविकेमध्ये जंगलाचे महत्त्व अधोरेखित असून जंगले वाचली तरच मानवाला चांगले अन्न मिळू शकेल, त्यासाठी जंगलांचे संवर्धन व संरक्षण करणे आवश्यक आहे.''

## ६० अर्थक्रांतीची शाश्वत सूत्रे

''विद्यापीठे, पाश्चिमात्य शिक्षणाची ओळख, न्यायालयीन व प्रशासकीय स्वरूपाच्या आधुनिक संस्थांची उभारणी आणि इतर सुधारणेबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिशांचे आभारही मानतात; पण आर्थिक नीतीच्या बाबतीत ते स्पष्ट आणि निर्भीड बोलतात. भारताने इंग्लंडला अमाप दिले आहे आणि इंग्लंडकडून भारताला अक्षरशः काहीही मिळालेले नाही ही दोन्ही विधाने आश्चर्यकारक वाटतील; पण आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले तर त्यातील सत्यता निर्विवाद आहे.''


| | |
|---|---|
| सक्षम राष्ट्र उभे करण्याचा ध्यास... | ६ |
| विकासगतीला चालना! | ८ |
| महाराष्ट्र आता थांबणार नाही... | ९ |
| विकसित भारत, विकसित महाराष्ट्र! | ११-२५ |
| स्त्रीशक्तीचा प्रातिभिक आविष्कार | २६ |
| स्त्री शिक्षणाचा पाया... | २८ |
| महिला उन्नतीची नवी दिशा | ३० |
| महाराष्ट्राचे शिल्पकार! | ३२ |
| जलसंधारण : काळाची गरज | ३५ |
| पाण्याची गुंतवणूक! | ३७ |
| शाश्वत वने जीवसृष्टीचा आधार! | ४० |
| व्याघ्र संरक्षणातून वन संवर्धनाकडे... | ४२ |
| एक तरी अभंग अनुभवावा! | ४५ |
| श्रेष्ठ संविधानाचे निर्माते! | ४८ |
| बाबासाहेबांची जलनीती! | ५० |
| देणगी सुशासनाची! | ५३ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार | ५५ |
| पथिक नव्या वाटेचा! | ५८ |
| अलौकिक आणि दुर्मिळ | ६० |
| अर्थक्रांतीची शाश्वत सूत्रे | ६२ |
| अर्थशास्त्र, समाजशास्त्राला नवे परिमाण! | ६४ |

Mrgabharti 75000

वर्ष ७६ वे | अंक ३ | मार्च–एप्रिल २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — केशव करंदीकर
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा.लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई – ४०००११.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# शिल्पकार पद्मभूषण राम सुतार – एक अलौकिक प्रवास

भारताचा कला व सांस्कृतिक वारसा समृद्ध करण्यात महाराष्ट्राचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्राचे नाव विविध क्षेत्रांत मोठं करणाऱ्या दिग्गजांच्या यादीत मूळचे धुळ्याचे व सध्या दिल्लीलगत असलेल्या नोएडा शहरात वास्तव्यास असणारे जागतिक कीर्तीचे शिल्पकार पद्मभूषण राम सुतार हे नाव अढळ ताऱ्याप्रमाणे आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत घोषित केला. त्यांचे नाव अगोदरच गुजरातमधील केवडिया कॉलनीतील लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' या शिल्पामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चिले जात आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात महत्त्वाचा वाटा उचलणारे धुळ्याचे राम सुतार यांनी आपल्या अप्रतिम शिल्पकलेने जागतिक स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या कलाकृतींमध्ये संसदेच्या आवारातील महापुरुषांचे १६ पुतळे आणि विदेशात जवळपास ८० देशांमध्ये महात्मा गांधींसह इतर ३५० पुतळे उभारण्याची किमया या मराठी अवलिया शिल्पकाराने केली आहे.



लहानपणापासूनच चित्रकला व शिल्पकलेची आवड असलेल्या राम सुतार यांनी धुळ्यातील शिक्षक प्रशिक्षण संस्थेत आपली कला जोपासली. त्यांच्या शिक्षकांनी त्यांना महात्मा गांधींचे शिल्प तयार करण्याची पहिली संधी दिली आणि त्यांना मिळालेला १०० रुपयांचा मोबदला त्यांच्या शिल्पकलेतील प्रवासाची सुरुवात ठरला. त्यांनी मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेतला आणि प्रथम क्रमांकाने पदवी संपादन केली.

त्यांनी १९५४ ते १९५८ या कालावधीत वेरूळ व अजिंठा लेण्यांमधील शिल्पांच्या डागडुजीचे काम केले. पुढे दिल्लीतील केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयातील मिळालेली नोकरी स्वतंत्र कलाकृती घडवण्यासाठी त्यांनी सोडली. त्यांनी चंबळ नदीवरील गांधीसागर धरणासाठी ४५ फूट उंच चंबळदेवीचे शिल्प कोरले. ती कलाकृती पाहून पंडित नेहरूदेखील प्रभावित झाले होते.

सुतार यांनी देश-विदेशात जवळपास ३५० शिल्प उभारली. १८२ मीटर उंचीचा सरदार पटेलांचा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हा त्यांच्या शिल्पकलेचा सर्वोच्च शिखरबिंदू मानला जातो. त्यांचा मुलगा अनिल सुतार हादेखील या कलेत पारंगत असून, वडिलांकडून मिळालेला कलेचा वारसा पुढे घेऊन जात आहेत.

राम सुतार यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यात 'पद्मभूषण', 'पद्मश्री' आणि 'टागोर पुरस्कार' यांचा समावेश आहे. आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीला भोवऱ्याची उपमा देताना सुतार म्हणतात, 'भोवऱ्याला जसजशी उतरण मिळेल, तसतसा तो फिरत जातो, तसे माझ्याबाबतीत घडले आहे.' आजही ते आपल्या कलेशी एकनिष्ठ राहून नवनवीन शिल्प घडवण्यात व्यस्त आहेत.

Mrgabharti_75000

# शाश्वत व सर्वसमावेशक विकासाची रूपरेषा!

'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र' या संकल्पनेवर आधारित राज्याचा अर्थसंकल्प मार्च महिन्यात सादर करण्यात आला आहे. भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र व्हावे, असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प आहे. हा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी महाराष्ट्र आता थांबणार नाही... अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सरकारच्या स्थापनेच्या वेळी केली होती. 'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र' हे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी विकासचक्राला गती देणे आवश्यक असल्याने या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्याच्या शाश्वत व सर्वसमावेशक विकासाची रूपरेषा तयार करण्यात आली आहे. शेती व संलग्न क्षेत्र, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती, सर्वसमावेशक विकास या पाच प्रमुख क्षेत्रांवर अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रालयीन विभाग व क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा सात कलमी कृतिआराखडा तयार करण्यात आला आहे. नवीन पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी इनोव्हेशन सिटी, महिलांसाठी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अशा प्रकारची प्रगतीची विविध क्षेत्रे निर्माण करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुदी करण्यात आल्या आहेत.



*आम्हावरी खिळले डोळे, उद्याच्या पिढ्यांचे*
*आज स्वप्न बघतो आम्ही, उद्याच्या दिसांचे....*

अशा शब्दांत उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी या अर्थसंकल्पात पेरलेल्या स्वप्नांच्या अंकुरण्याची उमेद जागी केली. 'लोकराज्य'च्या या अंकात अर्थसंकल्पाची संपूर्ण माहिती वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांच्या भक्कम पायावर उभी असलेली आपली राज्यघटना जगातील श्रेष्ठ राज्यघटनांमध्ये गणली जाते. आपल्या या राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने लोकराज्यच्या मार्च-एप्रिल या जोडअंकात बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचे विविध पैलू जाणून घेता येणार आहेत. आपण स्वीकारलेल्या लोकशाही व्यवस्थेमध्ये सुशासनाशिवाय सामाजिक व आर्थिक परिवर्तन होणे शक्य नाही या आशयाचा 'देणगी सुशासनाची', 'डॉ. आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार', 'पथिक नव्या वाटेचा', 'अलौकिक आणि दुर्मिळ' या लेखांसोबतच अत्यंत कृतिशील पद्धतीने भारताला प्रथमच स्वतंत्र जल आणि ऊर्जाधोरण प्रदान करणाऱ्या 'बाबासाहेबांची जलनीती' अशा विविध लेखांचा समावेश या अंकात करण्यात आला आहे.

'लोकराज्य'च्या मार्च-एप्रिल २०२५ या जोडअंकाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला आम्ही विनम्र अभिवादन करीत आहोत.

यासोबतच मार्च महिन्यात झालेल्या जागतिक महिला दिनानिमित्त सावित्रीबाई फुले यांचे जीवन म्हणजे स्त्री शिक्षण, समाज सुधारणा, स्त्री सशक्तीकरण आणि समतेची प्रेरणादायी गाथा या आशयाचा 'स्त्री शिक्षणाचा पाया'; तसेच राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांच्या सहभागाने बहरलेल्या 'चौराहा' या काव्यवाचनाच्या कार्यक्रमाचा वृत्तांत, त्याचप्रमाणे मार्च महिन्यात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्ताने 'महाराष्ट्राचे शिल्पकार', 'जागतिक जल दिन', 'जागतिक वन दिन', संत तुकाराम बीजनिमित्ताने 'एक तरी अभंग अनुभवावा' अशा अनेकविध लेखांच्या माध्यमातून वाचनीय संग्रह या अंकात आहे.

'लोकराज्य'च्या इतर सर्व अंकांप्रमाणेच हा अंकही वाचकांना नक्कीच आवडेल, अशी आशा आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

Mrgabharti_75000

# सक्षम राष्ट्र उभे करण्याचा ध्यास...

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेला मूर्तस्वरूप देण्यासाठी महाराष्ट्राने मोठी जबाबदारी स्वीकारली आहे. महाराष्ट्राचा विकास म्हणजे भारताच्या प्रगतीत महत्त्वाचा वाटा आणि याच उद्देशाने आम्ही मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करत आहोत. भारताच्या विकसित वाटचालीत महाराष्ट्र आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि कृषी क्षेत्रात मजबूत असला पाहिजे, यासाठी २०१४ पासून रचलेल्या पायावर आता इमारत उभी केली जात आहे. त्यातून एक सक्षम समाज, सक्षम नागरिक आणि सक्षम राष्ट्र उभे करण्याचा आमचा ध्यास आहे. २०२५चा अर्थसंकल्प हा याच कडीतील एक महत्त्वाचा अर्थसंकल्प आहे. त्यातून महाराष्ट्राच्या प्रगतीला गती मिळणार आहे.

## पायाभूत विकास आणि औद्योगिकीकरण

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, बंदरे, उड्डाणपूल आणि विमानतळांचे जाळे मजबूत करण्यावर आमचा भर आहे. वाढवण बंदर हा प्रकल्प महाराष्ट्राच्या सागरी व्यापाराला जागतिक दर्जावर नेणारा आहे. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या जीडीपीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करण्याची ताकद असलेला हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यावर आमचा विशेष भर आहे. मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर आता वाढवण बंदर महाराष्ट्राला आर्थिक महासत्ता बनवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार आहे. या माध्यमातून जागतिक स्तरावरील व्यापार अधिक सहज होईल आणि नव्या रोजगार संधी निर्माण होतील. या ठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या (NAINA) माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविली जाणार आहे. यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मोठ्या उंचीवर जाईल. त्यामधून सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना मोठी चालना मिळेल. वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मॅट्रिक टन मालाची हाताळणी करणे शक्य होणार आहे. त्यात सुमारे २३.२ दशलक्ष टीईयू कंटेनर हाताळणी क्षमतेचा समावेश असेल. आज देशातील एकूण कंटेनर ट्रॅफिकपैकी ७० टक्के कंटेनर ट्रॅफिक एकटे 'जेएनपीए' बंदर हाताळते. या 'जेएनपीटी' बंदराच्या तीनपट मोठे वाढवण बंदर असेल. वाढवण बंदर प्रकल्प हा महाराष्ट्र सरकार आणि 'जेएनपीटी' यांचा संयुक्त उपक्रम आहे. एका कंपनीच्या माध्यमातून या प्रकल्पाची अंमलबजावणी होईल.



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

त्याचबरोबर गडचिरोली हा फक्त नक्षलप्रभावित भाग राहिला नसून तो आता स्टिल उत्पादनाच्या केंद्रबिंदूच्या दिशेने वाटचाल करत आहे. गडचिरोली जिल्ह्यातील खनिज संपत्तीचा योग्य प्रकारे वापर करत 'गडचिरोली स्टिल सिटी' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आम्ही साकारत आहोत. गडचिरोली शहर हे भारताचे 'स्टिल सिटी' होईल, मुंबई-नागपूर समृद्धी द्रुतगती मार्गाने गोंदिया आणि गडचिरोलीला जोडला जाईल. यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल, तेथील अर्थव्यवस्था बळकट होईल आणि संपूर्ण विदर्भाचा विकास वेगाने होईल.

आज देशात विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र हे पहिल्या पसंतीचे राज्य आहे. देशात येणाऱ्या विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र नेहमीच पहिल्या क्रमांकाचे राज्य राहिले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पातही पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष दिले आहे. भारताच्या एकूण निर्यातीत महाराष्ट्राचा १५.४ टक्के वाटा आहे. जानेवारी २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये महाराष्ट्र सरकारद्वारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र म्हणजेच 'ग्रोथ हब' म्हणून विकसित होत आहे. नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नावीन्यता नगर, इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे. जी विकसित भारतासाठी आवश्यक आहे. १० हजार एकरांहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येणार असून, यातून ५ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे.

## नदीजोड प्रकल्प आणि सिंचन सुविधा

ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात त्यामुळे कृषीला प्राधान्य देण्यात आले आहे. १०० टक्के सिंचन उपलब्ध असलेल्या क्षेत्रात वाढ केल्याशिवाय कृषी क्षेत्राच्या विकासाला मर्यादा येतात, हे ओळखून महाराष्ट्रात सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष दिले आहे. जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा शेतीसाठी वरदान ठरणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमीन ओलिताखाली येणार आहे आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होईल. मराठवाड्यासाठी वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्प सुरू केला असून, तो पूर्ण झाल्यास संपूर्ण मराठवाड्याचा पाणीटंचाईचा प्रश्न कायमचा सुटेल. शिवाय, मराठवाडा वॉटर ग्रीडच्या माध्यमातून संपूर्ण प्रदेशात पिण्याचे आणि सिंचनाचे पाणी पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना राज्यात कायमस्वरूपी राबवण्यात येणार आहे. ६.४५ कोटी घनमीटर गाळ काढण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असून ३८२ कोटी खर्च अपेक्षित आहे. नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाद्वारे नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९ हजार ५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असून प्रकल्पाची अंदाजित किंमत ७,५०० कोटी रुपये आहे, तर दमणगंगा -एकदरे - गोदावरी या २ हजार ३०० कोटी रुपये किमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे.

तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील

Mrgabharti 75000

शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. तसेच कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. मराठवाड्यातील सुमारे २ लाख ४० हजार हेक्टर क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. शेती, शेतीपूरक उद्योग आणि प्रक्रिया उद्योगांची उभारणी करण्यासाठी हा नदीजोड प्रकल्प अतिशय महत्त्वाचा आहे. त्यातून महाराष्ट्राची ग्रामीण अर्थव्यवस्था ही अधिक सक्षम होणार आहे.

## ऊर्जा आणि पर्यावरणस्नेही विकास

विकासाच्या प्रक्रियेत ऊर्जेचा वापर वाढत जातो. त्यामुळे ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवरही भर देण्यात येत आहे. सौरऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र आघाडीवर राहणार आहे. १६,००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना आम्ही गती देत आहोत. यातून शाश्वत, स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्रालाही फायदा होईल. कोळसा गॅसिफिकेशन तंत्रज्ञानाच्या मदतीने चंद्रपूर येथे पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मिती प्रकल्प सुरू करत आहोत, जो प्रदूषणाला आळा घालेल आणि ऊर्जा क्षेत्रात मोठी क्रांती घडवेल. पारंपरिक ऊर्जा स्रोतांना मर्यादा आहेत. त्या तुलनेत अपारंपरिक ऊर्जास्रोत अमर्याद आहेत. शासकीय इमारती २०२५ अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करावयाचे आहे. त्यामुळे प्रत्येक शासकीय इमारतीत सौर विद्युत यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर कृषी पंप उपलब्ध करून देणारी पीएम कुसुम योजना प्रभावीपणे राबवली जात आहे. त्यातून शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज उपलब्ध होणार आहे. त्यातून शेतकऱ्यांची क्रयक्षमता वाढीस लागणार आहे.



## औद्योगिक महामार्ग आणि रस्ते विकास

रस्ते हे कोणत्याही प्रदेशाच्या विकासासाठी महत्त्वाचे असतात. याच दृष्टिकोनातून आम्ही मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्ग प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केला आहे. आता आम्ही कोल्हापूर ते मराठवाडा आणि विदर्भ जोडणारा 'शक्तीपीठ रस्ता' विकसित करत आहोत. हा महामार्ग धार्मिक पर्यटनाबरोबरच औद्योगिक विकासाला चालना देईल. तसेच गडचिरोलीसाठी स्वतंत्र महामार्ग योजना आखत आहोत, ज्यामुळे त्याला थेट समृद्धी महामार्गाशी जोडले जाईल. यामुळे गुंतवणूकदारांचा ओढा वाढेल आणि गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा या भागांचा विकास होईल. जिल्ह्यांना जोडणारे रस्ते आणि पाणंद रस्त्यांमुळे राज्यातील दळण-वळण अधिक सुकर झाले आहे.

## मुंबई आणि पुणे महानगर क्षेत्रांचा विकास

मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे आणि त्यामुळे येथे पायाभूत सुविधा उभारणे अत्यंत गरजेचे आहे. मुंबई मेट्रो प्रकल्पांचे टप्प्याटप्प्याने उद्घाटन करत आहोत, जेणेकरून लोकांचा प्रवास अधिक सोईस्कर होईल. कोस्टल रोड प्रकल्पाने मुंबईच्या वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प हा जागतिक दर्जाचा असून, त्यामुळे छोट्या व्यवसायांना नवी संधी मिळेल. पुण्यासाठी ही रिंगरोड आणि मेट्रो प्रकल्प महत्त्वाचे असून त्यांना आमच्या सरकारने विशेष प्राधान्य दिले आहे.

## औद्योगिकीकरण आणि रोजगार निर्मिती

महाराष्ट्रात केवळ शेती आणि उद्योग नव्हे, तर स्टार्टअप्स आणि टेक्नॉलॉजी कंपन्यांसाठी ही उत्तम संधी उपलब्ध करून देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. छत्रपती संभाजीनगर हे महाराष्ट्राचे नवीन इंडस्ट्रियल मॅग्नेट म्हणून विकसित करत आहोत. जालन्यात ड्रायपोर्ट उभारण्याचे काम सुरू असून त्यामुळे निर्यात वाढेल आणि मराठवाड्यातील उद्योगांना चालना मिळेल. अमरावतीमध्ये 'कापूस-टेक्सटाईल-फॅशन' ही संकल्पना राबवत आहोत. त्यामुळे संपूर्ण पश्चिम विदर्भाचा विकास वेगाने होईल. टेक्सटाईल पार्कमध्ये १०,००० कोटींची गुंतवणूक आणि दोन लाख रोजगार उपलब्ध होणार आहेत.

## सामाजिक कल्याण आणि शेतकरी विकास

सामाजिक विकासात महिला, वंचित, उपेक्षित वर्ग आणि आदिवासी समाज सर्वात महत्त्वाचा असतो. ५० टक्के लोकसंख्या असलेल्या महिलांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी धोरणात्मक बदल आवश्यक होते. राज्य शासनाने हे बदल स्वीकारले आहेत. महिला उद्योजक, बचतगट, गट शेती अशा सर्वच बाबतीत राज्याने महिलांच्या विकासासाठी वेगवेगळी धोरणे स्वीकारली आहेत. त्यातून नव्या समाजाची निर्मिती होणार आहे. वंचित, उपेक्षित आणि आदिवासी समाजाच्या विकासासाठी १८ महामंडळे निर्माण करण्यात आली आहेत. त्यातून केवळ आर्थिकच नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक विकास साधण्याचा आमचा दृष्टिकोन आहे. ज्या तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नाही, तेथे किमान एक स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याचे ठरवण्यात आले आहे. त्यासाठी एक तालुका - एक बाजार समिती योजना राबवण्यात येणार आहे.

## पुढील वाटचाल

महाराष्ट्राने देशाच्या विकासात आत्तापर्यंत महत्त्वाचा वाटा उचलला आहे आणि भविष्यातही तो कायम राहील. वन ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. उद्योग, शेती, सिंचन, ऊर्जा, रस्ते, बंदरे आणि सामाजिक कल्याण या सर्व क्षेत्रांमध्ये महाराष्ट्र देशासाठी एक रोल मॉडेल ठरणार आहे. महाराष्ट्राची संस्कृती, भाषा आणि वारसा टिकवून ठेवत आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण देशाच्या प्रगतीला हातभार लावू. महाराष्ट्र आता थांबणार नाही, तो केवळ पुढेच जाणार आहे!

**शब्दांकन : प्रवीण कुलकर्णी,** माहिती अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय

Mrgabharti 75000

# विकासगतीला चालना!

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लोकराज्य मासिकाच्या या अर्थसंकल्पविषयक अंकास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

या निमित्ताने मी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांचं अभिनंदन करतो. एक चांगला वित्तमंत्री, योग्य बाबींना प्राधान्य देऊन सर्वच क्षेत्रांमध्ये संतुलन राहील, असा अर्थसंकल्प तयार करतो आणि अजित पवार यांनी त्याच पद्धतीनं यंदाचा अर्थसंकल्प सादर केला आहे. हा त्यांचा अकरावा अर्थसंकल्प आहे. त्यामुळे जनहिताचे निर्णय घेताना किंवा योजना आखतांना वित्तीय संतुलन कसं ठेवायचं याची त्यांना पुरेपूर जाण आहे. हे शासन लोकांसाठी असून या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवून आणून त्यांच्या प्रगतीसाठी शासन नियोजनात्मकरीत्या काम करत आहे. पुढील पाच वर्षांतही असेच काम केले जाणार आहे.

राज्याची धुरा सांभाळताना सर्वसामान्य माणसांना केंद्रबिंदू मानून काम करणारे हे शासन आहे. एकूणच महायुती सरकारच्या पहिल्या आणि आताच्या काळात अंतरिम अर्थसंकल्प मिळून चार अर्थसंकल्प सादर झाले आहेत. आमच्या प्रत्येक अर्थसंकल्पाचा अभ्यास केला, तर आपणास लक्षात येईल की, सर्व क्षेत्रांमध्ये संतुलन राहील अशा रीतीने आम्ही विकासकामांसाठी तरतुदी केल्या आहेत आणि आतासुद्धा विकासाची घोडदौड सुरू असून 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' हा निर्धार या अर्थसंकल्पातून व्यक्त होतो.



**एकनाथ शिंदे**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

माझ्या दृष्टीने महत्त्वाचं म्हणजे, राज्याच्या वार्षिक योजनेत सुमारे ३३ टक्के, अनुसूचित जाती तरतुदीत ४२ टक्के, तर आदिवासी तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे. यामुळे निश्चितच या दुर्बल आणि मागास घटकांना मोठा फायदा होणार आहे. आपल्या कृषी क्षेत्राचा विकासदर वाढवण्याच्या दृष्टीने राज्य शासनाद्वारे वेगवेगळ्या योजना राबवल्या जात असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली जात असल्याने या क्षेत्राचा विकास दर ८.७% पर्यंत सुधारला. आता हा विकासदर कायम ठेवण्याचे आणि वाढवण्याचे आव्हान आपल्यापुढे आहे आणि ते आम्ही यशस्वीरीत्या पेलू अशाच पद्धतीने अर्थसंकल्पात सुधारणा करण्यात आल्या आहेत. विशेषतः शेतीच्या उत्पादनात गुणवत्तापूर्ण वाढ होऊन बळीराजाच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयचा वापर शेती आणि शेतकऱ्यांसाठी करण्याचे आम्ही ठरवले आहे. याशिवाय सिंचन सुविधा, सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयी-सुविधादेखील शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्यासाठी उचललेली पावलं अतिशय महत्त्वाची आहेत.

मुंबई हे देशाचं ग्रोथ इंजिन आहे. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था १४० बिलियन डॉलरवरून २०३० पर्यंत ३०० बिलियन डॉलर, तर २०४७ पर्यंत १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचं आम्ही ठरवलं आहे. मुंबईसह इतरही सर्व ठिकाणी महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली आहे.

अमेरिकेसारख्या प्रगत देशाचा विकास हा रस्त्यांमुळे झाला आहे. दर्जेदार ग्रामीण रस्ते; तसेच राज्य महामार्ग व जिल्हा रस्त्यांना सर्वात जास्त अर्थसाहाय्य करणार आहोत. त्याचप्रमाणे 'सर्वांसाठी घरे' हे उद्दिष्ट येत्या पाच वर्षांत साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार असून शहरी आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यात येणार आहे. औद्योगिक विकासात महाराष्ट्र आघाडीवर राहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात येईल, अशा तऱ्हेने या अर्थसंकल्पामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'मेक इन महाराष्ट्र'द्वारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण आखण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षांच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

गरीब, दुर्बल महिलांना केवळ लाडकी बहीण योजनेतून पैसे देऊन आम्ही थांबलेलो नाहीत, तर त्यांना अधिक आत्मनिर्भर करण्यासाठी या अर्थसंकल्पात आम्ही तरतूद केलेली आहे. लाडकी बहीण योजना बंद करण्यात येणार असा अपप्रचार सुरू होता, मात्र बहिणींना विविध माध्यमातून रोजगार मिळावा, हा आमचा निर्धार कायम आहे. या योजनेसाठी पुरेशी तरतूद आम्ही केलेली आहे. या योजनेतील अपात्र लाभार्थी नियमाप्रमाणे कमी करण्यात येत असले तरी, एकूणच पात्र लाभार्थींची संख्यासुद्धा वाढते आहे. मुलींना चांगले व्यावसायिक शिक्षण घेता यावे म्हणून त्यांना हे शिक्षण पूर्ण मोफत करण्याची योजना गेल्या वर्षी आणली होती. ही योजनासुद्धा आम्ही पुढेही प्रभावीपणे राबवणार आहोत.

विशेष म्हणजे या अर्थसंकल्पात विविध स्मारके, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटनस्थळ विकसित करण्यावर जोर देण्यात आला आहे. केवळ पर्यटन उद्योग वाढावा एवढाच उद्देश नाही, तर आपल्या महान संस्कृतीची ओळख देश विदेशातल्या पर्यटकांना व्हावी, यासाठीसुद्धा शासन खास प्रयत्नशील आहे. राज्यातील जलपर्यटनाला प्रोत्साहन देत, क्रीडा क्षेत्रातल्या पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी धोरणे आणि अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात आल्या आहेत.

एकूणच काय तर, विकास हाच शासनाचा अजेंडा असून लोकांचे कल्याण हेच आमचे ध्येय आहे. विकसित भारत घडवण्यामध्ये विकसित महाराष्ट्राचं योगदान अधोरेखित करणारा हा अर्थसंकल्प आहे.

शेती, शेतीपूरक क्षेत्रे, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतुदी असलेला आणि देशाचे आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारत साकारण्यासाठी महाराष्ट्राचे भरीव योगदान करणारा हा अर्थसंकल्प आहे.

**शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे,** जनसंपर्क अधिकारी

Mrgabharti 75000

# महाराष्ट्र आता थांबणार नाही...



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

देशाचे ‘ग्रोथ इंजिन’ असलेल्या महाराष्ट्राचा देशाच्या एकूण राष्ट्रीय सकल उत्पन्नात (जीडीपी) १३.५ टक्के इतका वाटा आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्राचा अर्थसंकल्प केवळ राज्याच्या नव्हे, तर देशाच्या प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा ठरतो. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मी सादर केलेला २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प हा माझा ११वा अर्थसंकल्प आहे. साहजिकच पूर्वानुभवाच्या बळावर राज्यातील जनतेच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा पूर्ण करण्याचा कसोशीचा प्रयत्न मी या अर्थसंकल्पात केला आहे. ‘विकसित भारत, विकसित महाराष्ट्र’ ही संकल्पना अर्थसंकल्पाचा मूळ गाभा असून वर्ष २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पपूर्तीच्या दिशेने महाराष्ट्राने टाकलेले आश्वासक पाऊल आहे. शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती, सर्वसमावेशक विकास या पाच प्रमुख क्षेत्रांवर अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. ‘महाराष्ट्र आता थांबणार नाही, विकास आता लांबणार नाही...’ हा विश्वास या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला देण्याचा मी प्रयत्न केला आहे.

## आर्थिक प्रगती आणि वास्तववादी दृष्टिकोन

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०२४-२५ मध्ये ७.३ टक्के दराने वाढेल, असा अंदाज आर्थिक सर्वेक्षणात व्यक्त करण्यात आला आहे. ही वाढ देशाच्या सरासरी वाढीपेक्षा (६.५ टक्के) अधिक आहे. राज्याचा प्रतिव्यक्ती उत्पन्नाचा अंदाज तीन लाख नऊ हजार ३४० रुपये इतका आहे, जो गेल्या वर्षीच्या दोन लाख ७८ हजार ६८१ रुपयांपेक्षा लक्षणीय वाढ दर्शवतो. यंदा अर्थसंकल्पात एकूण ७ लाख २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये महसूल उत्पन्न ५ लाख ६० हजार ९६३ कोटी रुपये, तर महसूल खर्च ६ लाख ०६ हजार ८५५ कोटी रुपये इतका अपेक्षित आहे. यामुळे ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची महसूल तूट निर्माण होईल. तथापि, ही तूट नियंत्रणात ठेवण्यासाठी आर्थिक शिस्त आणि पारदर्शक प्रशासनावर भर दिला आहे. राज्यात गेल्या वर्षी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपये खर्चाचा अंदाज होता, जो सुधारित अंदाजानुसार ६ लाख ७२ हजार ३० कोटी रुपये इतका वाढला आहे. या वाढीमागे पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी योजनांवरील खर्चाचे योगदान आहे.

## शेती आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत शेतीचा मोलाचा वाटा आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे हे आमचे ध्येय आहे. या अर्थसंकल्पात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर शेतीत करण्यासाठी पहिल्या टप्प्यात एक लाख एकर जमिनीवर ५० हजार शेतकऱ्यांसह पथदर्शी प्रकल्प राबवण्यात येणार आहेत. त्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तापी खोऱ्यात १९,३०० कोटी रुपयांचा सिंचन प्रकल्प प्रस्तावित आहे. कोकणातील पाणी मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागात वळवण्याची योजना आहे. सौरऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट आहे. हे सर्व उपाय शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणतील आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देतील.

## पायाभूत सुविधा आणि शहरी विकास

पायाभूत सुविधा हा राज्याच्या प्रगतीचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात मुंबईसाठी ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये मेट्रोजाळ्याचा विस्तार, रस्ते विकास, वाहतूक सुविधांचा समावेश आहे. सध्या मुंबई, पुणे आणि



नागपूरमध्ये १४३.५७ किलोमीटरचे मेट्रोमार्ग कार्यरत असून, येत्या वर्षात ६४.४ किलोमीटर मार्गांचा विस्तार होईल. पुढील पाच वर्षांत २३७.५ किलोमीटर मेट्रो मार्गांचे काम पूर्ण होईल. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर २०३० पर्यंत कार्यान्वित होईल. त्यासाठी राज्य सरकार २६ टक्के निधी देईल. हे बंदर व्यापार आणि दळणवळणाची सुविधा वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर ‘गेमचेंजर’ ठरणार आहे. नवीन औद्योगिक

Mrgabharti 75000

धोरणांतर्गत पाच वर्षांत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ५० लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

## महिला सशक्तीकरण आणि सामाजिक कल्याण

महिलांच्या प्रगतीशिवाय राज्याचा विकास अपूर्ण आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही महायुती सरकारची यशस्वी योजना आहे. महायुती सरकारला पुन्हा सत्तेत आणण्यात या योजनेची महत्त्वाची भूमिका होती. या योजनेसाठी २०२५-२६ मध्ये ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आतापर्यंत २ कोटी ५३ लाख भगिनींना ३३,२३२ कोटी रुपयांचे वाटप झाले आहे. या योजनेसाठी २०२५-२६ मध्ये एकूण ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय, 'लेक लाडकी योजना' अंतर्गत १.१२ लाख महिला भगिनींना लाभ मिळाला आहे. हे उपक्रम महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला चालना देत आहेत.

## रोजगार निर्मिती आणि उद्योगवृद्धी

तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी रोजगार निर्मिती हा सरकारचा प्रमुख अजेंडा आहे. दावोस येथे ६३ कंपन्यांशी झालेल्या सामंजस्य करारांतून १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १६ लाख रोजगार निर्मिती होईल. महाराष्ट्र परकीय थेट गुंतवणुकीत (एफडीआय) देशात अव्वल आहे. नवीन औद्योगिक धोरणातून सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच अंतराळ, संरक्षण, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्याचे नियोजन आहे. यामुळे तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील.

राज्यात उद्योग, व्यवसायासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यास सरकार कटिबद्ध आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक धोरणामुळे स्थानिक; तसेच आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यास इच्छुक आहेत. 'मॅग्नेट २.०' अंतर्गत कृषी-व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली आहे. स्टार्टअप्स आणि लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी भांडवली मदतीची व्यवस्था करण्यात आली आहे. 'ग्रोथ हब' संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात सात जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना आहे. 'स्टील हब' प्रकल्पांतर्गत गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे, ज्यामुळे रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील.

## पर्यावरण आणि शाश्वत विकास

पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देत, शहरी भागातील सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी ८,२०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सौरऊर्जेचा वापर वाढवून हरित ऊर्जेच्या दिशेने पावले टाकली जात आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात 'महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणीय किनारी संरक्षण आणि व्यवस्थापन' प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. हा अर्थसंकल्प केवळ आर्थिक आकडेवारी नाही, तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र अग्रणी भूमिका बजावेल. या प्रगतीचा लाभ राज्यातील प्रत्येक नागरिकाला मिळावा, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.



आर्थिक शिस्त, पारदर्शकता, सर्वसमावेशक विकास हे आमचे तत्त्व आहे. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्राला सर्वांगीण विकासाच्या क्षेत्रात नव्या उंचीवर नेण्याचा आमचा संकल्प आहे. जनतेने आमच्यावर टाकलेल्या विश्वासाला सार्थ ठरवत, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासाशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे राज्याच्या विकासचक्राला गती देण्यासाठी, संकल्पना आणि कृती यांचा समतोल मिलाप आहे. सुखी, संपन्न, समृद्ध, प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी एकजूट होण्याची, महाराष्ट्राच्या विकासात योगदान देण्याची संधी या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. या संधीचा उपयोग करून राज्यातील शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला, उद्योजक, व्यापारी सर्वच जण आपल्या प्रगतीचा मार्ग अधिक प्रशस्त करतील, असा विश्वास आहे.

*विकास संकल्प। विकासाचा ध्यास ।।*
*मनी धरू आस । विकासाची ।।*
*विकास चक्राला। देऊनिया गती ।।*
*साधु या प्रगती। वेगातची ।।*
*मिळोनिया सारे। राज्य विकसित ।।*
*राष्ट्र विकसित। करू चला ।।*

**शब्दांकन : संग्राम इंगळे,** जनसंपर्क अधिकारी

Mrgabharti_75000

या सरकारच्या स्थापनेवेळी 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' असा संकल्प मा. मुख्यमंत्री महोदयांनी केला आहे. 'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र' हे सूत्र प्रत्यक्षात आणण्याकरिता विकासचक्राला गती देणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन राज्याच्या शाश्वत सर्वसमावेशक विकासाची रूपरेषा तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. उद्योग, पायाभूत सुविधा, कृषी व संलग्न क्षेत्र, सामाजिक व इतर क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण तरतुदी करणारा हा अर्थसंकल्प आहे.

# विकसित भारत, विकसित महाराष्ट्र!

**अजित पवार,** उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री

आपल्या सर्वांचे आराध्यदैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे या महामानवांना वंदन करून 'विकसित भारत विकसित महाराष्ट्र' हा अर्थसंकल्प वित्तमंत्री म्हणून सादर करण्याची संधी माझ्यासाठी विशेष बाब आहे.

हे वर्ष अनेक दृष्टीने विशेष आहे. स्वराज्यसौदामिनी महाराणी ताराबाई यांचे हे त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे त्रिशताब्दी व जन्मवर्ष आहे. देशातील लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. अशा विशेष वर्षात आज आमलकी एकादशीच्या पवित्र दिवशी मला हा माझा ११वा अर्थसंकल्प मांडण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो.

२०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने महायुतीला विजयाचा अभूतपूर्व कौल दिला. मतदारांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास जबाबदारीची जाणीव करून देणारा असल्यामुळे त्याचा सन्मान राखण्याचे काम महायुतीच्या सरकारकडून निश्चितपणे होईल याची मी ग्वाही देतो.



Mrgabharti_75000

## सर्वसमावेशक विकासाची रूपरेषा

२०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र व्हावे, असा मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी महोदयांचा संकल्प आहे. हा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी महाराष्ट्र अव्वल दर्जाची कामगिरी करेल, यात तिळमात्र शंका नाही. या सरकारच्या स्थापनेवेळी महाराष्ट्र आता थांबणार नाही असा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महोदयांनी केला आहे.

भारताचे 'विकसित भारत, विकसित महाराष्ट्र' हे सूत्र प्रत्यक्षात आणण्याकरिता विकासचक्राला गती देणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन राज्याच्या शाश्वत सर्वसमावेशक विकासाची रूपरेषा तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. उद्योग, पायाभूत सुविधा, कृषी व संलग्न क्षेत्र, सामाजिक व इतर क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण तरतुदी करणारा हा अर्थसंकल्प आहे.

## महाराष्ट्र आता थांबणार नाही, विकास आता लांबणार नाही

सुविकसित पायाभूत सुविधा, मुबलक नैसर्गिक संसाधने आणि मनुष्यबळामुळे महाराष्ट्र राज्य नवीन उद्योग स्थापित करण्यासाठी आदर्श राज्य झाले आहे. उद्योग क्षेत्रातील देशांतर्गत व परदेशी थेट गुंतवणुकीसाठी शासन प्रयत्नशील असल्याने राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे.

## विकासचक्र

अर्थव्यवस्थेच्या विकासचक्राला चालना देण्यासाठी खासगी; तसेच शासकीय गुंतवणूक, नागरिकांचा उपभोग खर्च आणि निर्यात या चार प्रमुख घटकांमध्ये वृद्धी होणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधांवर केलेल्या गुंतवणुकीमुळे; तसेच उद्योगांना दिलेल्या विविध प्रोत्साहनामुळे मोठ्या प्रमाणावर थेट देशी व परदेशी गुंतवणूक आकर्षित होत आहे. खासगी गुंतवणुकीमुळे उत्पादनात आणि रोजगारात वाढ होत आहे.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांच्या बँकेत थेट जमा होत असल्याने क्रयशक्ती वाढलेली आहे. त्याचा परिणाम बाजारात वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ झाली आहे. परिणामी गुंतवणूक, रोजगार निर्मिती, वाढीव उत्पन्न, मागणी, गुंतवणूक असे विकासचक्र सुरू आहे.

## केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी आयकरात सूट

केंद्र सरकारच्या या वर्षीच्या अर्थसंकल्पात आयकरात मोठी सूट देऊन मध्यमवर्गीयांना दिलासा दिला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदींमुळे राज्याच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजनांना बळ मिळाले आहे. राज्यातील विविध पायाभूत सुविधा, रेल्वे आणि कल्याणकारी योजनांसाठी केंद्र शासनाने भरीव तरतूद केली आहे. त्यामुळे मी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानतो. उद्योग, पायाभूत सुविधा, कृषी, संलग्न क्षेत्र सामाजिक व इतर क्षेत्रांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण तरतुदी करणारा राज्याचा अर्थसंकल्प पुढीलप्रमाणे :



## गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती

औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर आहे. जानेवारी २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत राज्य शासनाद्वारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे राज्यात १६ लाख रोजगार निर्माण होणार आहेत.

## सात कलमी कृतिआराखडा

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रालयीन विभाग; तसेच क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा सात कलमी कृतिआराखडा तयार करण्यात आला आहे. या कृतिआराखड्यात संकेतस्थळांचा विकास, सुलभ जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयीसुविधा, गुंतवणुकीचा प्रसार, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी आदींचा समावेश केला आहे. या कार्यक्रमामुळे प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक, गतिशील, लोकाभिमुख होणार आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन त्रयस्थ संस्थांकडून करवून उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यालयांचा गौरव करण्यात येणार आहे.

**सन २०२५-२६ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उद्योग विभागास १ हजार २१ कोटी रुपये, कामगार विभागास १७१ कोटी रुपये, वस्त्रोद्योग विभागास ७७४ कोटी रुपये आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागास ८०७ कोटी रुपये नियत व्यय प्रस्तावित आहे.**

## औद्योगिक धोरण

महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण २०२५ लवकरच जाहीर केले जाईल. या धोरणाच्या ५ वर्षांच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ५० लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट असेल. नवीन औद्योगिक धोरणाबरोबरच अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण, इलेक्ट्रॉनिक्स धोरण, जेम्स ॲण्ड ज्वेलरी धोरण, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम धोरण, चक्रीय अर्थव्यवस्थेसाठी स्वतंत्र क्षेत्रीय धोरण जाहीर करण्यात येणार आहेत. केंद्र शासनाच्या नवीन कामगार संहितेनुसार नवीन कामगार नियम तयार करण्यात येणार आहेत.

## निर्यात प्रोत्साहन धोरण

निर्यातीमध्ये भरीव वाढ होण्याकरिता राज्याने महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण-२०२३ जाहीर केले होते. त्यानुसार राज्यात ३७ विशेष आर्थिक क्षेत्रे, ८ कृषी निर्यात क्षेत्रे, निर्यातकेंद्रित २७ औद्योगिक पार्क उभारण्यात आले आहेत. त्यामुळे देशाच्या एकूण निर्यातीत राज्याचे योगदान १५.४ टक्के झाले आहे. याशिवाय एक जिल्हा-एक उत्पादन, जिल्ह्यांना निर्यात केंद्र म्हणून विकसित करणे, राज्य-जिल्हा निर्यात प्रोत्साहन परिषद असे महत्त्वाचे उपक्रम राज्यात राबवण्यात येणार आहेत.

सन २०२३-२४ मध्ये एकूण ५ लाख ५६ हजार ३७९ कोटी रुपयांची व सन २०२४-२५ मध्ये नोव्हेंबर २०२४ पर्यंत ३ लाख ५८ हजार ४३९ कोटी रुपयांची उत्पादने निर्यात करण्यात आली आहेत.

Mrgabharti_75000


## लॉजिस्टिक धोरण

राज्याचे लॉजिस्टिक धोरण-२०२४ जाहीर करण्यात आले असून त्याद्वारे १० हजार एकराहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. प्रकल्पांना देऊ केलेल्या विशेष प्रोत्साहन व सुविधांमुळे सुमारे ५ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे.



## ग्रोथ हब

मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र, म्हणजेच ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर व विरार - बोईसर या सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्रे निर्माण केली जाणार आहेत. त्यामुळे, मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था सध्याच्या १४० बिलियन डॉलरवरून सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर, तर सन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे.

## स्टील हब

नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता स्टील हब म्हणून उदयास येत आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्याकरिता २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होणार आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गांचे जाळे विकसित केले जात आहे. त्याकरिता पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येतील.

## सामूहिक प्रोत्साहन योजना

समतोल प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक प्रोत्साहन योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २०२५-२६ मध्ये ६,४०० कोटी रुपये प्रोत्साहन अनुदान प्रस्तावित आहे.

## कमी दरात वीजपुरवठा

महावितरण कंपनीने येत्या ५ वर्षांसाठी विजेचे दर निश्चित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केला आहे. ऊर्जाक्षेत्रातील नियोजन व कमी दराच्या हरित ऊर्जेच्या खरेदीमुळे येत्या पाच वर्षांत वीज खरेदी खर्चामध्ये १ लाख १३ हजार कोटी रुपयांची बचत होईल. यामुळे राज्यातील औद्योगिक वीजदर इतर राज्यांच्या तुलनेत कमी होतील.

## बेंगलुरू - मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर

बेंगलुरू-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू असून या प्रकल्पामुळे राज्यातील अवर्षणप्रवण भागात उद्योगांची स्थापना होऊन रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

## महाराष्ट्र टेक्निकल टेक्सटाइल मिशन

राज्याला तांत्रिक वस्त्रोद्योगाचे जागतिक केंद्र म्हणून विकसित करण्याकरिता महाराष्ट्र टेक्निकल टेक्सटाइल मिशनची स्थापना करण्यात येणार आहे, विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी याचा उपयोग होईल.

## अर्बन हाट केंद्रांची स्थापना

हातमाग विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी नागपूर येथे अर्बन हाट केंद्रांची स्थापना करण्यात येईल.

## मैत्री पोर्टल

गुंतवणूकदार आणि उद्योजकांना राज्यात व्यवसायासाठी अधिक पूरक परिसंस्था विकसित करण्याच्या उद्देशाने जुलै २०२३ मध्ये महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा कायदा लागू करण्यात आला आहे. उद्योजकांना त्यांच्या उद्योगाचा विस्तार करण्यासाठी; तसेच नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी १७ विभागांकडून देण्यात येणाऱ्या १४१ सेवा आता मैत्री या संकेतस्थळामार्फत मिळणार आहेत.

## इनोव्हेशन सिटी

**आम्हावरी खिळले डोळे, उद्याच्या पिढ्यांचे**
**आज स्वप्न बघतो आम्ही, उद्याच्या दिसांचे...**

नवीन पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी; तसेच नव-उपक्रमांमध्ये राज्य अग्रेसर व्हावे, यासाठी नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नावीन्यता नगर, इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे.

## रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून मायक्रोसॉफ्ट कंपनीमार्फत १० हजार महिलांना कौशल्य व कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचे प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम करण्यात येईल.

## पायाभूत सुविधा विकास

पायाभूत सुविधांमध्ये एक रुपयाची गुंतवणूक केली, तर स्थूल

Mrgabharti_75000

राज्य उत्पन्नात २.५ ते ३.५ रुपयांची वाढ होते, हे लक्षात घेऊन विमान चालन, रेल्वे, मेट्रो, महामार्ग, जल वाहतूक, बंदर विकास, सिंचन, ऊर्जा, परिवहन व दळणवळण क्षेत्रात येत्या पाच वर्षांत विक्रमी गुंतवणूक करण्याचा शासनाचा निर्धार आहे.

## महाराष्ट्र सागरी विकास धोरण - २०२३

महाराष्ट्र सागरी विकास धोरण -२०२३ मध्ये बंदर विकासाकरिता स्वामित्वधन, अकृषिक कर, वीज शुल्क, मुद्रांक शुल्क यातून सूट देण्यात येत आहे. विजेसाठी औद्योगिक दर लागू करण्यात येत आहे. प्रवासी जलवाहतूक व किनारी पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रवासी व बंदर करातून सूट देण्यात आली आहे. बंदरांच्या करारांचा कमाल कालावधीही ९० वर्षे करण्यात येईल.

## वाढवण बंदर, सागरी दळणवळण

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण आणि महाराष्ट्र सागरी मंडळ हे संयुक्तरीत्या पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर विकसित करत आहेत. या प्रकल्पाचा एकूण खर्च ७६,२२० कोटी रुपये असून त्यात राज्य शासनाचा सहभाग २६ टक्के आहे. वाढवण बंदरामुळे सुमारे ३०० दशलक्ष मेट्रिक टन वार्षिक माल हाताळणी क्षमता निर्माण होणार



आहे. जवाहरलाल नेहरू बंदराच्या सध्याच्या क्षमतेपेक्षा ती तिप्पट असणार आहे. सन २०३० पर्यंत नव्या बंदरातून मालवाहतूक सुरू होणे अपेक्षित आहे. या बंदराचा समावेश कंटेनर हाताळणी करणाऱ्या जगातील पहिल्या १० बंदरांमध्ये होणार असल्याने महाराष्ट्र राज्य भविष्यात सागरी दळणवळणातील महाशक्ती म्हणून उदयास येईल.

वाढवण बंदराजवळ मुंबईसाठी तिसरे विमानतळ प्रस्तावित असून मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ असणार आहे. हे बंदर समृद्धी महामार्गालाही जोडण्यात येईल.

## मुरबे बंदर

पालघर जिल्ह्यात मौजे मुरबे येथे बंदर निर्मितीच्या ४,२५९ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाला खासगी क्षेत्राच्या सहभागाने मंजुरी देण्यात येईल.

## प्रवासी जलवाहतूक

गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथून मांडवा, एलिफंटापर्यंत सुरक्षित प्रवासाकरिता अत्याधुनिक सुविधायुक्त बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर करण्यात येणार आहे.

## प्रवासी जेट्टी

मुंबईत गेट वे ऑफ इंडियालगत रेडिओ क्लब येथे प्रवासी वाहतुकीकरिता सुसज्ज जेट्टीचे २२९ कोटी २७ लाख रुपये किमतीचे काम सुरू आहे.

दिघी-जिल्हा रायगड, वेंगुर्ला-जिल्हा सिंधुदुर्ग; तसेच काल्हेर डोंबिवली, कोलशेत, मिरा-भाईंदर-जिल्हा ठाणे येथील जेट्टींची कामे प्रगतिपथावर आहेत. काशिद- जिल्हा रायगड येथील तरंगत्या जेट्टीचे काम लवकरच सुरू करण्यात येईल.

## शोअर प्रकल्प

हवामान बदल आणि समुद्राच्या पातळीत होत असलेल्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींपासून बचाव करण्यासाठी महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांमध्ये ८,४०० कोटी रुपये किमतीचा बाह्यसाहाय्यित प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र शाश्वत किनारा संरक्षण व्यवस्थापन

महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक किनारा संरक्षण व व्यवस्थापन या ४५० कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवबाग येथे १५८ कोटी रुपये किमतीच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे समुद्रकिनारी वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण होणार आहे.

## राज्यांना भांडवली गुंतवणूक विशेष साहाय्य योजना

केंद्र सरकारने सन २०२०-२१ पासून भांडवली खर्चाकरिता ५० वर्ष मुदतीच्या बिनव्याजी कर्जाची राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष साहाय्य योजना सुरू केली आहे. या योजनेतून राज्याला सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीत १३ हजार ८०७ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेतून सुमारे १२ हजार कोटी रुपयांचे साहाय्य अपेक्षित आहे.

## अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा २०२५-२०४७

पूर्वनिर्धारित निकषांवर आधारित राज्याचा दीर्घकालीन व सर्वसमावेशक अमृतकाल राज्य रस्ते विकास आराखडा २०२५ ते २०४७ तयार करण्याचे नियोजित आहे. या आराखड्यामध्ये पर्यटन केंद्र, तीर्थक्षेत्र, धार्मिक स्थळं, गडकिल्ले, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, ५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वसाहती आणि सर्व जिल्हा मुख्यालये व तालुका मुख्यालये जोडण्याकरिता रस्त्यांचा समावेश करण्यात येईल.

Mrgabharti_75000



## रस्ते विकास

आशियाई विकास बँक प्रकल्प टप्पा-१ पूर्ण झाला आहे. टप्पा-२ मधील ३,९३९ कोटी रुपये किमतीची ४६८ किलोमीटर रस्ते सुधारणांची कामे हाती घेतली जातील. त्यापैकी ३५० किलोमीटर लांबीची कामे पूर्ण झाली आहेत. टप्पा-३ अंतर्गत ७५५ किलोमीटर रस्ते लांबीची ६,५८९ कोटी रुपये किमतीची २३ कामे पूर्ण करण्यात येतील.

## सुधारित हायब्रीड न्युईटी योजना

सुधारित हायब्रीड न्युईटी योजनेंतर्गत ६ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सिमेंट काँक्रिटीकरणाची कामे प्रगतिपथावर आहेत. या कामांची किंमत ३६,९६४ कोटी रुपये आहे.

## प्रधानमंत्री ग्रामसडक योजना

प्रधानमंत्री ग्रामसडक योजना टप्पा -३ अंतर्गत ६,५०० किलोमीटर लांबीची, ५,६७० कोटी रुपये किमतीची कामे प्रगतिपथावर आहेत. त्यापैकी ३,७८५ किलोमीटर लांबीची कामे पूर्ण झाली असून २०२५-२६ साठी १,५०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ ची कामे पूर्णत्वास आली असून टप्पा-२ अंतर्गत ९,६१० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या दर्जोन्नतीची कामे मार्च २०२६ अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रगतिपथावर आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत अतिरिक्त ७ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत १ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३,५८२ गावे, १४ हजार किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रिटच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा मार्गांना, राज्य महामार्ग किंवा राष्ट्रीय महामार्गांना जोडली जाणार आहेत. या प्रकल्पाची एकूण किंमत ३०,१०० कोटी रुपये इतकी असून पहिल्या टप्प्यात ८ हजार कोटी रुपये रकमेची कामे हाती घेण्यात येणार आहेत.



## समृद्धी महामार्ग

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यासाठी ६४,७५५ कोटी रुपये खर्च झाला आहे. इगतपुरी ते आमणे हा ७६ किलोमीटर लांबीचा टप्पा लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे.

या महामार्गालगत ॲग्रो-लॉजिस्टिक हब विकसित केले जाणार असून त्यात कोल्ड स्टोरेज, ग्रेडिंग, पॅकिंग व निर्यात हाताळणी केंद्राच्या प्रमुख सुविधा पुरवण्यात येतील. याचा लाभ प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना होईल.

## शक्तीपीठ महामार्ग

वर्धा जिल्ह्यातील पवनार ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पात्रादेवी या ७६० किलोमीटर लांबीच्या, ८६,३०० कोटी रुपये किमतीच्या महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाच्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

## मिसिंग लिंक

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली ते खंडाळा या घाट लांबीतील मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. यामुळे प्रवासाचा वेळ आणि इंधन या दोन्हीत बचत होईल आणि वाहतूक कोंडीतूनही सुटका होईल.

## मुंबई उपनगरातील प्रकल्प, पूल आणि भुयारी मार्ग

मुंबई उपनगर परिसरातील वाहतूक गतिमान व्हावी, यासाठी वर्सोवा ते मढ खाडीपूल, वर्सोवा ते भाईंदर किनारी मार्ग, मुलुंड ते गोरेगाव, ठाणे ते बोरिवली आणि ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह भुयारी मार्ग असे ६४,७८३ कोटी रुपये किमतीचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

## ठाणे-नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ

ठाणे ते नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ असा उन्नत मार्ग बांधण्याचे नियोजन असून त्याद्वारे ठाणे, डोंबिवली, कल्याण व अन्य महत्त्वाची मोठी शहरे आंतरराष्ट्रीय विमानतळाशी सुलभरीत्या जोडली जाणार आहेत.

## किनारी मार्ग

बाळकुम ते गायमुख या ठाणे किनारी मार्गाची लांबी १३.४५ किलोमीटर असून त्याचे सुमारे ३,३६४ कोटी रुपये खर्चाचे काम २०२८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन सुरू आहे.

## शिवडी-वरळी उन्नत जोडरस्ता

शिवडी-वरळी या १,०५१ कोटी रुपये किमतीच्या उन्नत जोडरस्त्याचे काम मार्च २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन सुरू आहे.

## वर्सोवा - वांद्रे सागरी सेतू

स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतूचे वांद्रे ते वर्सोवा या दरम्यानचे

Mrgabharti_75000

१४ किलोमीटर लांबीचे १८,१२० कोटी रुपये खर्चाचे काम मे २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन सुरू आहे.

### उत्तन ते विरार सागरी सेतू

उत्तन ते विरार या सागरी सेतूकरिता ५५ किलोमीटर लांबीच्या जोडरस्त्यासाठी ८७,४२७ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील.

### उन्नत मार्ग

पुणे ते शिरुर या ५४ किलोमीटर लांबीच्या ७,५१५ कोटी रुपये किमतीच्या उन्नत मार्गाचे बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तळेगाव-चाकण-शिक्रापूर या रस्त्याच्या तळेगाव ते चाकण या २५ किलोमीटर लांबीत चार पदरी उन्नत मार्ग करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी अंदाजित ६,४९९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

### राज्यातील मेट्रो प्रकल्प

- मुंबई, नागपूर व पुणे महानगरांतील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकूलित वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १४३.५७ किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले आहेत. सुमारे १० लाख प्रवासी रोज या सेवेचा लाभ घेत आहेत.
- येत्या वर्षात मुंबईमध्ये ४१.२ किलोमीटर, तर पुण्यामध्ये २३.२ किलोमीटर असे एकूण ६४.४ किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्ग सुरू होणार आहेत.
- येत्या ५ वर्षांत एकूण २३७.५ किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्गाचे काम हाती घेण्यात येणार आहे. नागपूर मेट्रोचा ४० किलोमीटर लांबीचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्यात ६ हजार ७०८ कोटी रुपये किमतीचे ४३.८० किलोमीटर लांबीचे काम प्रगतिपथावर आहे.
- ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग; तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला - स्वारगेट - हडपसर - खराडी आणि नळ स्टॉप - वारजे - माणिकबाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे.
- मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम लवकरच हाती घेण्याचे नियोजन आहे.

### विमानतळे

#### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ

नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची दरवर्षी ९० दशलक्ष प्रवासी आणि २.६ दशलक्ष टन माल वाहतुकीची क्षमता असणार आहे. या प्रकल्पाचे सुमारे ८५ टक्के काम पूर्ण झाले असून चाचणी उड्डाणेही यशस्वीरीत्या पार पडली आहेत. तेथून एप्रिल २०२५ मध्ये देशांतर्गत विमानसेवा सुरू करण्याचे नियोजन आहे.

#### नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ

नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे खासगी सहभागातून श्रेणीवर्धन आणि आधुनिकीकरण करण्यात येईल. यामुळे प्रवासी आणि मालवाहतूक क्षमतेत वृद्धी होऊन विदर्भाच्या सर्वांगीण आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे.

#### शिर्डी विमानतळ

शिर्डी विमानतळाच्या १,३६७ कोटी रुपये किमतीच्या विकास कामांना मान्यता देण्यात आली आहे. २०२१ मध्ये शिर्डी विमानतळाला प्रमुख विमानतळाचा दर्जा प्राप्त झाला आहे. नाईट लँडिगची सुविधाही लवकरच सुरू करण्याचे नियोजन आहे.




#### इतर विमानतळे

अमरावतीतील बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झाले असून तेथून ३१ मार्च २०२५ पासून प्रवासी सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे.

सध्या रत्नागिरी विमानतळाची १४७ कोटी रुपये रकमेची कामे प्रगतिपथावर आहेत. तसेच गडचिरोली येथील नवीन विमानतळाच्या सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे सुरू आहेत. अकोला विमानतळाच्या विस्तारासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

### पर्यावरणपूरक परिवहन

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ६ हजार डिझेल बसचे रूपांतर सीएनजी आणि एलएनजी बसमध्ये करण्याची प्रक्रिया सुरू आहे. महामंडळाला नवीन बस खरेदीसाठी शासनाकडून अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

**सन २०२५-२६ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता बंदरे विभागास ४८४ कोटी रुपये, सार्वजनिक बांधकाम-रस्ते विभागास १९,९३६ कोटी रुपये, परिवहन विभागास ३,६१० कोटी रुपये, नगर विकास विभागास १०,६२९ कोटी रुपये व ग्रामविकास विभागास ११,४८० कोटी रुपये, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास**

Mrgabharti 75000


**२४५ कोटी रुपये, ऊर्जा विभागास २१,५३४ कोटी रुपये नियत व्यय प्रस्तावित आहे.**

*कृषी व संलग्न क्षेत्रे*
*काळी माती ज्याची शान,*
*तिच्यात राबे विसरूनी भान!*
*पोशिंदा हा आहे आपला,*
*कृतज्ञतेने ठेवू जाण!*
*देऊ योजना अशा तया की*
*राहील त्याचे हिरवे रान!!*

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा – २)

या प्रकल्पाचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांतील ७,२०१ गावांमध्ये राबवण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी २०२५-२६ मध्ये ३५१ कोटी ४२ लाख रुपये निधी देण्याचे प्रस्तावित आहे.

## कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता

कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे धोरण आखण्यात येत आहे. शेतकऱ्यांना पीक नियोजनाचा सल्ला देणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढवणे, दर्जेदार शेतमालाचे उत्पादन; तसेच शेतमालाला हक्काची व शाश्वत बाजारपेठ मिळवून देणे यासाठी शासकीय, निमशासकीय व खासगी क्षेत्रात उपयुक्त असलेल्या प्रणाली शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात ५० हजार शेतकऱ्यांच्या एक लाख एकर क्षेत्राला त्याचा फायदा होईल. येत्या दोन वर्षांत ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.



## जलयुक्त शिवार अभियान २.०

जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत ५,८१८ गावांमध्ये ४,२२७ कोटी रुपये किमतीची १ लाख ४८ हजार ८८८ कामे हाती घेण्यात आली आहेत. अभियानातील सर्व कामे मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येतील.

## गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार

गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार ही योजना राज्यात कायमस्वरूपी राबवण्यात येणार आहे. २०२५-२६ मध्ये ६. ४५ कोटी घनमीटर गाळ काढण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यासाठी ३८२ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

## नदीजोड प्रकल्प

### वैनगंगा-नळगंगा

या प्रकल्पास तत्त्वत: मान्यता दिली आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ८८,५७४ कोटी रुपये असून प्रकल्पाचे लाभक्षेत्र ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर आहे. या प्रकल्पाचा लाभ नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा या सहा जिल्ह्यांना होणार आहे. प्रकल्पाची सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाची स्वतंत्र कामे सुरू आहेत.

### नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्प

प्रकल्पाद्वारे नाशिक व जळगाव जिल्हयातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ७,५०० कोटी रुपये आहे.

### दमणगंगा -एकदरे -गोदावरी नदीजोड प्रकल्प

या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाच्या लाभक्षेत्रातील ९,७६६ हेक्टर क्षेत्र पुनर्स्थापित होणार आहे. नाशिक जिल्ह्यातील २,९८७ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत २,३०० कोटी रुपये असून काम प्रगतिपथावर आहे.

### तापी महापुनर्भरण प्रकल्प

शासनाने महत्त्वाकांक्षी तापी महापुनर्भरण हा १९,३०० कोटी रुपये किमतीचा सिंचन प्रकल्प हाती घेण्याचे ठरवले आहे. या प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल होऊन त्यांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होणार आहे.

### पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी वळविणे

कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प हाती घेण्याचे नियोजन आहे. यातून मराठवाड्याला सुमारे २ लाख ४० हजार हेक्टर क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम प्रगतिपथावर आहे.

## म्हैसाळ उपसा सिंचन

सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ उपसा सिंचन योजनेसाठी २०० मेगावॅट क्षमतेच्या १,५९४ कोटी रुपये किमतीच्या सौर ऊर्जा प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे.

## गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प

गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पातून डिसेंबर २०२४ अखेर १२,३३२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असून हा प्रकल्प जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. २०२५-२६ करिता १,४६० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

Mrgabharti_75000

### उदंचन जलविद्युत प्रकल्प

या प्रकल्पाद्वारे वीजनिर्मिती व वीज वापराचे संतुलन साधून सुरळीत वीजपुरवठा करणे शक्य होणार आहे. सार्वजनिक व खासगी भागीदारीद्वारे राज्यातील ३८ उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून राज्यात २.९५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ९० हजार रोजगार निर्माण होणार आहेत.



### मोफत वीज

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेंतर्गत ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या ४५ लक्ष कृषी पंपांना मोफत वीज पुरवण्यात येत आहे. डिसेंबर २०२४ अखेर ७,९७८ कोटी रुपयांची वीज सवलत या योजनेद्वारे देण्यात येणार आहे.

### राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत २ लाख १३ हजार ६२५ लाभार्थी शेतकऱ्यांना येत्या दोन वर्षांसाठी २५५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात येईल.

### स्वयंचलित हवामान केंद्र

ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

### सांडपाणी प्रक्रिया व पाण्याचा पुनर्वापर

राज्यातील सर्व नगरपालिका क्षेत्रांतील सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्या पाण्याचा वापर उद्योग आणि शेतीसाठी करण्यात येणार आहे. त्यासाठी ८,२०० कोटी रुपये किमतीचा प्रकल्प हाती घेण्याचे नियोजन आहे.

### शेतीचा विकास शेतकऱ्यांचा उद्धार

#### बांबू लागवड

राज्यातील बांबू उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे, बांबूला बाजारपेठ उपलब्ध करून देणे; तसेच बांबू आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी राज्यात ४,३०० कोटी रुपये किमतीचा बांबू लागवड प्रकल्प राबवण्यात येईल.

#### आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष–२०२५

संयुक्त राष्ट्रसंघाने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केले आहे. त्या अनुषंगाने राज्यात विविध कार्यक्रम, महोत्सव आयोजित करण्यात येणार असून, त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

#### शेतमालाच्या मूल्यसाखळ्यांच्या विकासासाठी

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन-स्मार्ट प्रकल्पाच्या माध्यमातून लहान, सीमांत शेतकरी व कृषी नव उद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून शेतमालाच्या मूल्यसाखळ्यांच्या विकासासाठी २,१०० कोटी रुपये किमतीचा स्मार्ट प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

### मॅग्नेट २.०

नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून राज्य शाश्वत व उच्च मूल्य असलेल्या कृषी व्यवसायाचे केंद्र व्हावे, यासाठी महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क-मॅग्नेट २.० हा २,१०० कोटी रुपयांचा बाह्यसाहाय्यित प्रकल्प राबवण्यात येईल.

### गोसंवर्धन

देशी गायींचे संगोपन, संवर्धन आणि संशोधनासाठी देवलापार, जिल्हा नागपूर येथील गौ-विज्ञान अनुसंधान केंद्रास साहाय्य केले जाईल.

### बाजारपेठ सुविधा

नवी मुंबईत महामुंबई आंतरराष्ट्रीय बाजार, मुंबईत मरोळमध्ये आंतरराष्ट्रीय मत्स्य बाजार; तसेच आरमोरी, जिल्हा गडचिरोली येथे रेशीम कोष खरेदी-विक्री बाजारपेठ स्थापन करण्यात येईल.

### एक तालुका एक बाजार समिती

ज्या तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नाही, तेथे किमान एक स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याचे नियोजित आहे.

### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.०

कृषी क्षेत्रातील १६ हजार मेगावॅट विजेची मागणी हरित ऊर्जेतून पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शेतकऱ्यांना दिवसा विश्वासार्ह वीज पुरवठा करणे शक्य व्हावे, यासाठी २७ जिल्ह्यांमध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मधून २,७७९ विद्युत उपकेंद्रांसाठी सौर प्रकल्प हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले असून ते ऑक्टोबर २०२६ मध्ये पूर्ण होईल.

Mrgabharti_75000


## सौर कृषी पंप

जानेवारी २०२४ पासून आतापर्यंत २ लाख ९० हजार १२९ सौर कृषी पंप स्थापित करण्यात आले आहेत. सध्या प्रत्येक दिवशी सुमारे १,००० पंप या गतीने सौर कृषी पंपांची स्थापना करण्यात येईल.

## बळीराजा शेत व पाणंद रस्ते

बी-बियाणे, यंत्रसामग्री, खते आणि शेतमालाच्या वाहतुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या शेत व पाणंद रस्त्यांच्या बांधणीसाठी बळीराजा शेत व पाणंद रस्ते ही नवी योजना सुरू करण्यात आली आहे.

**सन २०२५-२६ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता कृषी विभागास ९,७१० कोटी रुपये, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विकास विभागास ६३५ कोटी रुपये, फलोत्पादन विभागास ७०८ कोटी रुपये, मृद् व जलसंधारण विभागास ४,२४७ कोटी रुपये, जलसंपदा व खारभूमी विभागास १६,४५६ कोटी रुपये, मदत व पुनर्वसन विभागास ६३८ कोटी रुपये, रोहयो विभागास २,२०५ कोटी रुपये, सहकार व पणन विभागास १,१७८ कोटी रुपये, अन्न व नागरी पुरवठा विभागास ५२६ कोटी रुपये नियत व्यय प्रस्तावित आहे.**

## सामाजिक क्षेत्र

**महिला, बालके, युवक, गरीब व वंचित घटकांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्यासाठी अन्नसुरक्षा, निवारा, पिण्याचे शुद्ध पाणी, आरोग्यसेवा, शिक्षण सुविधा आणि रोजगार-स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून त्याद्वारे सर्वसामान्य माणसांच्या जीवनात गुणात्मक बदल घडवण्यासाठी राज्यात लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या दृष्टीने राज्याचे आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करण्यात येईल.**

## सर्वांसाठी घरे

सर्वांसाठी घरे हे उद्दिष्ट ठेवून विविध गृहनिर्माण योजना सुरू केल्या आहेत. हे उद्दिष्ट येत्या पाच वर्षांत साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येईल. राज्यात प्रधानमंत्री आवास योजना, पीएम जनमन या केंद्र पुरस्कृत तर रमाई आवास, शबरी आवास, आदिम आवास, पारधी आवास, अटल बांधकाम कामगार वसाहत, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास, मोदी आवास; तसेच धर्मवीर आनंद दिघे घरकूल या योजना राबवण्यात येत आहेत. त्या अंतर्गत आतापर्यंत एकूण ४४ लाख ७ हजार घरकुले मंजूर करण्यात आली आहेत.



प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा - २ अंतर्गत सन २०२४-२५ करिता २० लाख घरकुलांच्या उद्दिष्टापैकी सुमारे १८ लाख ३८ हजार घरकुलांना मंजुरी दिली असून १४ लाख ७१ हजार लाभार्थींना पहिल्या हप्त्यासाठी २,२०० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. ही योजना राबवण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे.

लोकप्रतिनिधी आणि लाभार्थींच्या मागणीला प्रतिसाद म्हणून राज्य शासनाकडून या योजनेच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ करण्यात येणार आहे. या सर्व घरकुलांच्या छतावर सौर ऊर्जा संच बसवण्यात येतील.

## प्रधानमंत्री आवास योजना - शहरी

सर्वांसाठी घरे ही मा. प्रधानमंत्री महोदयांची महत्त्वाकांक्षी योजना आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत शहरी- १ अंतर्गत ४ लाख ४२ हजार ७४८ घरकुले मंजूर असून, त्यापैकी २ लाख ८ हजार ३०४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित घरकुलांचे बांधकाम ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

प्रधानमंत्री आवास योजना - शहरी २.० अंतर्गत पुढील पाच वर्षांसाठी ५ लाख घरकुलांचे उद्दिष्ट असून त्यासाठी ८,१०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नावीन्यपूर्ण बांधकाम, तंत्रज्ञानाचा वापर, हरित इमारती; तसेच सौर प्रणालीच्या वापरासाठी अधिकचे अनुदान देण्यात येईल.

## पंतप्रधान सूर्यघर वीज योजना

पंतप्रधान सूर्यघर वीज योजना ही महत्त्वाकांक्षी असून जी घरगुती सौरऊर्जा प्रणाली प्रोत्साहित करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून नागरिकांना सौरऊर्जा वापरण्यास प्रवृत्त करून विजेवरील अवलंबित्व कमी करणे व ऊर्जा स्वावलंबन वाढवणे, हे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत १ लाख ३० हजार घरगुती ग्राहकांनी ५०० मेगावॅटपेक्षा जास्त क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा संच स्थापित केले असून त्यांना आतापर्यंत १ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त अनुदानाचा लाभ देण्यात आला आहे.

० ते १०० युनिट वीज वापरणाऱ्या सुमारे १.५ कोटी वीज ग्राहकांना छतावरील सौर ऊर्जा संच खरेदीसाठी अनुदान देण्याची योजना राज्य शासनाकडून सुरू करण्यात येणार असून या योजनेमुळे येत्या काही काळात राज्यातील सुमारे ७० टक्के वीज ग्राहकांचे वीजबील टप्प्याटप्प्याने शून्यावर येईल.

## सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण

सातारा जिल्ह्यातील मान्याचीवाडी व टेकवडी या गावांना सौरग्राम म्हणून घोषित केले असून त्यांच्यासह अन्य ८ गावांचे सौर ऊर्जेद्वारे १०० टक्के विद्युतीकरण करण्यात येईल. याद्वारे वैद्यकीय महाविद्यालये

Mrgabharti_75000

आणि आरोग्य संस्थांसह राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर विद्युत यंत्रणा स्थापित करण्यात येईल.

### राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना

राज्यातील ५२,५०० रास्त भाव दुकानांमधील ई-पॉस मशिन इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांना जोडण्यात येत आहेत. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत सप्लाय चेन - ब्लॉक चेन तंत्रज्ञान वापरून स्वस्त धान्याची वाहतूक व वितरण प्रणाली अधिक पारदर्शक व कार्यक्षम करण्यात येणार आहे.

### जलजीवन मिशन

जलजीवन मिशन योजनेंतर्गत सुमारे १ कोटी ३० लाख कुटुंबांना नळजोडणी देण्यात आली आहे. २०२५-२६ मध्ये या योजनेकरिता ३,९३९ कोटी रुपये नियतव्यय इतका निधी उपलब्ध करण्यात येईल.

### गोदावरी खोरे पुनर्भरण व मराठवाडा ग्रीड प्रकल्प

गोदावरी खोरे पुनर्भरण व मराठवाडा ग्रीड हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या साहाय्याने राबवण्यात येणार आहेत. या प्रकल्पाची एकूण किंमत ३७,६६८ कोटी रुपये आहे.

### स्वच्छ भारत अभियान ग्रामीण टप्पा–२

स्वच्छ भारत अभियान ग्रामीण, टप्पा-२ अंतर्गत घनकचरा, सांडपाणी व प्लास्टीक कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक स्वच्छता संकुल; तसेच घरगुती स्वच्छतागृहांची कामे हाती घेण्यात आली असून २०२५-२६ मध्ये १,४८४ कोटी रुपये प्रस्तावित आहे.

### सर्वसामान्यांचे आरोग्य

प्रत्येक व्यक्तीला त्याच्या घरापासून ५ किलोमीटरच्या परिघात दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. आयुष्मान भारत-प्रधान मंत्री जनआरोग्य योजनेची ओळखपत्रे कालबद्ध पद्धतीने वितरित करण्यात येणार आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत अंगीकृत रुग्णालयांच्या संख्येत आवश्यकतेनुसार वाढ करण्यात येईल.

### रुग्णालयांची स्थापना

ठाणे येथे २०० खाटांचे, रत्नागिरी जिल्ह्यात १०० खाटांचे संदर्भ सेवा रुग्णालय आणि रायगड जिल्ह्यात २०० खाटांचे अतिविशेषोपचार रुग्णालय उभारण्यात येईल.



### आनंदवन

स्वर्गीय बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांनी स्थापन केलेल्या महारोगी सेवा समितीच्या अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीनिमित्ताने आनंदवनला देण्यात येणाऱ्या प्रतिरुग्ण पुनर्वसन अनुदानात भरीव वाढ करण्यात येईल. राज्यातील मागासवर्गीय व दुर्बल घटकांसाठी निवारा, वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण, पोषण; तसेच रोजगारासाठी योजना राबवण्यात राज्य अग्रेसर असून महायुती सरकार या घटकांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी कटिबद्ध आहे.

### अनुसूचित जाती कल्याण

अनुसूचित जाती घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थी वसतिगृहे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्तीसुधार योजना इत्यादी योजना राबवण्यात येत आहेत. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळाद्वारेही योजना राबवण्यात येत आहेत. अनुसूचित जाती उपयोजनेत गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ४२ टक्के एवढी भरीव वाढ करण्यात येईल.

### आदिवासी कल्याणासाठी

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना, नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान, आदर्श आश्रमशाळा, ठक्करबाप्पा आदिवासी विकास योजना; तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना आदी कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. आदिवासी उपयोजनेच्या तरतुदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ४० टक्के एवढी भरीव वाढ करण्यात येईल.

### इतर मागास व बहुजन कल्याण

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती; तसेच विशेष मागास प्रवर्गातील समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी आश्रमशाळा, विद्यानिकेतन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजना, तांडा वस्तीमुक्त वसाहत योजना आदी कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. धनगर तसेच गोवारी समाजाकरिता आदिवासी उपयोजनेच्या धर्तीवर एकूण २२ कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत.

### अल्पसंख्याक व दिव्यांगांच्या कल्याणासाठी

बौद्ध, जैन, शीख, पारशी, ख्रिश्चन, यहुदी व मुस्लीम या अल्पसंख्याक समुदायातील घटकांच्या विकासाकरिता विविध योजना

Mrgabharti_75000

राबवण्यात येत असून अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. दिव्यांगांसाठी शिष्यवृत्ती, कृत्रिम अवयव व साधने विकत घेण्यासाठी; तसेच स्वयंरोजगारासाठी अर्थसाहाय्य अशा योजना राबवण्यात येत आहेत. दिव्यांग कल्याणासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील किमान १ टक्के निधी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### विविध महामंडळे

राज्यातील विविध समाजाच्या उन्नतीसाठी १८ महामंडळे स्थापन करण्यात आली असून विविध योजनांचा लाभ घेणे लाभार्थींना सुलभ व्हावे, यासाठी या महामंडळांच्या सर्व योजना एकाच संकेतस्थळावर आणण्याचे नियोजन आहे.

**सन २०२५-२६ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागास २५,५८१ कोटी रुपये, आदिवासी विकास विभागास २१,४९५ कोटी रुपये, इतर मागास व बहुजन कल्याण विकास विभागास ४,३६८ कोटी रुपये, दिव्यांग कल्याण विभागास १,५२६ कोटी रुपये आणि अल्पसंख्याक विकास विभागास ८१२ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

### असंघटित कामगार कल्याण

असंघटित कामगार कल्याण आभासी महामंडळाकडून १ कोटी ७५ लाख असंघटित कामगार आणि शेतमजुरांसाठी सामाजिक सुरक्षा योजना राबवण्याचे नियोजन आहे.

### विशेष साहाय्य योजना

संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना; तसेच अन्य विशेष साहाय्य योजनांतील अर्थसाहाय्य सर्व लाभार्थींच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल.

### लेक लाडकी योजना

लेक लाडकी योजनेंतर्गत १ लाख १३ हजार लाभार्थींना थेट लाभ देण्यात आला आहे. २०२५-२६ मध्ये या योजनेकरिता ५० कोटी ५५ लाख रुपये निधी देण्यात येईल. मुलींच्या व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येईल. मान्यताप्राप्त उच्च आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या आणि ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थिनींना हा लाभ देण्यात येईल.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना जुलै २०२४ पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी ३३,२३२ कोटी रुपये खर्च झाला आहे. सन २०२५-२६ मध्ये या योजनेकरिता एकूण ३६ हजार कोटी रुपये नियत व्यय प्रस्तावित आहे. या योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग काही महिला बचतगटांनी आर्थिक उपक्रमासाठी बीज भांडवल म्हणून केला असून अशा बचतगटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्याचे विचाराधीन आहे.

### लखपती दीदी

**दीनदयाल अंत्योदय योजना -** राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत सुमारे २२ लाख महिलांना लखपती दीदी होण्याचा मान मिळाला असून २०२५-२६ मध्ये आणखी २४ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दिष्ट आहे.



### उमेद मॉल

नवी मुंबईत उलवेमध्ये १९४ कोटी १४ लाख रुपये किमतीच्या युनिटी मॉलचे काम प्रगतिपथावर आहे.

बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक उमेद मॉल उभारण्याचे शासनाने ठरवले असून पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यांसाठी १५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

### क्रीडा

ऑलिम्पिक, पॅराऑलिम्पिक, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदक मिळवण्यासाठी खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारांसाठी पदकप्राप्त खेळाडूंना देण्यात येणाऱ्या बक्षिसाच्या रकमेत घसघशीत वाढ करण्यात आली आहे. शिवछत्रपती क्रीडा संकुल, पुणे येथील क्रीडा सुविधांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. क्रीडा संकुलांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतील किमान १ टक्का निधी राखीव ठेवण्यात येणार आहे.

### क्रीडा स्पर्धांना वाढीव अनुदान

छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी; तसेच व्हॉलिबॉल स्पर्धा, स्वर्गीय खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धा, भाई नेरुरकर चषक खो-खो स्पर्धा या चार राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करून ते प्रत्येकी ७५ लाखावरून १ कोटी रुपये करण्यात येईल.

Mrgabharti_75000

**सन २०२५-२६ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृहनिर्माण विभागास १ हजार २४६ कोटी ५५ लाख रुपये, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागास ३,८७५ कोटी रुपये, सार्वजनिक आरोग्य विभागास ३,८२७ कोटी रुपये, उच्च व तंत्रशिक्षण विभागास ३ हजार ९८ कोटी रुपये, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास २ हजार ५७४ कोटी रुपये, महिला व बालविकास विभागास ३१,९०७ कोटी रुपये, शालेय शिक्षण व क्रीडा विभागास ३,४९६ कोटी रुपये नियत व्यय प्रस्तावित आहे.**

## हायटेक कमांड कंट्रोल सेंटर

मुंबईतील गुन्हेगारीस प्रतिबंध, जलद आपत्कालीन प्रतिसाद आणि प्रभावी सार्वजनिक सुरक्षेसाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवे हायटेक कमांड कंट्रोल सेंटर स्थापन करण्यात येईल.

## गुन्हे तपासात आधुनिक तंत्रज्ञान

गुन्ह्यांतील पुरावा शास्त्रोक्त पद्धतीने गोळा करून त्याच्या विश्लेषणाद्वारे दोषसिद्धीचे प्रमाण वाढण्यास मदत व्हावी, यासाठी २१ पथदर्शी फिरती न्यायवैद्यक वाहने लोकार्पित करण्यात आली आहेत.

सायबर सुरक्षेसंदर्भातील तज्ज्ञ मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र सायबर गुन्हे सुरक्षा महामंडळ स्थापित करण्यात येईल.

## पोलीस दलासाठी घरबांधणी अग्रीम

घरबांधणी अग्रीमाची मागणी करणाऱ्या पोलीस दलातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना अग्रीम देणे शक्य व्हावे, यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.

## न्यायालयांची स्थापना

राज्यात एकूण १८ नवीन न्यायालयांची स्थापना करण्यात आली असून दर्यापूर - जिल्हा अमरावती, पौड, इंदापूर व जुन्नर - जिल्हा पुणे, पैठण व गंगापूर - जिल्हा छत्रपती संभाजीनगर, आर्वी - जिल्हा वर्धा, काटोल - जिल्हा नागपूर, वणी - जिल्हा यवतमाळ, तुळजापूर - जिल्हा धाराशीव; तसेच हिंगोली येथील न्यायालयांचा समावेश करण्यात येईल.



**सन २०२५-२६ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृह-पोलीस विभागास २,२३७ कोटी रुपये, उत्पादन शुल्क विभागास १५३ कोटी रुपये, विधि व न्याय विभागास ७५९ कोटी रुपये व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास ५४७ कोटी रुपये नियत व्यय प्रस्तावित आहे.**

## पर्यटनासाठी

**महाराष्ट्राला निसर्गरम्य समुद्रकिनारा, प्राचीन लेण्या, गडकिल्ले, घनदाट वनसंपदा असा समृद्ध वारसा लाभला आहे. पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणुकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकूल वातावरण निर्माण करण्याकरिता पर्यटन धोरण-२०२४ जाहीर करण्यात आले आहे. येत्या १० वर्षांत पर्यटन क्षेत्रात १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्याचे आरोग्य पर्यटन धोरणही आखण्यात येईल.**

## ग्रामपंचायतीच्या बळकटीकरणासाठी

ग्रामपंचायतींना अधिक सक्षम बनविण्यासाठी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक प्रभावी व पारदर्शक करण्यासाठी ही योजना राबवण्यात येत आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी ही योजना महत्त्वपूर्ण आहे. त्यात भाग घेणाऱ्या अत्युत्कृष्ट ग्रामपंचायतींना तालुका पातळीपासून राज्य स्तरापर्यंत पुरस्कार देण्याचे प्रस्तावित आहे.

## योजनांचे सुसूत्रीकरण

राज्यात सध्या राबवण्यात येत असलेल्या योजनांचे मूल्यमापन करून त्यांचे सुसूत्रीकरण; तसेच साधनसंपत्तीच्या स्रोतांचा अभ्यास करून त्यामध्ये वाढ करण्याचे उपाय सुचवण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील.

**सन २०२५-२६ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नियोजन विभागास ९ हजार ६० कोटी ४५ लाख रुपये, वित्त विभागास २०८ कोटी रुपये, महसूल व वन विभागास २,९८१ कोटी रुपये नियत व्यय प्रस्तावित आहे.**

## आग्रा येथील शिवस्मारक

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारला जाणारा प्रस्तावित प्रकल्प आहे. मुघलांच्या नजरकैदेतून आग्र्याहून सुटका हा शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग आहे. छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, तेथे भव्य स्मारक उभारण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे. त्यासाठी उत्तर प्रदेश शासनाच्या सहकार्याने जागा उपलब्ध करून घेण्यात येईल.

Mrgabharti_75000



### स्मारकांसाठी

येणाऱ्या पिढ्यांना शिवरायांच्या स्फूर्तिदायी चरित्राची ओळख अद्ययावत तंत्रज्ञानाच्या आधारे करून देण्यासाठी पुणे शहरातील आंबेगाव येथे चार टप्प्यात भव्य शिवसृष्टी प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यातील दोन टप्प्यांचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम गतीने होण्यासाठी राज्य शासनाकडून आणखी ५० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

- छत्रपती संभाजी महाराजांचे पवित्र बलिदानस्थळ असलेल्या मौजे तुळापूर आणि समाधीस्थळ मौजे वढु बुद्रुक येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्यात येईल. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्याच्या संरक्षणासाठी असीम शौर्याने लढत सर्व लढायांवर विजय मिळवला. कोकणातील संगमेश्वर येथे त्यांनी औरंगजेबाच्या प्रचंड सैन्याशी मोजक्या मावळ्यांसह पराक्रमाची शर्थ केली. त्यांच्या शौर्याची आठवण कायम राहावी, म्हणून संगमेश्वर येथे भव्य स्मारक उभारण्यात येईल. दरवर्षी एका प्रेरणादायी गीताला छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार प्रदान करण्यात येईल.
- स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या लाखो मराठ्यांच्या शौर्याचे प्रतिक म्हणून हरियाणातील पानिपत येथे यथायोग्य स्मारक उभारण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे. हरियाणा शासनाच्या मदतीने या स्मारकासाठी जागा उपलब्ध करून घेण्यात येईल.



- चैत्यभूमी दादर, मुंबई येथे इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे काम सुरू असून त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- भारताचे दिवंगत पंतप्रधान, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मुंबई येथे भव्य स्मारक उभारण्यात येईल.
- स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी राज्य शासनाकडून २२० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- आद्य शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असलेल्या नायगाव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथे त्यांच्या कार्यास साजेसे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येईल.
- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे जन्मस्थळ वाटेगाव, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील स्मारकासाठी; तसेच त्यांच्या नावे प्रस्तावित चिरागनगर, मुंबई येथील संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- संगमवाडी, पुणे येथील वस्ताद लहुजी साळवे यांच्या स्मारकाचे काम प्रगतिपथावर आहे.

### सिंहस्थ कुंभमेळा

सिंहस्थ कुंभमेळा हा भक्तांसाठी श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिकतेचा महासंगम आहे. नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने नमामि गोदावरी अभियानाचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. कुंभमेळ्याच्या सुव्यवस्थित आयोजनासाठी विशेष प्राधिकरणाची स्थापना करून त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.



- नाशिक येथे रामकाल पथविकास प्रकल्पांतर्गत रामकुंड, काळाराम मंदिर आणि गोदातट परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी १४६ कोटी १० लाख रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येत आहेत.
- दुर्गम ते सुगम कार्यक्रमाद्वारे डोंगराळ भागातील प्राचीन मंदिरे, धार्मिक स्थळे, गडकिल्ले व इतर निसर्गरम्य ४५ ठिकाणे रोप-वेद्वारे जोडण्यात येणार आहेत.

Mrgabharti_75000

## प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन

भारतामध्ये अनेक प्राचीन मंदिरे स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमूना असून ते धार्मिक व सांस्कृतिक वारसा जपणारा महत्त्वाचा इतिहास आहे. म्हणून त्यांचे जतन आणि संवर्धन करणे गरजेचे आहे. राज्यातील प्राचीन मंदिरांचे जतन, संवर्धन व परिसर विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. महानुभव पंथाच्या श्रद्धास्थानांच्या विकासाची कामे हाती घेतली आहेत.

प्रभु रामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रामटेक येथील श्रीराम मंदिराच्या नूतनीकरणाचे काम सुरू असून दरवर्षी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्याचे नियोजन आहे.

## सागरी पर्यटनासाठी

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागरी संग्रहालय, कृत्रिम प्रवाळ आणि पाणबुडी पर्यटन ही ७५ कोटी रुपये किमतीची कामे प्रगतिपथावर आहेत.

## पर्यटन विकास

पाटण तालुक्यातील कोयना नगर; तसेच सातारा जिल्ह्यात स्कायवॉकची उभारणी व नेहरू उद्यानाचे सुशोभीकरण करण्यात येईल. मुनावळे, तालुका जावळी, जिल्हा सातारा येथील जलपर्यटन प्रकल्पाचा पहिला टप्पा पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे. हेळवाक, जिल्हा सातारा येथे कोयना जलपर्यटन प्रकल्पास मान्यता दिली आहे. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटात काचेचा स्कायवॉक उभारण्यात येणार आहे.

*अभिजात मराठी भाषा*
*भावफुलांना पायी उधळून*
*आयुष्याचा कापूर जाळून*
*तुझे सारखे करीन पूजन,*
*गीत तुझे मी आई गाईन*
*शब्दोशब्दी अमृत ओतून*

मायमराठीस केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्यातील जनतेच्या आणि जगभरातील मराठी भाषिकांच्या वतीने मी माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी महोदयांचे मन:पूर्वक आभार मानतो.

यापुढे दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन, तर ३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येईल.

मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे अभिजात मराठी भाषेच्या संशोधन व अध्ययनासाठी उच्च दर्जाचे संशोधन केंद्र; तसेच अनुवाद अकादमी स्थापित करण्यात येईल.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून अभिजात मराठी भाषाविषयक उपक्रम राबवण्यात येतील. मराठी भाषेच्या संशोधनातील उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार सुरू करण्यात येणार आहे.

**सन २०२५-२६ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सार्वजनिक बांधकाम- इमारती विभागास १,३६७ कोटी रुपये, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागास ३,१५९ कोटी रुपये, सामान्य प्रशासन विभागास २,८९९ कोटी रुपये, मराठी भाषा विभागास २२५ कोटी रुपये नियत व्यय प्रस्तावित आहे.**

## सुधारित अंदाज सन २०२४-२५

सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये महसुली जमा अपेक्षित होती. महसुली जमेचे सुधारित अंदाज ५ लाख ३६ हजार ४६३ कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहेत.

सन २०२४-२५ च्या एकूण खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपये व सुधारित अंदाज ६ लाख ७२ हजार ३० कोटी रुपये असून, भांडवली व कल्याणकारी योजनांवरील खर्चात झालेल्या वाढीमुळे सन २०२४-२५ या वर्षाच्या एकूण खर्चाच्या सुधारित अंदाजात वाढ झाली आहे.

## जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६

**सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २०,१६५ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही तरतूद २ हजार कोटी रुपयांनी अधिक आहे.**

## वार्षिक योजना सन २०२५-२६

सन २०२५-२६ मध्ये कार्यक्रम खर्चाची रक्कम २ लाख ५४ हजार ५६० कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी २२,६५८ कोटी रुपये, तर आदिवासी घटक कार्यक्रमासाठी २१,४९५ कोटी रुपये नियत व्ययाचा समावेश आहे.

## अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२५-२६

सन २०२५-२६ च्या अर्थसकंल्पामध्ये एकूण खर्चासाठी ७ लाख २० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपये व महसुली खर्च ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी ४५ हजार ८९१ कोटी रुपये अंदाजित तूट येत आहे.

## राजकोषीय तूट

राजकोषीय सुधारणांमध्ये राज्य नेहमीच अग्रेसर राहिले आहे. राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. सन २०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे.

Mrgabharti_75000

## जनहितकारी अर्थसंकल्प

१. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट ३ लाख ४३ हजार ४० कोटी रुपये एवढे निश्चित करण्यात आले होते.
२. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा स्वतःच्या कर महसुलाचा सुधारित अंदाज ३ लाख ६७ हजार ४६७ कोटी रुपये एवढा प्रस्तावित करण्यात आला आहे.
३. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी राज्याच्या स्वतःच्या कर महसुलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट ३ लाख ८७ हजार ६७४ कोटी रुपये एवढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

## राज्य कर विभागाची अभय योजना

वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्य कर विभागातर्फे राबवण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबत मी अभय योजना जाहीर करीत आहे. या अभय योजनेचे नाव महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ असे असेल. या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांकापासून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल.

## सीएनजी व एलपीजी वाहनांवरील करात वाढ

सध्या व्यक्तिगत मालकीच्या परिवहनेतर चारचाकी सीएनजी व एलपीजी वाहनांवर वाहन प्रकार आणि किमतीनुसार ७ ते ९ टक्के दराने मोटार वाहन कराची आकारणी केली जाते. या कराच्या दरांमध्ये १ टक्क्याने वाढ प्रस्तावित करत आहे. सदर दरवाढीमुळे राज्यास २०२५-२६ मध्ये सुमारे १५० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

## इलेक्ट्रिक वाहनांवरील वाहन कर

राज्यात रुपये ३० लाखांपेक्षा अधिक किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर ६ टक्के दराने मोटार वाहन कराची आकारणी करण्याचे प्रस्तावित करत आहे.

## मोटार वाहन कराच्या कमाल मर्यादा

मोटार वाहन कराची कमाल मर्यादा ही २० लाख रुपयांवरून ३० लाख रुपये असे करण्याचे प्रस्तावित करत आहे. कमाल मर्यादेत प्रस्तावित वाढीमुळे सन २०२५-२६ मध्ये राज्याला सुमारे १७० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

## बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर कर

बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेन्स, कॉम्प्रेसर, प्रोजेक्टर्स आणि एस्कॅव्हेटर्स या प्रकारातील वाहनांना अनिवार्यपणे एकरकमी वाहनाच्या किमतीच्या ७ टक्के दराने मोटार वाहन कर आकारण्याचे प्रस्तावित करत आहे. प्रस्तावित मोटार वाहन कर सुधारणेमुळे सन २०२५-२६ मध्ये राज्याला सुमारे १८० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

## हलक्या मालवाहतूक वाहनांवरील (एलजीव्ही) मोटार वाहन कर

राज्यात ७,५०० किलो वजनापर्यंतच्या मालवाहतूक करणाऱ्या हलक्या वाहनांवर (एलजीव्ही) अनिवार्यपणे एकरकमी वाहनांच्या किमतीच्या ७ टक्के दराने मोटार वाहन कर आकारण्याचे प्रस्तावित करत आहे. प्रस्तावित मोटार वाहन कर सुधारणेमुळे सन २०२५-२६ मध्ये राज्याला सुमारे ६२५ कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणे अपेक्षित आहे.

## पूरक दस्तऐवजासाठीचे मुद्रांक शुल्क

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ४ नुसार एकाच व्यवहाराच्या पूर्ततेसाठी एकापेक्षा जास्त दस्तऐवजांचा वापर केल्यास, पूरक दस्तऐवजांना १०० रुपयांऐवजी ५०० रुपये इतके मुद्रांक शुल्क आकारण्याचे प्रस्तावित करत आहे.

## महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अभिनिर्णय प्रकरणे

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ३१ (१) नुसार एखाद्या दस्तावर भरावयाच्या मुद्रांक शुल्काबाबत दस्त अभिनिर्णय प्रक्रियेसाठी सध्या आकारण्यात येणारे शुल्क १०० रुपयांऐवजी १,००० रुपये इतके करण्याचे; तसेच निष्पादित दस्त अभिनिर्णयासाठी दाखल करताना प्रथमदर्शनी देय असणाऱ्या मुद्रांक शुल्काची रक्कम जमा करण्याची तरतूद प्रस्तावित करत आहे.

## ई-मुद्रांक प्रमाणपत्र

नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने मुद्रांक शुल्काचा भरणा करणे व प्रमाणपत्र देणे हे सुलभ व्हावे, यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम १० (३) व (४) मध्ये ई-मुद्रांक प्रमाणपत्राची नवीन तरतूद लागू करण्याचे प्रस्तावित करत आहे.

हा अर्थसंकल्प म्हणजे विकासचक्राला गती देण्यासाठी, संकल्पना आणि कृती यांचा घातलेला संतुलित मेळ आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन, नागरिक यांनी एकत्रित येऊन प्रयत्न करणे आवश्यक आहे. विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी सर्वांनी मिळून हातभार लावण्याची हीच वेळ आहे.

***विकास संकल्प। विकासाचा ध्यास ।।***
***मनी धरू आस। विकासाची ।।***
***विकासचक्राला। देऊनिया गती ।।***
***साधुया प्रगती। वेगातची ।।***
***मिळोनिया सारे। राज्य विकसित ।।***
***राष्ट्र विकसित । करू चला ।।***
***राष्ट्र विकसित । करू चला ।।***
***राज्य विकसित । करू चला ।।***

(दि.१० मार्च २०२५ रोजी विधानसभेत मा. उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार आणि ॲड. आशिष जयस्वाल यांनी विधानपरिषदेत २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला.)

Mrgabharti_75000

**प्रशासकीय सेवेत कार्यरत असताना तिथल्या मर्यादा सांभाळून संवेदनशीलता जपत व्यक्त होता येते. सेवेत कार्यरत असणाऱ्या महिला अधिकाऱ्यांना आपल्या व्यस्त वेळेमध्ये आवडत्या क्षेत्राप्रति आपली निष्ठा व्यक्त करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. नियमांच्या चौकटीत राहून आपल्या अंतरंगातल्या भावभावनांचा आविष्कार उलगडण्यासाठी महिलांना योग्य ते व्यासपीठ हवे असते. राज्याच्या प्रशासनामध्ये वरिष्ठ पदांवर काम करणाऱ्या महिला अधिकाऱ्यांच्या अशाच एका आविष्काराने त्यांच्यातल्या रसिक संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवले.**

# स्त्रीशक्तीचा प्रातिभिक आविष्कार!

**सुजाता सौनिक,** मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रशासकीय सेवेत कार्यरत असताना मर्यादा सांभाळून संवेदनशीलता जपत व्यक्त होता येते. चौकटीत राहून आपले कर्तव्य पार पाडावे लागते. नियमांचे पालन, शिस्तबद्धता, वस्तुनिष्ठता आणि तर्काधिष्ठित निर्णय या सगळ्या गोष्टी आवश्यक असतात. अशा वातावरणात काम करताना अनेकदा स्वतःच्या भावनांना, संवेदनांना आणि अंतःप्रेरणांना व्यक्त करण्याची फारशी संधी मिळत नाही. मनात अनेक विचार, भावना रुंजी घालत असतात, अशा पार्श्वभूमीवर आपल्या भावना अधिक प्रगल्भ, खोल, अनुभवसमृद्ध आणि संवेदनशील कवितेमधून, लेखनातून किंवा इतर कलांच्या माध्यमातून वेळोवेळी प्रकट होत असतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक वेगळे, मनोहारी रूप प्रकट होते. हे रूप केवळ त्यांच्या प्रशासनातील भूमिकेपुरते मर्यादित राहत नाही, तर समाजाशी, जीवनाशी आणि मानवी भावनांशी त्यांचा असलेला नाजूक आणि विचारशील संबंधही प्रकट होत असतो.

एनसीपीए सभागृहात नुकताच पार पडलेला 'चौराहा - एक बहुभाषिक काव्यसंध्या' हा कार्यक्रमही अशाच एका प्रतिभासंपन्न आणि संवेदनशील प्रवासाची साक्ष देणारा एक सुंदर अनुभव ठरला. जिथे प्रशासकीय सेवेत उच्च पदांवर कार्यरत असलेल्या महिला



Mrgabharti 75000

अधिकाऱ्यांनी कवितेच्या माध्यमातून आपले अंतर्मन उलगडले. या कवितांमधून त्यांनी स्वतःच्या अनुभवांचा, दृष्टिकोनाचा आणि समाजातल्या स्त्रीच्या भूमिकेचा वेध घेतला.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे राज्य प्रशासनातील वरिष्ठ महिला अधिकारी ज्यांच्या रोजच्या आयुष्यात निर्णय, धोरण, प्रशासकीय कारभार आणि केंद्रस्थानी असलेली मंडळी असतात; पण या मंचावर त्यांना आपल्या कवितेच्या माध्यमातून भावना, अनुभव आणि अंतरंगातील विचार प्रकट करण्याची संधी मिळाली. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला झालेला हा उपक्रम म्हणजे केवळ एक काव्यसंध्या नव्हती, तर स्त्रीशक्तीच्या बदलत्या रूपांचे आणि तिच्या आत्मभानाच्या जाणिवेचे सुंदर प्रतिबिंब होते.

कार्यक्रमाची सुरुवात झाली ती राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या सादरीकरणाने. त्यांनी सादर केलेली अमृता प्रीतम यांची कालजयी कविता *'अज्ज आखाँ वारिस शाह नूं, कितों कबरां विच्चों बोल'* ही फाळणीच्या वेदनांवर आधारलेली असून आजही तिचे सामर्थ्य तसेच आहे. ही कविता केवळ एक ऐतिहासिक साक्षच नव्हे, तर मानवी भावनांचे अत्यंत प्रखर आणि विदारक दर्शन आहे. तिच्या सादरीकरणातून उपस्थितांच्या मनात एक भावनिक तरंग उमटला.

त्यानंतर विविध विभागांतील वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांनी आपापल्या कविता सादर केल्या. या कविता म्हणजे त्यांच्या आयुष्यातील अनुभव, विचार आणि अंतर्मनातील संवेदनांचा प्रवाह होता. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी सादर केलेली 'टपाल' ही कविता एक वेगळाच रस आणि विनोद यांचे मिश्रण घेऊन आली. ही कविता अनुपकुमार यादव यांनी लिहिलेली असून प्रशासकीय कार्यालयातील नमुनेदार अनुभव या कवितेतून टिपला आहे. दैनंदिनी आठवडी टपालाने अहवाल पाठवा, बैठकीसाठी हवा आहे, तत्काळ पाठवा, पाठवले तरी मिळाले नाही म्हणून पाठवा, बाबूने हरवले आहे म्हणून पाठवा, मिळाले तरी सापडले नाही पुन्हा पाठवा, प्रपत्र भरून जोडले नाही पुन्हा पाठवा, ऑनलाइन, फॅक्स पाठवा, रजिस्ट्री पाठवा, ई-मेल पाठवा, शिपाई पाठवा, मेल किंवा फिमेल पाठवा, पाठवा पाठवा पाठवा... या ओळींनी श्रोत्यांमध्ये हशा पिकला.

कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी 'अभिव्यक्ती' ही कविता सादर करत आपल्या अंतर्मनातील विचार मांडले. त्यांच्या कवितेतील स्वातंत्र्याची आकांक्षा आणि आयुष्याचे मोकळेपण सर्वांनाच हवेहवेसे वाटले. 'आयुष्य मुक्तपणे जगा' या आशयाच्या सादरीकरणात इंग्रजी कवितेनेही ठसा उमटवला.

मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे यांनी कवयित्री नीरजा यांची कविता सादर केली. त्यात स्त्रीच्या आत्मभानाची आणि अंतःप्रेरणेची नोंद होती. त्यानंतर सिंधूताई सपकाळ यांची *'किती बंडखोरी वसे आत माझ्या...'* ही कविता सादर झाली. ही कविता केवळ शब्द नव्हती, ती एक संघर्षगाथा होती. *'जरा त्या सुखाची कमी कौतुके कर, कधी वेदनाही म्हणाव्यात माझ्या'* या ओळी स्त्रीजीवनातील दुःख, आशा आणि बळ यांची साक्ष देणाऱ्या ठरल्या.

कार्यक्रमात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टच्या संचालक निधी चौधरी आणि ज्येष्ठ पत्रकार गिरीश कुबेर यांनीही सहभाग घेतला. त्यांची सादरीकरणेदेखील हृदयस्पर्शी आणि आशयघन होती. या सगळ्या कवितांमध्ये एकसूत्रता होती. स्वानुभवातून उमटणारा सामाजिक भानाचा सूर, स्त्रीच्या दृष्टिकोनातून मांडलेले सत्य आणि आपल्या अस्तित्वाचा अभिमान सादर केलेल्या कवितांमधून व्यक्त होत होता.

नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्टच्या संचालक निधी चौधरी यांनी स्वरचित कविता सादर केल्या.

*क्षणभंगुर आज हूँ कल नहीं, शायद अगले पल नहीं,*
*फिर भी कर्मों में बंधी,अपने धर्मों में धंसी,*
*जीवन को लेना चाहूँ समेट, अपनी बाहों में लपेट,*
*मृत्यु को नकार कर, जीवन को पुकार कर,*
*जीना चाहूँ अनेक वर्ष, जीवन मृत्यु के खेल में,*
*सुख-दुःख की रेलमपेल में,*
*मैं क्षणभंगुर! मैं क्षणभंगुर!*

या त्यांच्या कवितेने वातावरण भारावून गेले.

'चौराहा' या बहुभाषिक काव्यसंध्येचा सारांश म्हणजे प्रशासकीय पदांवरील जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या महिलांच्या हृदयात दडलेली संवेदनशीलता आणि प्रतिभा रसिकांना अनुभवता आली.

या काव्यसंध्येमुळे स्त्रीच्या आत्मभानाचा, तिच्या संघर्षांचा, आणि सामाजिक बदलात तिच्या सहभागाचा गौरव अनुभवता आला.

या कार्यक्रमामुळे स्त्री केवळ कर्तव्यशील अधिकारी नसते, तर ती एक सर्जनशील, विचारवंत आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व असते. तिच्या हातात जर राज्यकारभार आहे, तर हृदयात काव्यही आहे. तिच्या निर्णयांमध्ये जर तर्क आहे, तर भावनांचा सागरही आहे. 'चौराहा' ही काव्यसंध्या म्हणजे स्त्रीशक्तीच्या या विविध पैलूंचा एक सुंदर, गूढ आणि गहिरा अनुभव ठरला. ज्याला उपस्थित प्रत्येक श्रोत्याने अंतर्मनातून अनुभवले आणि स्मरणात साठवून ठेवले.

'एनसीपीए'च्या पहिल्या महिला संचालक विजया मेहता यांनी २० वर्षांपूर्वी या कार्यक्रमाची सुरुवात केली होती. या ऐतिहासिक साहित्य उपक्रमाची पुन्हा सुरुवात करण्यात आली. प्रशासकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला अधिकाऱ्यांनी आपल्या व्यग्र दिनचर्येतून वेळ काढून साहित्य क्षेत्राप्रति आपली निष्ठा दाखवली. मंत्रालयाच्या भिंतीतल्या कर्तव्यकठोर अधिकाऱ्यांच्या संवेदनशीलतेचे दर्शन या निमित्ताने रसिकांना घडले.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, एनसीपीएचे मुख्य तांत्रिक अधिकारी नयन काळे; तसेच मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारीही उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभागाच्या लीना संखे, उपसचिव अजित कवडे यांनी आभार मानले.

**शब्दांकन : संध्या गरवारे,** विभागीय संपर्क अधिकारी

Mrgabharti_75000

**सावित्रीबाई फुले यांचे जीवन म्हणजे शिक्षण, समाजसुधारणा, स्त्री-सशक्तीकरण आणि समतेची प्रेरणादायी गाथा आहे. त्यांचे योगदान भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी अमूल्य आहे आणि आजही त्या प्रेरणादायी आहेत. सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षणतज्ज्ञ नव्हत्या, तर त्या समाजसुधारक, कवी, लेखक, आणि स्त्री-मुक्ती चळवळीच्या अग्रणी होत्या. त्यांचे व्यक्तिमत्त्व अनेक पैलूंनी समृद्ध होते.**

# स्त्री शिक्षणाचा पाया...

**डॉ. छाया महाजन**

आपल्या मनात काही समीकरणं तयार झालेली असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे संविधान, महात्मा गांधी म्हणजे सत्याग्रह, मदर टेरेसा सेवा; तसेच सावित्रीबाई फुले म्हणजे स्त्री शिक्षण.... क्रांतिज्योती सावित्रीबाई यांच्यामध्येही शिक्षणाचा भाग मला सर्वाधिक वाटतो. ज्याप्रमाणे धाडसी, कर्तृत्ववान स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू असतात, तसेच सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत.

## स्त्री शिक्षणाचे कार्य

स्त्री नव्या पिढीला आकार देऊ शकते, याची जाणीव असल्याने त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. अर्थात त्यांच्या पाठीशी जोतिबा फुले हे एखाद्या दीपस्तंभासारखे सतत उभे होते हे खरे आहे. कारण शिक्षण हा तिसरा डोळा आहे, हे जोतिबांचे तत्त्व होते. साधारण १५० वर्षांपूर्वी जेव्हा स्त्रियांना अजिबात स्वातंत्र्य नव्हते, अशा प्रतिकूल परिस्थितीत स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ सावित्रीबाईंनी रोवली. त्यांनी मुलींची पहिली शाळा १८४८ मध्ये तात्याराव भिडेंच्या वाड्यात सुरू केली. अर्थातच प्रस्थापितांना हे अजिबात मान्य नव्हते, आवडण्यासारखे नव्हते. त्यात एक तळागाळातील स्त्री शिक्षिकेचे काम करते हे तर अगदीच अमान्य. शाळा बंद पाडण्यासाठी सावित्रीबाईंना खूप त्रास दिला गेला. रस्त्याने जाताना अंगावर चिखल फेकणे, शेण फेकणे, दगड मारणे, अचकटविचकट बोलणे, निंदा नालस्ती करणे हे प्रकार व्हायचे. त्यामुळे शाळेचा एक शिपाई आणि बदलण्यासाठी दुसरे पातळ त्या बरोबर ठेवत, याचा परिणाम होत नाही म्हणून प्रस्थापितांनी त्यांच्या सासऱ्यांना धमकावले तुमची अब्रू जाईल, धर्म बुडेल, तुम्हाला जाती बाहेर वाळीत टाकू, अशा धमक्या दिल्याने सात्त्विक माणूस धास्तावला. त्यांनी मुलाला आणि सुनेला हे शिक्षणकार्य बंद करा नाहीतर घराबाहेर जा असे सांगितले. महात्मा जोतिबा फुले यांना समजावण्याचा काही फायदा झाला नाही आणि शेवटी ते गंजपेठेत राहायला गेले आणि शिक्षणाचे कार्य सुरूच ठेवले. पुढे जागोजागी १८ शाळा काढल्या. दलितांच्या वस्तीमध्येदेखील शाळा काढल्या. परिणामतः मुलींना शिकवण्यासाठी शिक्षकांचा अभाव जाणवला, तसे ट्रेनिंग स्कूल काढले. फातिमा शेख या पहिल्या मुस्लीम शिक्षिका आणि सावित्रीबाई या पहिल्या भारतीय शिक्षिका! अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाची ज्योत पेटवून त्याची मशाल बनलेल्या सवित्रीबाई म्हणजे खऱ्या क्रांतिज्योती होय.

## महिला सेवा मंडळ

हरी नरके म्हणतात की, 'सावित्रीबाईंनी शिकवण्यासाठी घराच्या उंबऱ्याबाहेर टाकलेले पाऊल हीच आधुनिक भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात आहे.' सामाजिक दुष्ट रूढी, परंपरा, अन्यायाविरुद्ध त्या झगडल्या. न्याय आणि हक्कासाठी लढणाऱ्या त्या बंडखोर स्त्री होत्या. विधवा आणि विधवा माता यांना कस्पटासमान वागणूक मिळत होती. महात्मा फुले यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली होती. सावित्रीबाई या मंडळाच्या सेक्रेटरी होत्या. खरं म्हणजे फुले यांच्या प्रत्येक संकल्प आणि प्रकल्पाच्या त्या कार्यकारी सहकारी होत्या. ही संस्था स्त्री चळवळींना गतिमान करणारी होती. प्रौढ शिक्षण, विधवा



Mrgabharti 75000

पुनर्विवाह या हेतूंबरोबर अन्यायाविरुद्ध लढा देणे ही कामे सुरू असायची. हळदी-कुंकू समारंभासारखे सामूहिक समारंभ आयोजित करून जाती-पातीच्या भिंतींना सुरुंग लावण्याचे कामही त्या धाडसाने करायच्या. विशेष म्हणजे यात ब्राह्मण स्त्रियांनाही जाहीर आमंत्रण असायचे. विधवा स्त्रियांना मिळणारे मातृत्व ही कलंकित बाब. त्यात भ्रूणहत्या, बालहत्या होत. हे पाहून या दाम्पत्याने बालहत्या प्रतिबंध गृह काढले. त्याची सर्व जबाबदारी सावित्रीबाईंवर होती. ही भारतातील अशा प्रकारची पहिली संस्था होती. यामुळे असंख्य विधवांना आधार मिळाला. त्यात त्या बालकांची जबाबदारीही सावित्रीबाई घेत. अशाच एका विधवेचा मुलगा यशवंत त्यांनी दत्तक घेतला. पुढे त्याला शिकवून डॉक्टर केले. त्याकाळी विधवांची स्थिती शोचनीय होती. त्यांना मोकळेपणाने वावरता येत नव्हते. तिला पांढऱ्या पायाची म्हणून हिणवले जायचे. शुभकार्यात जाण्यासाठी त्यांना मज्जाव होता. पुनर्विवाहास मान्यता नव्हती, या गोष्टींचे या दाम्पत्याला वाईट वाटायचे. यातून १८८४ ला त्यांनी पहिला विधवा विवाह घडवून आणला. विधवा विवाह संस्था या कार्यासाठी वाहिली गेली.

## काव्यफुले

सावित्रीबाईंचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. सगळी कार्यक्षमता पाहताना त्यांची संवेदनशीलता जाणवते. त्यांनी शिक्षण, जातीयता, निसर्ग, उपदेशपर अशा अनेक विषयांवर कविता केल्या. 'बावनकशी सुबोध रत्नाकर'मध्ये प्राचीन काळची सामाजिक परिस्थिती, अंधश्रद्धा, रूढी, जातीभेद अशा विषयांवर लिहून त्यामुळे होणाऱ्या सामाजिक अधोगतीबद्दलही लिहिले आहे.

'काव्यफुले' हा सावित्रीबाई फुले यांचा पहिला काव्यसंग्रह असून तो १८५४ साली प्रकाशित झाला. हा संग्रह म्हणजे स्त्रियांवरील अन्याय, शिक्षणाचे महत्त्व आणि सामाजिक सुधारणेचा प्रभावी संदेश देणारा साहित्यिक दस्तऐवज आहे. या कवितांमधून त्यांनी अशिक्षित महिलांना शिक्षणाची प्रेरणा दिली आहे. समाजातील अस्पृश्यता, अज्ञान, अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यात आला आहे. तसेच या कवितांमध्ये स्वाभिमान, आत्मसन्मान आणि विद्रोहाचाही सूर मिळालेला आहे. सावित्राबाई फुले यांच्या कवितांमधून प्रामुख्याने स्त्री शिक्षण, आत्मसन्मान, सामाजिक समानता आणि प्रगतीचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

## बावनकशी सुबोध रत्नाकर

'बावनकशी सुबोध रत्नाकर' हा सावित्रीबाई फुले यांचा दुसरा महत्त्वाचा साहित्यसंग्रह आहे. या ग्रंथात सामाजिक सुधारणा, स्त्री-पुरुष समानता, स्त्री-सशक्तीकरण आणि सामाजिक परिवर्तन आणि सत्यशोधक विचारांचा प्रभाव दिसतो येतो. सावित्रीबाई फुले यांचे साहित्य फक्त कविता नसून सामाजिक क्रांतीचे घोषवाक्य होते. त्या आपल्या लेखनातून शिक्षण, समता आणि न्यायाचा संदेश देत राहिल्या. त्यांचे काव्य आजही प्रेरणादायी असून सामाजिक परिवर्तनासाठी मार्गदर्शक आहे.

## आरोग्य सेवेसाठी कार्य

विधवेचे केशवपन हा अत्यंत अशोभनीय, अन्यायकारी आणि विटंबना करणारा प्रकार होता. ही अवहेलना थांबवण्यासाठीच्या परिषदेलाही सावित्रीबाईंनी पुढाकार घेतला होता. महाराष्ट्रात १८७६ व १८९६ साली भयंकर मोठा दुष्काळ पडला होता. लोकांची अन्नान्नदशा होती. यात त्यांनी मोलाची कामगिरी केली. अनेक मदतकेंद्रे उभी करून दोन हजार मुलामुलींच्या जेवणाची सोय केली. या दाम्पत्याने आपली विहीर अस्पृश्यांना खुली केली. साथ प्लेग यांसारख्या साथीच्या रोगाच्या संकरात त्यांनी प्लेग निवारण केंद्रे सुरू केली. त्यावेळी जोतिबा हयात नव्हते. सावित्रीबाईंनी एकटीने ही जबाबदारी घेतली. त्यांना दीन-दुबळ्यांचा फार कळवळा होता. त्यांनी रोग्यांना खांद्यावर नेऊन उपचार करवले; पण हे त्यांनाच प्राणघातक ठरले. त्यांना प्लेगचा उपसर्ग झाला आणि त्यातच त्या गेल्या. जोतिबा त्यांचे स्फूर्तिस्थान होते. त्यांच्यावरच्या कविताही यात आहेत. त्यांनी माहेरहून जोतिबांना लिहिलेली सुरेख पत्रेही साहित्यात मोडतात. काव्यफुले, 'बावनकशी सुबोध रत्नाकर', जोतिबांची संपादन केलेली 'भाषणे भाग १ ते ४', 'जातीयांना लिहिलेली पत्रे', 'सावित्रीबाईंची भाषणे व गाणी' इ. त्यांची पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत.



मुख्य म्हणजे सावित्रीबाई फुले या ग्रंथ लिखाणाचा विषय आहे, हे पदोपदी जाणवताना त्यांच्या सामाजिक जागृत मनासमोर आणि कार्यासमोर आपण नतमस्तक होतो.

**(लेखिका या ज्येष्ठ साहित्यिक आहेत.)**

Mrgabharti_75000

**समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महिला सबलीकरण अत्यावश्यक आहे. कारण समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासाशिवाय देशाचा संपूर्ण विकास शक्य नाही. महिलांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीयदृष्ट्या सक्षम केल्याशिवाय समृद्ध आणि संतुलित समाजाची निर्मिती होऊ शकत नाही. समाजाला प्रगती करायची असेल, तर महिलांचे सबलीकरण अनिवार्य आहे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, सुरक्षा आणि सन्मान या चार गोष्टी प्रत्येक महिलेला मिळाल्या पाहिजेत. महिलांना समान संधी देणे म्हणजे केवळ त्यांच्या हिताचे नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहे. त्यासाठी राज्य शासनाचा महिला व बालविकास विभाग पुढाकार घेत आहे.**

# महिला उन्नतीची नवी दिशा

स्त्री ही केवळ माता, पत्नी किंवा बहीण नसून, ती समाजाच्या प्रगतीचा खरा आधार आहे. इतिहास साक्षी आहे की, स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात आपले अमूल्य योगदान दिले आहे. राजमाता जिजाऊ, महाराणी ताराबाई, सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी सर्वांगीण प्रगतीसाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे.

पूर्वीच्या काळी महिलांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला; पण आज परिस्थिती हळूहळू बदलत आहे. स्त्रिया शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, क्रीडा आणि कला अशा प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. मात्र अजूनही काही अडथळे आहेत. लैंगिक भेदभाव, असमान वेतन, हिंसा आणि संधींच्या मर्यादा आहेत.

## आर्थिक स्वावलंबन

भारतीय राज्यघटनेने दिलेल्या समानतेच्या हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी; तसेच महिलांचे सक्षमीकरण व विकासासाठीचे सर्वांगीण, सर्वसमावेशक असे राज्याचे ४ थे अष्टसूत्री महिला धोरण २०२४ जाहीर करण्यात आले आहे. २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तींच्या शासकीय दस्तऐवजांमध्ये आईचे नाव नोंदविणे बंधनकारक करण्याचा निर्णय मंत्री कु. आदिती तटकरे यांच्या पुढाकाराने घेण्यात आला आहे.



गृहिणींना लघु उद्योगाचा मार्ग गवसावा आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलांची आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल व्हावी, यासाठी ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेच्या लाभार्थींना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या साहाय्याने उद्योग सुरू करण्यास सहकार्य केले आहे. अशा हजारो महिलांना स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याचा मार्ग मिळाला आहे. याचबरोबर महिलांचा प्रवास सुरक्षित व्हावा; तसेच त्यांना अर्थार्जन मिळावे, यासाठी ‘पिंक ई रिक्षा’चे वितरण केले आहे. यासाठी अर्थसाहाय्य आणि रिक्षा चालवण्यासाठी इतर सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ८ जिल्ह्यांतील प्रमुख शहरातील १० हजार महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध झाला असून, यामुळे महिलांचा सुरक्षित प्रवास सुरू झाला आहे. मुलगी जन्माला आल्यापासून ‘लेक माझी लाडकी’ या अर्थसाहाय्य करणाऱ्या योजनेपासून तिचे शिक्षण, सामाजिक संरक्षण, न्यायिक हक्क प्रदान करण्यासाठी राज्य महिला आयोग कार्यरत आहे.

निराधार, निराश्रित, परित्यक्ता, कुमारी माता, संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना आश्रय, संरक्षण मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी महिला वसतिगृह, स्वीकार केंद्र, राज्यगृहे विभागामार्फत राज्यभर चालवण्यात येतात. महिलांच्या विकासासाठी महिला व बालकल्याण समिती, हुंडा निर्मूलन दक्षता समिती, महिला मंडळांना अनुदान देण्यात येते. व्यावसायिक प्रशिक्षण मार्गदर्शन, कायदेविषयक सल्ला, आपद्ग्रस्त महिलांना आधार देण्याबाबत मदत करण्यासाठी बहुउद्देशीय महिला केंद्रे कार्यरत आहेत.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांच्या समन्वयाने राज्यात कार्यरत असलेली १२७ महिला समुपदेशन केंद्रे कार्यरत आहेत. गतवर्षी २४,६५२ महिलांचे समुपदेशन करण्यात आले आहे.

## समुपदेशन आणि सहकार्य

अनैतिक मानवी देह व्यापार अंतर्गत पीडितांची सुटका, पुनर्वसन, घरी पाठवणे, यासाठी राज्यस्तरीय समन्वय कक्ष स्थापन

Mrgabharti_75000

करण्यात आला असून, २२ राज्यगृहे व ५ उज्ज्वलागृहे कार्यरत आहेत. निराधार/निराश्रित महिलांना सुरक्षिततेसाठी व सक्षमीकरणाकरिता ‘शक्ती सदन’ योजना राबवण्यात येत आहे. कोणत्याही वयोगटातील अविवाहित मुली आणि १२ वर्षांपर्यंतच्या मुलांना सदनामध्ये राहण्याची परवानगी असेल. बलात्कार, पोक्सो अंतर्गत बालकांवर अत्याचार, ॲसिड हल्ला, ज्वलनशील पदार्थाद्वारे हल्ल्यातील पीडितांच्या पुनर्वसनासाठी वित्तिय साहाय्य, समुपदेशन, वैद्यकीय व कायदेशीर मदत देणे, अशा हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना प्रतिष्ठा आणि आत्मविश्वास मिळवून देण्याचे कार्य मनोधैर्य योजनेंतर्गत करण्यात येते.

तसेच नोकरी करणाऱ्या अविवाहित, विधवा, घटस्फोटित महिलांसाठी ‘सखी निवास’ योजनेंतर्गत ७४ वसतिगृह कार्यरत आहेत.

एक लाख वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार, परित्यक्ता आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलींच्या विवाहासाठी शुभमंगल सामूहिक विवाह योजना राबवण्यात येत आहे. यासाठी प्रति जोडपे २५ हजार सामूहिक विवाह राबवणाऱ्या संस्थांना देण्यात येतात. प्रति जोडपे २५०० एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येते.

## राज्य महिला आयोगाचे योगदान

स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरीत्या सनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी, स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे व उंचावणे, या गोष्टींशी संबंधित सर्व बाबींवर शासनाला शिफारस करण्यासाठी राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. १६,०१२ तक्रारींपैकी १०,१७२ तक्रारी निकाली निघाल्या असून, ५,८४० तक्रारींवर कार्यवाही सुरू आहे.

## उद्योजकतेला पाठबळ

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्थापन करण्यात आलेल्या महामंडळाचे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू आहे. ग्रामीण महिलांचे संघटन करणे, क्षमतांचा विकास करणे, उद्योजकीय विकास घडवून आणणे, महिलांचा शिक्षण, संपत्ती व सत्तेत सहभाग वाढवणे यासाठी प्रयत्न करणे.

३४ जिल्ह्यांत ९,४५२ गावांत एकूण १ लाख ६३ हजार बचतगट कार्यरत आहेत. या माध्यमातून १८ लाख १६ हजार महिलांचा उद्योजकीय आर्थिक विकास साधण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राज्यातील एकूण ५ लाख ३६ हजार महिलांनी उद्योग व्यवसाय सुरू केले असून, त्यांचा आत्मविश्वास अधिक वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

## बाल विकास

अनाथ, निराधार, निराश्रित, बेघर, विशेष काळजीची गरज असलेली, एचआयव्हीबाधित बालके, संकटग्रस्त व अत्याचारग्रस्त बालके, दुर्धर आजारी पालकांची मुले, कैद्यांच्या मुलांना शासकीय अथवा स्वयंसेवी संस्थांमध्ये ० ते १८ वर्ष वयोगटातील दाखल करण्यात येते. यासाठी २२ बालगृहे व विशेष गृहे; तसेच १५ शासकीय निरीक्षण गृहे कार्यरत आहेत. स्वयंसेवी संस्थांमार्फत ३०७ बालगृहे कार्यरत असून, किरकोळ गुन्हेगारीत आरोपी ठरलेल्या बालकांना काळजी आणि संरक्षणाची ४० स्वयंसेवी निरीक्षण/बालगृहे कार्यरत आहेत. तसेच अनाथ बालकांसाठी २ बाल मार्गदर्शन चिकित्सा केंद्रे आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या मुलांना बालगृहातून बाहेर पडल्यावर बालकांसाठी ६ अनुरक्षण गृहे, तर स्वयंसेवी संस्थेचे एक अनुरक्षण गृह कार्यरत आहे. राज्यातील बाल संरक्षणासाठी संबंधित कार्यान्वित यंत्रणा व योजनेची गुणवत्ता वाढवणे आणि त्या अधिक बळकट करणे, हा मिशन वात्सल्य योजनेचा उद्देश आहे. बालमृत्यूचे, बाल रोगांचे, कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, पोषण आहार उपलब्ध करून देण्यासह विविध योजना एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत राबवण्यात येतात. किशोरवयीन मुलींसाठी योजना, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल अमृत आहार योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ योजना, लेक लाडकी योजना, आदिवासी भागासाठी विशेष आहार योजना राबवण्यात येत आहे. महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालविकास विभाग भविष्यातही अशा नावीन्यपूर्ण प्रभावी योजनांची अंमलबजावणी करत राहणार आहे.

**शब्दांकन : श्रद्धा मेश्राम,** विभागीय संपर्क अधिकारी

## वन स्टॉप सेंटर योजना




महिलांवर शारीरिक व मानसिक अत्याचार, आर्थिक छळवणूक होणाऱ्या संकटग्रस्त महिलांसाठी आवश्यक उपचार व मदत एकाच छताखाली मिळण्यासाठी ही योजना आहे. सर्व जिल्ह्यांत ३७ सेंटर्स कार्यरत आहेत. २०२३ ते २०२४ या कालावधीत ६२४९ महिलांना लाभ देण्यात आला असून, आकस्मित खर्चासाठी ५० हजार एवढे अनुदान देण्यात येते.


देश, जिल्हा, तालुका स्तरावर महिलांना आरोग्यसेवा, उच्च प्रतीचे शिक्षण, व्यावसायिक समुपदेशन, वित्तीय नियोजन, उद्योजकता, बॅकवर्ड व फॉरवर्ड लिंकेजेस, कामगार वर्गाचे आरोग्य, सामाजिक सुरक्षितता आणि डिजिटल साक्षरता करण्यासाठी मिशन शक्ती योजनेंतर्गत महिला सक्षमीकरण केंद्र योजनेंतर्गत कार्यरत केंद्राद्वारे मार्गदर्शन केले जाते. या अंतर्गत १८१ हेल्पलाइन कार्यरत आहे. शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमधील सेवांमध्ये भरतीसाठी महिलांकरिता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

Mrgabharti_75000

**यशवंतराव चव्हाण हे आधुनिक 'महाराष्ट्राचे शिल्पकार' म्हणून ओळखले जातात. ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि अभ्यासू साहित्यिक होते. त्यांनी शेती, सहकार, उद्योग, शिक्षण, ग्रामीण विकास आणि पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मूलभूत पायाभरणी केली.**

# महाराष्ट्राचे शिल्पकार!

**राजा माने**



महाराष्ट्राच्या पायाभरणीचा काळ १९६०च्या दशकाने सुरू झाला. या काळात महाराष्ट्राला विकासाची दूरदृष्टी असलेले खंबीर नेतृत्त्व यशवंतराव चव्हाण यांच्या रूपाने लाभले. हे खरोखर महाराष्ट्राचे भाग्यच. त्यांनी सुरुवातीच्या काळात विविध क्षेत्रांच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण आणि धाडसी निर्णय घेतले. त्यामुळेच आधुनिक महाराष्ट्राचा मजबूत पाया रचला गेला. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार ठरले आहेत.

## दूरदृष्टी नेतृत्त्व

महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावला, असे यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल म्हटले जाते. त्याचे कारण महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून राज्याची धुरा सांभाळताना आधुनिक महाराष्ट्राची सर्वव्यापी जडणघडण कशी होईल आणि महाराष्ट्राचा तळागाळासह सर्वांगीण विकास कसा होईल, यासाठी अतिशय समर्थपणे आखणी करून महाराष्ट्राला विकासाची दिशा देण्याचे महान कार्य केलेले असतानाच, जेव्हा परकीय आक्रमणामुळे देश संकटात असताना ऐनवेळी संरक्षण मंत्रालयाची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन परकीय आक्रमण रोखण्याचे धाडसी काम यशवंतराव चव्हाण यांनी केले. १९६२ मध्ये भारत-चीन युद्ध सुरू झाले. त्यावेळी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून घेऊन त्यांच्यावर संरक्षण मंत्रालयाचा पदभार सोपविला होता. त्यांनी तो समर्थपणे पार पाडला. नंतरच्या काळात केंद्रीय गृहमंत्री, देशाचे उपपंतप्रधान, केंद्रीय अर्थमंत्री, परराष्ट्र मंत्रालयाचा कारभारदेखील तेवढ्याच ताकदीने सांभाळला. एवढेच नव्हे, तर देशात जनता पक्षाचे सरकार असताना त्यांनी विरोधी पक्षनेतेपदही सांभाळले. यासोबत ते आठव्या केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्षही राहिले. केंद्रात विविध मंत्रिपदाचा पदभार सांभाळताना त्या पदाला न्याय देऊन थेट उपपंतप्रधान पदापर्यंत पोहोचणारे महाराष्ट्रातील ते एकमेव नेते आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री म्हणूनदेखील यशवंतराव चव्हाण यांनी साडेसहा वर्षे पदभार सांभाळला. त्यात पहिले चार वर्षे तर महाराष्ट्र-गुजरात द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री राहिले. त्यानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर स्वतंत्र महाराष्ट्राचे ते

Mrgabharti_75000

अडीच वर्षे मुख्यमंत्री राहिले. महाराष्ट्राच्या पायाभरणीचा या काळात नव्याने स्थापन झालेल्या राज्याला एक वेगळी दिशा देण्याचे आव्हान नव्या सरकारसमोर होते. अशा परिस्थितीत यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे दूरदृष्टी आणि विकासाभिमुख नेतृत्व महाराष्ट्राला लाभले. त्यामुळेच देशात महाराष्ट्राचा नावलौकिक वाढू शकला, हे कदापि विसरता येणार नाही. कारण नेहमीच दुर्लक्षित राहिलेल्या ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय राज्य प्रगतिपथावर जाणार नाही, हे यशवंतराव चव्हाण यांनी ओळखले आणि अविकसित भागाच्या विकासाला प्राधान्य दिले. तसेच ग्रामीण औद्योगिकीकरणाला चालना देण्यासोबतच ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योगाची सांगड घालण्याचे काम अतिशय विचारपूर्वक केले. शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेची सांगड घालून शहराकडे येणारा श्रमिकांचा लोंढा थोपविण्याची योजना त्या काळी आखली. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्र वेगाने प्रगती करू शकला. ग्रामीण विकासाची पायाभरणी खऱ्या अर्थाने त्या काळी झाली. त्यामुळेच विकासाची फळे गाव भागापर्यंत चाखता आली.

## कृषी आणि सहकार क्षेत्राचे पुरस्कर्ते

यशवंतराव चव्हाण समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते. महाराष्ट्राचा सर्वांगीण आणि समतोल विकास झाला पाहिजे, यासाठी ते नेहमी आग्रही राहिले. राज्याचा विकास साधायचा असेल, तर औद्योगिक विकासाला चालना द्यायला हवी, या विचाराने त्यांनी अविकसित भागाच्या विकासासाठी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची संकल्पना मांडली. यासोबतच आर्थिक विकासासाठी सहकाराचाही पुरस्कार त्यांनी केला. भारत हा कृषिप्रधान देश आहे. कृषिप्रधान देशाच्या विकासासाठी सहकार क्षेत्राचा मोठा हातभार लागू शकतो, याचा विचार करून सहकार क्षेत्राला गती देण्याचे काम त्यांनी केले. या दूरदृष्टीतूनच महाराष्ट्रात सहकाराचे जाळे वेगाने विणले गेले. यातून ग्रामीण महाराष्ट्र सक्षम बनू शकला. तरुणांच्या हाताला रोजगार मिळाला, शेतीला सहकाराची जोड मिळाल्याने पूरक उद्योग सुरू झाले. सहकारी बँका, सहकारी संस्था, सहकारी कारखाने उभे राहिले आणि यातून ग्रामीण भाग, शेतकरी समृद्ध होऊ शकले.

यशवंतराव चव्हाण यांनी त्या काळी सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून शेती विकासाचा विचार केला. जमिनीच्या मालकी हक्काचा प्रश्न उपस्थित करताना त्यांनी जमीन कसणारा शेतकरी शेतजमिनीचा मालक असावा, अशी भूमिका मांडली आणि त्याची अंमलबजावणी करून शेतजमिनीचेही विकेंद्रीकरण करून अनेक भूमिहिनांना शेतजमिनी मिळाल्या. यातून शेतीचे उत्पादित क्षेत्र वाढण्यास मदत झाल्यामुळे कृषी विकासाला गती मिळू शकली. कारण ठरावीक लोकांकडेच मोठ्या प्रमाणात जमीन राहिल्याने पडीक क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने जमिनीची अनुत्पादकता अधिक होती. हे पडीक क्षेत्र लागवडीखाली आणण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यामुळे शेती उत्पादन वाढण्यास मदत झाली. शेती व्यापारी तत्त्वाने झाली पाहिजे, नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर व्हायला हवा, यासाठी नद्यांवर धरणे बांधली पाहिजेत, असा शेतीच्या आधुनिकीकरणाचा विचारही त्यांनी मांडला आणि तो विचार प्रत्यक्षात उतरवलाही. कोल्हापुरी पद्धतीचे



**१ मे १९६० रोजी स्वतंत्र मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची स्थापना भारताचे तेव्हाचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाले. त्याचे प्रतीक म्हणून पंडित नेहरू यांनी मुंबईतील राजभवनाच्या प्रांगणात एक रोपटे लावले. त्या क्षणापासून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे पर्व सुरु झाले. पंडितजींच्या शेजारी उभे आहेत महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण.**

बंधारे उभे करून नदीकाठावरील क्षेत्र सिंचनाखाली आणले. कोयना आणि उजनी धरण उभे करून शेतीला पाणी उपलब्ध करून दिले. यामुळे जमिनी सिंचनाखाली आल्याने शेती उत्पादनवाढीला चालना मिळाली. शेतकऱ्यांनी कृषिशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, अशी आग्रही भूमिका मांडली. त्यासाठी कृषी विद्यापीठाच्या उभारणीला चालना दिल्याने शेतीचा शास्त्रोक्त अभ्यास सुरू झाला. शेतीला शास्त्रीय अभ्यासाची जोड मिळाल्याने शेतीचा आधुनिक पद्धतीने विकास होऊ लागला. शेतीला सहकाराची जोड मिळावी, म्हणून ग्रामीण भागात १८ सहकारी साखर कारखान्यांना मंजुरी दिली. त्यामुळे ग्रामीण भागात कारखानदारी उभी राहिली आणि ऊसापासून साखर निर्मितीला चालना देतानाच शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळला पाहिजे, याची काळजी घेतली. तसेच कारखानदारीतून रोजगाराच्या संधीही उपलब्ध करून दिल्या.

## उद्योग उभारणीला बळ

शेतीसोबतच उद्योग क्षेत्रवाढीला बळ मिळावे, यासाठी राज्यात औद्योगिकीकरणाला चालना दिली. यातूनच एमआयडीसी औद्योगिक वसाहतीची संकल्पना पुढे आली. ज्यामुळे राज्यात जिल्ह्या-जिल्ह्यांत उद्योग उभारणीला बळ मिळाले आणि उद्योगांचे जाळे उभे राहण्यास

Mrgabharti 75000

मदत झाली. उद्योग वाढल्याने रोजगाराच्याही संधी उपलब्ध झाल्या. बरीच उत्पादने बाजारात उपलब्ध झाल्याने उद्योग क्षेत्राची भरभराट होऊ शकली. राज्याची खऱ्या अर्थाने प्रगती साधायची असेल, तर शिक्षणाचे द्वार सर्वांसाठी खुले झाले पाहिजे, त्यासाठी शिक्षणाचे जाळे गावपातळीपर्यंत निर्माण झाले पाहिजे. शिक्षण सहज उपलब्ध झाल्यास नवी पिढी शिक्षण घेऊन शहाणी होईल, यासाठी गावोगाव शाळेचे द्वार खुले करण्यासाठी प्रयत्न केला. विद्यापीठाच्या माध्यमातून शिक्षणाचे जाळे उभे करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा विद्यापीठ आणि कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाला मंजुरी देऊन शिक्षणक्षेत्राला गती दिली. यासोबतच गरीब, सर्वसामान्यांची मुले शिकून शहाणी झाली पाहिजेत, यासाठी आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाला शैक्षणिक शुल्कात ईबीसी सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. १२०० रुपये किंवा त्यापेक्षा कमी उत्पन्न गटातील पालकांच्या पाल्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याचा धाडसी निर्णय त्यांच्याच काळात झाला. नवबौद्धांनादेखील कायद्याने शैक्षणिक सवलत उपलब्ध करून दिली.




यासोबतच सातारा येथे सैनिकी स्कूलची स्थापना करून सैनिकी शिक्षणाचे द्वार खुले केले. त्यामुळे या सैनिकी स्कूलच्या माध्यमातून अनेक तरुण सैन्यात भरती झाले आणि देशसेवेत आपले योगदान देऊ शकले. अशा विविधांगांनी सर्वसामान्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. तसेच सामाजिक न्यायाची भूमिकाही तितक्याच ठामपणे मांडून तत्कालीन समाजव्यवस्थेला एक नवी दृष्टी दिली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायासाठी लढा उभारला आणि तो यशस्वीही केला. अशा महान व्यक्तिमत्त्वाची ओळख नव्या पिढीला व्हावी आणि एकूणच त्यांच्या सन्मानार्थ नागपूर येथील दीक्षाभूमीवर त्यांचे स्मारक उभे करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन बाबासाहेबांच्या जयंतीदिनानिमित्त १४ एप्रिल रोजी सुट्टी देण्याची प्रथादेखील यशवंतराव चव्हाण यांनी सुरू केली. यावरून महाराष्ट्राला लाभलेला हा नेता किती दूरदृष्टीचा होता, याचा अंदाज येतो.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राज्यात सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टिकोनातून पंचायतराज व्यवस्थेची सुरुवात करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय यशवंतराव चव्हाण यांनी त्या काळात घेतला. पंचायतराज व्यवस्थेमुळे राज्य सरकारपासून ते थेट ग्रामपंचायतीपर्यंत एक नवी व्यवस्था उभी राहिली आणि यातून गावपातळीपर्यंत विकासाची गंगा पोहोचवण्याची साखळी तयार झाली. त्यामुळे प्रशासकीय शिस्त लागून विकासाला चालनाही मिळाली. यापेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे यातून महाराष्ट्रात नव्या नेतृत्वाची खूप मोठी फळी उभी राहू शकली. आज विविध समाजघटकातून जे नेतृत्व उभे राहिले आणि जी मंडळी समाजाचे प्रतिनिधित्व करत आहेत, त्यांना संधी उपलब्ध करून देण्याचे सर्व श्रेय यशवंतराव चव्हाण यांना जाते. राज्यात पंचवार्षिक योजनांची सुरुवात केल्यामुळे विकासाचे टप्पे निर्माण करता आले. त्यामुळे पंचवार्षिक योजनेतून सर्वांगीण विकासाला गती मिळू शकली. महाराष्ट्र राज्याला उभारी देण्याच्या दृष्टीने अशा कितीतरी धाडसी आणि नव्या योजना राबवून भक्कम विकासाची पायाभरणी केली. त्यामुळेच महाराष्ट्र हे देशातील एक अग्रगण्य राज्य ठरू शकले. खऱ्या अर्थाने याचे सर्व श्रेय यशवंतराव चव्हाण यांनाच द्यावे लागेल.

### यशस्वी राजकारणी आणि प्रभावी साहित्यिक

एकीकडे राजकीय डोलारा आणि महाराष्ट्राच्या विकासाचा ध्यास घेतलेला असताना यशवंतराव चव्हाण यांनी साहित्य क्षेत्रातही खूप महत्त्वपूर्ण योगदान दिले. राजकारण आणि साहित्य क्षेत्र दोन वेगळे भाग आहेत, परंतु यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणी हे साहित्यिकही असू शकतात, असे महाराष्ट्र उभारणीच्या काळातच दाखवून दिले. त्यांची विपुल साहित्य संपदा पाहिल्यानंतर कोणत्याही राजकारण्यांना जमले नाही, ते त्यांनी करून दाखवत राजकारण आणि साहित्य याचे नाते किती अतूट आहे, याची परंपरा राज्याच्या उभारणी काळातच घालून दिली. राजकारण आणि साहित्य क्षेत्र हे वेगळे करण्याचा अनेकदा प्रयत्न केला जातो, परंतु आजपर्यंत ते कधीही वेगळे होऊ शकले नाही. यामागेदेखील यशवंतराव चव्हाण यांनी रुजवलेली विचारसरणी आहे असेच म्हणावे लागेल. यशवंतराव चव्हाण यांचे मराठी साहित्यात मोठे योगदान आहे. त्यांनी 'आपले नवे मुंबई राज्य' नावाचे पहिले पुस्तक लिहिले. याशिवाय 'ऋणानुबंध' नावाचा ललित लेखसंग्रह आणि 'कृष्णाकाठ' नावाचे आत्मचरित्रात्मक पुस्तकही लिहिले. त्यांचे हे पुस्तक राजकीय क्षेत्रात येणाऱ्या नव्या पिढीला खऱ्या अर्थाने मार्गदर्शक ग्रंथ आहे. याशिवाय 'भूमिका', 'महाराष्ट्र राज्य निर्मिती विधेयक', 'विदेश दर्शन', 'सह्याद्रीचे वारे' नावाचा भाषण संग्रह, 'युगांतर' नावाचे पुस्तक त्यांनी लिहिले आहे. यासोबतच विविध विषयांवरील अनेक लेख प्रसिद्ध झालेले आहेत. ते लेखदेखील अतिशय वाचनीय आणि नव्या पिढीला दिशादायी ठरणारे आहेत. यातून त्यांचा किती व्यापक व्यासंग होता, याचा अंदाज येतो. अशा विविधांगांनी महाराष्ट्राची समर्थपणे उभारणी करून महाराष्ट्र राज्याला आधुनिक रूप देण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनी केले. त्यामुळेच ते खऱ्या अर्थाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत, असेच म्हणावे लागेल.

**(लेखक हे डिजिटल मिडिया संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आहेत.)**

Mrgabharti_75000

**महाराष्ट्रासारख्या राज्यात जिथे बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे, तिथे जलसंधारण हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. राज्यातील एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी जवळपास ८२.४७% क्षेत्र कोरडवाहू शेतीखाली येते. अशा परिस्थितीत जलसंधारणाच्या प्रभावी उपाययोजना केल्या नाहीत, तर पाणीटंचाई, जमिनीचा क्षय, कमी उत्पादन आणि स्थलांतरासारख्या समस्या अधिक तीव्र होऊ शकतात.**

# जलसंधारण : काळाची गरज

पाणी ही निसर्गदत्त संपत्ती असून तिचे संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे. महाराष्ट्रात अनेक जलसंधारण योजना राबवल्या जात आहेत; परंतु त्यांचा प्रभाव वाढवण्यासाठी जनजागृती आणि लोकसहभाग महत्त्वाचा आहे. जलसंधारणाचे उपाय काटेकोरपणे राबवले, तर शेतीच्या उत्पादनात वाढ होईल, भूजल पुनर्भरण होईल आणि पाण्याची टंचाई दूर होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. म्हणूनच जलसंधारण ही काळाची गरज आहे!

## महत्त्व जलसंधारणाचे...

**शाश्वत शेतीसाठी पाणी उपलब्धता :** सिंचनाच्या मर्यादित सोयींमुळे बऱ्याच भागांतील शेती अवर्षणाच्या तडाख्यात सापडते. जलसंधारणाच्या उपाययोजनांमुळे सिंचनाचा विस्तार वाढू शकतो, त्यामुळे उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते.

**भूजल पुनर्भरण :** सततच्या भूजल उपशामुळे भूगर्भातील घटत असणारी पाणी पातळी जलसंधारणाच्या उपायांमुळे नद्या, ओढे आणि तलाव भरून भूजल पातळी टिकवण्यास मदत होते.

**मृदा धूप टाळणे आणि जमिनीची सुपीकता वाढवणे :** 'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' योजनेद्वारे धरणातील गाळ शेतात पसरविला जातो, त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढून जमिनीची उत्पादन क्षमता सुधारण्यास मदत होते.

**अनियमित पर्जन्यमानावर नियंत्रण :** महाराष्ट्रातील काही भागांमध्ये अनियमित पाऊस आहे. पाणलोट क्षेत्र विकास आणि जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांद्वारे पावसाचे पाणी साठवून त्याचा योग्य वापर केल्याने अनियमित पर्जन्याच्या भागातदेखील शेतीमध्ये संपन्नता येऊ शकते. त्यासाठी शासनाच्या विविध योजना व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होणे गरजेचे आहे.

**पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन :** विदर्भातील माजी मालगुजारी तलाव, गोंड राजांच्या काळातील जलसंधारण प्रकल्प हे आजही उपयोगी आहेत. अशा पारंपरिक प्रकल्पांचे पुनरुज्जीवन केल्यास शाश्वत जलसंधारण शक्य होईल.



Mrgabharti 75000

## जलसंधारणाच्या महत्त्वपूर्ण योजना...

**गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजना :** शासनाने सुरू केलेली लोकाभिमुख योजना ही लोकसहभागाशिवाय पूर्ण होत नाही. धरणे, बंधारे, तलाव अशा प्रकारच्या जलसाठांमध्ये साचलेला गाळ काढून तो परिसरातील शेतजमिनींमध्ये पसरविल्यामुळे जमिनीची कस सुधारून सुपीकता वाढण्यास मदत होईल आणि ज्या जलसाठ्यामधून उपसा केलेल्या गाळामुळे तेथे पाण्याचे पुनर्भरण होण्यासाठी मदत होईल, हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

धरणांमधील साठलेला गाळ शेतात पसरवण्यासाठी ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या ६ मे २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबवण्यात आली होती.



या योजनेला या पुढील तीन वर्षांसाठी १६ जानेवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनामार्फत मुदतवाढ दिली होती; परंतु जलस्रोतात गाळप्रक्रिया कायमस्वरूपाची असल्याने 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' ही योजना कालमर्यादित न ठेवता मंत्रिमंडळाच्या मान्यतेने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी कायमस्वरूपी राबवण्याबाबत सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

या योजनेंतर्गत अशासकीय संस्थेने काढलेला गाळ शेतकऱ्यामार्फत शेतात पसरविण्यात येतो. गाळ वाहून नेण्यासाठी शेतकऱ्यांना अडीच एकरपर्यंतच्या लहान शेतकऱ्यांना ३७,५०० रुपये एवढ्या मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात येते. २०२३-२४ या वर्षात ४७९ जलाशयातून सुमारे ८० लाख घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. तसेच लोकसहभागातूनही गाळ काढण्यात आला आहे. हा गाळ सुमारे सहा हजार शेतकऱ्यांनी शेतात पसरविलेला आहे. या योजनेसाठी ४३.२३ कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला. चालू आर्थिक वर्षात ६.६९ कोटी घनमीटर एवढा गाळ एकूण २,१७३ जलाशयातून काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यानुसार आतापर्यंत १,२७४ जलाशयातून ३.९९ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला असून हा गाळ सुमारे ३१,८४५ शेतकऱ्यांच्या शेतात पसरवण्यात आला आहे. सध्या चालू आर्थिक वर्षात ५० कोटी रुपये एवढा खर्च करण्यात आला आहे.

## जलयुक्त शिवार अभियान २.०

जलयुक्त शिवार अभियान २०१५ ते २०१९ या कालावधीत २२,६९३ गावांमध्ये मोहीम स्वरूपात राबवण्यात आले. यामधील २०,६२८ गावे जलपरिपूर्ण झाली आहेत. अभियानांतर्गत झालेल्या कामांमुळे जवळपास २७ लाख टी.सी.एम. पाणीसाठवण क्षमता निर्माण झाली असून, सुमारे ३९ लाख हेक्टर शेतीसाठी संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण झाली आहे. आता मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार जलयुक्त शिवार अभियान २.० राबवण्याबाबत ३ जानेवारी २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

जलयुक्त शिवार अभियान टप्पा-१; तसेच इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम न राबवलेल्या गावात व गाव निवडीच्या निकषानुसार पात्र ठरणाऱ्या गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियान २.० राबवण्यात येत आहे. तसेच जलयुक्त शिवार अभियान टप्पा-१ व इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबवलेल्या ज्या गावांमध्ये पाण्याची गरज असेल व अडवण्यास अपधाव शिल्लक असेल, त्या गावांमध्ये पाणलोट विकासाची कामे करण्यात येत आहेत.

जलयुक्त शिवार अभियान २.० विविध योजनांच्या अभिसरणातून सुमारे ५,००० गावांमध्ये ही योजना राबवण्याचे उद्दिष्ट आहे. सद्य:स्थितीत निवड केलेल्या गावांची संख्या ५,८१८ असून गाव आराखड्याप्रमाणे प्रस्तावित कामांची संख्या एक लाख ४४ हजार ८८८ इतकी असून ७७,८९१ कामे, माहे फेब्रुवारी २०२५ पर्यंत पूर्ण झाली आहेत. तसेच फेब्रुवारी २०२५ पर्यंत १,२३९.९९ कोटी रुपये (अभिसरणासह) खर्च करण्यात आला आहे. जलयुक्त शिवार अभियान २.० साठी २०२४-२५ करिता ६५० कोटी रुपये निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून, माहे फेब्रुवारी २०२५ पर्यंत ५२ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.०, नदी पुनर्जीवन कार्यक्रम, आदर्श गाव संकल्प व प्रकल्प योजना या योजनांच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी पाणलोट विकासावर भर देण्यात येत असून लोकसहभागातून जलसंधारण आणि गावविकासासाठी प्रभावी उपक्रम राबवण्यात येत आहेत. जेणे करून नद्या, ओढे आणि नाल्यांचे पुनरुज्जीवन करून जलसंपत्तीची क्षमता वाढवणे शक्य होईल, यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

**शब्दांकन : राजू धोत्रे,** विभागीय संपर्क अधिकारी

Mrgabharti_75000

**माणसांना लागणारी पाण्याची तहान हा सृष्टीचा धर्म आहे आणि ती सृष्टीची धारणा आहे. रणांगणावर लढत असलेल्या सैनिकांनाही पाणी लागतेच. आपला देह हे जर कुरूक्षेत्र मानले, तर देहात जल हवेच. एक वेळ माणूस थोडीशी भूक लांबवू शकेल; पण तहान लांबवणे त्याला अशक्य होईल. सृष्टीत जल आहे, म्हणून रस आहे. रसरशीतपणा नाहीसा झाला, तर कोरड्या विश्वाला कोण विचारणार? पाण्यामध्ये जीव जन्मतो, फुलतो, बहरतो. गवत उगवते ते पाण्याच्या श्वासात. ओलावा असला की, हिरवेपणा हाही सौंदर्याचे बाळसे धरतो. हिरवेपणातला ताजेपणा मनाला तरतरी आणतो.**

# पाण्याची गुंतवणूक!

**डॉ. सुधीर भोंगळे**

स्वच्छ नदीचा प्रवाह पाहिला की, मनाला जे वाटते, ते व्यक्त करता येत नाही. जन्माला पाणी लागते, जन्म संपल्यावरही पाणी लागते. पाणी केवळ स्वच्छता निर्माण करत नाही. माणसाने वस्ती केली ती पाण्याच्या जवळ, रम्य नद्यांचे काठ संस्कृतींचे घाट बनले. मानवी संस्कृती नदीकाठी फुलली. नैसर्गिक सरोवरांनी सुंदरतेला सामर्थ्य दिले, नद्यांचे संगम तीर्थ बनले. त्यामुळे इतिहासाचा पहिला दाखला पाणी तिथे वस्ती असाच होता.

नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात म्हणून शहरांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येतो. कोट्यवधी रुपये खर्च करून मोठमोठी धरणे बांधतो. हे करत असताना शहरातील सांडपाणी व मलमूत्र व्यवस्थापनाकडेदेखील लक्ष देणे आवश्यक झाले आहे. शहरातील सांडपाणी व इतर घाण ही नदीद्वारे धरण प्रकल्पात सोडण्यावर निर्बंध लावण्यासोबतच माणसांनी स्वतःहून यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. जेणेकरून पिण्याचे साठवलेले चांगले पाणीही पूर्णतः खराब व प्रदूषित होणार नाही. नदी व धरण पुन्हा स्वच्छ करणे खूप अवघड आहे. त्यासाठी मोठा खर्च व बराच काळ जावा लागेल. याबाबतीत संवेदनशील राहणे गरजेचे आहे व त्यासाठी वेळीच जागे झालेले बरे. म्हणून हा लेखप्रपंच.

लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरवणे आणि दुष्काळी भागातील शेतीला सिंचनाची सोय व्हावी म्हणून मोठी धरणे बांधण्याचा कार्यक्रम स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी हाती घेतला. इंग्लंडमध्ये बारमाही आणि त्यातही मुख्यत्वे रात्री पाऊस पडत असल्यामुळे सिंचनाची आणि त्यासाठी मोठी धरणे बांधण्याची गरज इंग्रजांना कधी पडली नाही, परंतु १८४५-४६ च्या सुमारास वारंवार रोगाच्या साथी येऊ लागल्या. प्लेगने सर्वत्र थैमान घालण्यास सुरुवात केली. लोक साथीच्या रोगांना मोठ्या प्रमाणावर बळी पडू लागले. पिण्यासाठी



Mrgabharti 75000

शुद्ध पाणी नसल्याने कावीळ, हगवण, जुलाब, कॉलरा यांसारखे आजार बळावत चालले. पुणे शहरातील कॅन्टोन्मेंटचा परिसर जिथे ब्रिटिशांची वस्ती होती, त्यांनाही पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळेना. त्यामुळे त्यावेळी ब्रिटिश सरकारने पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी धरणे बांधण्याचा निर्णय घेतला आणि मुंबई राज्यातील तत्कालीन अधीक्षक अभियंता असलेले एफ. एच. बील यांच्यावर धरणांच्या जागा



शोधण्याची जबाबदारी देण्यात आली. त्यांनी १८४६-४७ च्या सुमाराला काही जागा शोधून काढल्या. १८७५ मध्ये त्या ठिकाणी धरण बांधणीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. पुणे शहर आणि दौंड इंदापूरच्या परिसराकरिता खडकवासला धरण आणि बारामती, फलटण, माळशिरसकरिता येळवंडी नदीवर भाटघर धरण उभारण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. १९२७ ला प्रवरा नदीवर भंडारदरा धरणाची उभारणी करण्यात आली. त्याच सुमारास आजचा विदर्भ पूर्वी ज्या सेंट्रल प्रोव्हिएन्स ॲण्ड बेरार या प्रांतात होता तिथे धरण बांधणीसाठी सी.पी. ॲण्ड बेरार इरिगेशन कमिशन नेमण्यात आले. त्यावेळच्या नागपूर, चांदा, वर्धा येथील जिल्हाधिकाऱ्यांनी कमिशनला लेखी लिहून दिले की, 'आमचा प्रदेश हा हमखास पावसाचा आहे. शेतात बी पेरलं की, पीक काढायलाच जायचे अशी आमच्याकडे पद्धत आहे. आमच्याकडे कधीही दुष्काळ पडत नाही. अगदी दीर्घकाळ टिकून राहिलेल्या दुर्गादेवीच्या दुष्काळाची झळही आम्हाला पोहोचलेली नव्हती. तेव्हा आमच्या भागात मोठी धरणे बांधण्याची काहीही आवश्यकता नाही.' त्यामुळे त्याकाळच्या समज व प्रथा १९८० पर्यंत विदर्भात कायम राहिल्या आणि तिथे लोकांच्या विरोधामुळे मोठी धरणे उभारण्याचा कार्यक्रम राबवला गेला नाही ही वस्तुस्थिती आहे.

अरुण काशिनाथ शेणोलीकर हे विदर्भातील पहिले अधिकारी होते जे १९८० मध्ये नागपूर पाटबंधारे विभागाचे प्रमुख अभियंता बनले. त्यांनी प्रथमच १०० कोटी रुपयांचा धरण बांधणीचा कार्यक्रम विदर्भासाठी हाती घेतला. माजी दिवंगत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांच्या हस्ते उजनी, जायकवाडी आणि अप्पर वर्धा या तीन मोठ्या धरणांची पायाभरणी (भूमिपूजन) केली. लोकांचा कितीही विरोध झाला तरी तो मोडून काढत धरण बांधणीचा कार्यक्रम दिवंगत मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी तडीस नेला. नंतरच्या काळातही अनेक धरणांची कामे आपण करत राहिलो आणि आजही त्यातले काही प्रकल्प चालू आहेत. मोठ्या धरणांचा कार्यक्रम हा प्रामुख्याने पिण्याचे पाणी आणि शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था यासाठी हाती घेण्यात आला होता. आज ज्या वेगाने शहरांची वाढ होते आहे, नागरीकरण व शहरांच्या भोवताली औद्योगिकीकरण वाढत आहे. शहरी भागाचे शेतजमीन आणि पाणी या दोन्हींवर आक्रमण होते आहे. ते पाहता पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमातून व छोटे बंधारे, पाझरतलाव, नालाबंड, गावतळी, विहिरी व बोअरवेल्स यातून मोठ्या गावांचा व बृहन्मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, अमरावती, कोल्हापूर, औरंगाबाद, सातारा, सांगली, ठाणे, पिंपरी-चिंचवड व यांसारख्या जिल्ह्यांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. हा प्रश्न १०० टक्के विश्वासार्हतेवरच सोडवावा लागेल. त्यासाठी मोठी धरणे अपरिहार्य आहेत. आज सगळ्या मोठ्या धरणांमधले पाणी पिण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहे. त्यामुळे जमिनीला सिंचनासाठी पाणी मिळण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

वैनगंगा नदीवर बांधण्यात आलेल्या गोसीखुर्द धरणावर जाण्याचा प्रसंग आला. त्या कालव्याच्या गेटवर उभे राहून पाण्याकडे बघितले, तेव्हा हिरव्यागार घनदाट जलपर्णीचे दर्शन घडले. ही जलपर्णी वाढणे हेच प्रदूषणाचे लक्षण. नागपूर शहराचा सगळा मैला, सांडपाणी, उद्योगातले घाण, प्रदूषित पाणी कन्हान नदीद्वारे वाहून या गोसीखुर्द धरणामध्ये येते. नागपूर महापालिकेने या मैला व सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्यातील बीओडीचे प्रमाण कमी करून मग ते नदीत सोडणे आवश्यक आहे. याप्रमाणेच पुणे, पिंपरी चिंचवड या महापालिकांनी कार्यवाही करणे गरजेचे आहे. रासायनिक उद्योगांमुळे कोकणातल्या पाताळगंगासह अनेक नद्यांची अवस्था अशीच होत असल्याने त्यासाठीदेखील उपाययोजना होणे आवश्यक आहे. वास्तविक प्रदूषित झालेल्या या पाण्यावर पूर्णपणे शास्त्रशुद्ध रितीने प्रक्रिया करून ते शुद्ध करण्याचे तंत्रज्ञान आपल्याकडे उपलब्ध आहे. या तंत्रज्ञानाचा वापर महानगरपालिका, नगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केला, तर त्याचा नक्कीच फायदा होणार आहे.

जैन इरिगेशन कंपनीचे संस्थापक अध्यक्ष कै. भवरलाल जैन यांनी तर पाच पैसे लिटर या दराने लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरवावे आणि तसे तंत्रज्ञान कंपनीतल्या सहकाऱ्यांनी विकसित करावे अशा प्रकारची इच्छा शेवटच्या काळात व्यक्त करून त्यासंबंधी मार्गदर्शनही केले होते. कदाचित लिटरला पाच पैशाचे गणित बसू शकणार नाही. ते २५ किंवा ५० पैशाचे बसेल. कदाचित एक रुपयावरही जाईल.

Mrgabharti_75000

हे सारे कोणते तंत्रज्ञान वापरता यावर अवलंबून राहील; पण २० रुपयांना आज जी पाण्याची बाटली आपण विकत घेतो त्यापेक्षा निश्चित कमी खर्च येईल. मुळात धरणात जाणारे पाणी स्वच्छ कसे राखता येईल, याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. निसर्ग पावसाच्या रूपाने स्वच्छ पाणी आपल्याला देतो. ते तितकेच स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी माणसांचीही आहे हे विसरून चालणार नाही याचे भान आपल्याला ठेवावेच लागेल. अन्यथा पाण्याने तुडुंब भरलेली सगळी धरणे फक्त डोळ्यांनी पाहावी लागतील आणि त्यातला एक थेंबही आपली तहान भागवण्यासाठी पुरेसा पडणार नाही.

गावपातळीवर जमीन पाण्याचे निरंतर विकासाचे नियोजन हा केंद्र सरकारच्या जलनीतीचा मूलभूत हेतू आहे. तरी गेल्या ३० वर्षांत मूलभूत हेतूने प्रत्यक्ष कार्यवाही होणे आवश्यक आहे. या कार्यक्रमांतर्गत जे वेगवेगळे तांत्रिक नियोजन आहे, त्यापैकी सर्व कामाचे एकत्रीकरण जर झाले नाही, तर आजपर्यंतच्या एकांगी कार्यक्रमाप्रमाणे हा कार्यक्रम काळाच्या ओघात एक अर्धवट कार्यक्रम म्हणून ओळखला जाईल. हा कार्यक्रम जर बहुसंख्य ग्रामीण लोकांच्या जीवनात आर्थिक विकास व पुर्नरचना घडवून आणेल, अशी अपेक्षा असेल तर खालील मुद्द्यांचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

१) या कार्यक्रमाचे निश्चित ध्येयधोरण हे गावपातळीवर जमीन पाण्याचे नियोजन करून गावातील प्रत्येक जमीनधारकाला कमीत कमी एक हेक्टर जमिनीला सिंचनाची व्यवस्था निर्माण होईल, यादृष्टीने पाण्याची साठवण आणि त्याचे वाटप होण्याची गरज आहे.

२) एकात्मिक जलसंपत्ती नियोजनाच्या सूत्राप्रमाणे (आय.डब्ल्यु. आर.एम.) पाण्याचा वापर होणे आवश्यक आहे. त्यासाठी धरणात साठवलेले पाणी अत्यंत स्वच्छ व शुद्ध ठेवावे लागेल. कोणत्याही गावाचे वा शहराचे सांडपाणी त्यात मिसळणार नाही याची काळजी बारकाईने घ्यावी लागेल, तरच माणसे व जनावरांना ते पाणी पिण्यायोग्य राहील व भूजलसाठेही शुद्ध राहतील.

३) तांत्रिक नियोजनातून जे पाणी उपलब्ध होईल ते मर्यादित असेल म्हणून त्याचे वाटप आणि त्या पाण्याचा वापर याबाबत शिस्त व संयम पाळण्याची गरज आहे. सिंचनाचे सगळे पाणी मोजून ठिबकने व पाईपातून दिले पाहिजे.

४) वरील दोन्ही मुद्दे हे जलसंधारण कार्यक्रमाचा गाभा असले पाहिजे आणि हे नियोजन लक्षात घेऊन गावपातळीवर लोकांचा सहभाग आणि प्रत्यक्ष कार्यवाही लोकांनी करणे जरूरीचे आहे.

५) वरील मुद्यांच्या आधारे सरकारने योग्य ती धोरणात्मक कार्यवाही आणि आर्थिक भांडवली गुंतवणुकीची संपूर्ण योजना अग्रक्रमाने लोकांच्या पुढे ठेवावी.

६) महाराष्ट्राच्या प्रचलित सिंचन व्यवस्थेच्या मर्यादा आणि त्यामुळे भविष्यात होणाऱ्या प्रादेशिक असमतोलाचे होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन जेवढी भांडवली गुंतवणूक सध्याच्या सिंचन व्यवस्थेवर केली जात आहे तेवढाच खर्च या व्यवस्थेवर करण्याचा निर्धार शासनाने करणे आवश्यक आहे.

७) प्रचलित सिंचन व्यवस्थेत जेवढे पाणी वापरले जाईल त्यांच्या फक्त २० टक्के एवढेच पाणी जलसंधारण, पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमात वापरले जाईल; परंतु तुलनात्मक पाण्याच्या वापराच्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या जैविक उत्पादनाचे प्रमाण प्रवाही सिंचनाच्या दोन पटीने अधिक असेल.

८) अनेक विविध योजनांवरती विखुरलेली गुंतवणूक सतत करण्यापेक्षा पाणलोट क्षेत्राच्या कार्यक्रमावर निश्चित काळात भरीव भांडवली गुंतवणूक केल्यास ग्रामीण दारिद्र्याचा प्रश्न कायमच्या रोजगार निर्मितीतून सुटेल आणि शेतीचे उत्पन्न वाढेल. दुय्यम रोजगारी ही इतर क्षेत्रात विखुरली जाईल. पीक पद्धतीची शिस्त मात्र सर्वांना पाळावीच लागेल.



९) मोठ्या धरणांचे पाणी कालव्याद्वारे दिल्यास प्रवाही लाभक्षेत्र उपलब्ध नसल्यामुळे शासनाने मोठ्या उपसा जलसिंचनाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. अशा अनेक योजना ज्या भागाच्या विकासासाठी होत आहेत त्या ठिकाणच्या पाणलोट क्षेत्राच्या विकासाला पूरक सिंचन व्यवस्था हे धोरण आखणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे पाणलोट क्षेत्राच्या कार्यक्रमात पाणी साठवण्यापासून ते उपसा सिंचनाने शेतकऱ्याला उपलब्ध करून देण्याच्या एकत्र भांडवली गुंतवणुकीचा विचार होत आहे.

**(लेखक हे 'कृषीतीर्थ' व 'शिवसंस्था' मासिकांचे संपादक आहेत.)**

Mrgabharti_75000

**वने ही पृथ्वीवरील सर्व सजीवांसाठी जीवनदायी संपत्ती आहे. ती केवळ निसर्गाची शोभा वाढवतात असे नाही, तर पृथ्वीवरील पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी आणि मानवी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक असतात. झाडे आणि जंगलांमुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषला जातो आणि प्राणवायू (ऑक्सिजन) उत्सर्जित केला जातो, ज्यामुळे जीवसृष्टीला श्वसनासाठी आवश्यक असलेला वायू मिळतो. त्यामुळेच जंगलांना पृथ्वीची फुफ्फुसे असेही संबोधले जाते.**

# शाश्वत वने जीवसृष्टीचा आधार!

**अमित वाडेकर**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून दरवर्षी २१ मार्च रोजी 'जागतिक वन दिन' साजरा केला जातो. वनांचे महत्त्व आणि मूल्य याबद्दल समाजात जागरूकता वाढीस लावण्याच्या हेतूने वन दिन साजरा केला जातो. यादिवशी जगभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वनसंवर्धनाचा प्रचार-प्रसार करणाऱ्या मोहिमा राबवल्या जातात. लोकांना जवळपासच्या परिसरात वृक्षारोपण करण्यास आणि जंगलतोड थांबवण्यास प्रवृत्त केले जाते. एवढेच नव्हे, तर जागतिक वन दिनी स्थानिक वनांना भेटी देण्याचे कार्यक्रमही आयोजित केले जातात. ठिकठीकाणी अशा प्रकारचे जनजागृतीपर उपक्रम राबवण्यासाठी तेथील शासन आणि स्वयंसेवी संस्था विशेष पुढाकार घेत असतात.

## जीवनसृष्टीचे संरक्षण

पृथ्वीचं आरोग्य राखण्यामध्ये आणि निसर्गचक्र सुरळीत ठेवण्यामध्ये 'वने' अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. वृक्षवेली, सूक्ष्म जीवजंतू, कीटक, सरपटणारे प्राणी, पशू, पक्षी यांचे ते आश्रयस्थान असतात. तसेच विविध प्रकारच्या वनस्पती आणि वन्य जीवजातींच्या अधिवासांमध्येही ते समतोल साधत असतात. वनांतील छोटे-मोठे सर्वच वृक्ष घातक कार्बन डायऑक्साइड शोषूण प्रदूषण कमी करतात आणि मानवाला जगण्यासाठी आवश्यक असलेल्या



प्राणवायूचं अर्थात ऑक्सिजनचं उत्सर्जन करतात. वनामुळे जमिनीची धूप रोखली जाते. भूगर्भात पाणी मुरण्यास मदत होत असल्याने पूर, दुष्काळ, वाळवंटीकरण यांसारख्या नैसर्गिक आपत्ती थोपवण्यास साहाय्य होते. वने केवळ पर्यावरणीय सेवाच पुरवतात असे नाही, तर मानवाच्या अनेक गरजासुद्धा भागवत असतात. अन्न, फळं, फुलं, औषधे, मसाले, मध, रंग, इंधन, रबर, डिंक, जनावरांसाठी चारा, घरबांधणीसाठी लाकूड अशा कितीतरी गरजा वनांपासून भागवल्या जातात. उद्योगांसाठी कच्चा माल, रोजगार आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही वनांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

असे असले तरीही वाढत्या लोकसंख्येबरोबरच त्यांच्या गरजा भागवण्याचे साधन म्हणून जंगलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन जगामध्ये विकसित झाला आहे. लाकूड, कागद निर्मिती, खाण उद्योग याबरोबरच शहरीकरण, औद्योगिकीकरण, सिंचन प्रकल्प, विमानतळ, रेल्वेमार्ग, महामार्ग आणि शेती यासारख्या कारणांसाठी मोठ्या प्रमाणात वन क्षेत्रावर कुऱ्हाड चालवली जात आहे. जंगलतोडीचा परिणाम केवळ तिथल्या जैवविविधतेवरच होत नाही, तर जवळपासच्या शेती क्षेत्राला आणि स्वाभाविकपणे मानवी वस्तीलाही त्याची झळ बसत असते. जसे की, जंगलातील अधिवास गमावल्याने अन्नाच्या शोधात वन्य प्राण्यांचे शेती आणि नागरी भागांमध्ये येण्याचे प्रमाण वाढते. माकडे, रानडुकरे, ससे, नील गायी, हत्ती, गवे, बिबटे यांसारख्या प्राण्यांकडून होणारे पिकांचे नुकसान आणि माणसांवरील हल्ले हे चित्र आता आपल्यासाठी नवीन राहिलेले नाही. ठिकठिकाणी विकोपाला गेलेल्या 'मानव - वन्यजीव संघर्षा'ची कितीतरी उदाहरणे देशाच्या निरनिराळ्या भागात आपल्याला पाहायला मिळतात. हा संघर्ष टाळायचा असेल तर वन्यअधिवास म्हणजेच 'वने' सुरक्षित ठेवावी लागतील.

## वनांची शाश्वतता

वनांची शाश्वतता किंवा शाश्वत वने म्हणजे अशी वने की, जी सध्याच्या पिढीबरोबरच भविष्यातील पिढ्यांनासुद्धा तेवढ्याच क्षमतेने वस्तू व सेवांचा पुरवठा करण्यास सक्षम असतील. अशा प्रकारची शाश्वत वनांची कल्पना आपल्या संस्कृतीमध्ये खोलवर रुजलेली दिसून येते. म्हणूनच देवरायांसारख्या वनसंवर्धनाचा संदेश देणाऱ्या प्रथा आजही आपल्याकडे पाहायला मिळतात. आदिवासी समुदायांमध्येही वन आणि वन्यजीव संवर्धनाच्या परंपरा आढळून येतात. या

Mrgabharti 75000

प्रथांमागचा दूरगामी विचार आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.

पर्यावरण संतुलनाच्या दृष्टिकोनातून एकूण भूभागापैकी ३३ टक्के क्षेत्र वन आच्छादित असणे आवश्यक असताना वृक्षांची संख्या घटत राहणे आणि जंगले आक्रसत जाणे ही एक चिंताजनक बाब आहे. अगोदरच दुष्काळ, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, पूर, वादळे, गारपीट, उष्णतेच्या लाटा या स्वरूपात आपण हवामानातील बदलाचा सामना करत आहोत. अशा नैसर्गिक आपत्तींची तीव्रता आणि वारंवारता भविष्यात वाढतच जाणार असून याचा परिणाम कुपोषण, गरिबी, बेरोजगारी, स्थलांतर अशा सामाजिक-आर्थिक समस्या वाढण्यात होणार असल्याचे अंदाज जागतिक स्तरावर वर्तवले जात आहेत. म्हणूनच आपल्या वनांची शाश्वतता राखणे ही आता काळाची गरज बनली आहे.

### वनसंवर्धनाच्या अस्तित्वासाठी लोकसहभाग महत्त्वाचा

आजच्या स्पर्धेच्या युगात भौतिक सुखाच्या आणि चंगळवादी जीवनशैलीच्या मागे सर्वजण धावत आहेत. अशा पार्श्वभूमीवर उपाययोजनांचा भाग म्हणून प्रामुख्याने शहरात वाढणाऱ्या तरुणाईला प्रेरित करून वृक्षलागवडीच्या मोहिमांमध्ये सहभागी करून घेणे हा शैक्षणिक अभ्यासक्रमाचाच एक भाग असायला हवा. यातूनच जबाबदार आणि पर्यावरणप्रेमी नागरिक निर्माण होतील. ज्यांना वृक्षलागवडीबद्दल किंबहुना पर्यावरणाबद्दल किमान काही मूलभूत बाबी माहीत असतील. जसे की बिया, बीजगोळे, रोपं असे विविध पर्याय वापरून आपण वृक्षलागवड कशी करू शकतो. याकरिता बियांची उगवणक्षमता कशी तपासावी. चांगली उगवण होण्याकरिता लागवडीपूर्वी बियांवर प्रक्रिया कशी करतात. बीजगोळे कसे बनवतात, त्यांचा उपयोग करून वनआच्छादन कसे वाढवता येते, रोपांची लागवड कशी करतात. रोपवाटिका उद्योग कसा उभारावा आणि त्याद्वारे लाखोंच्या संख्येने रोपे कशी बनवावीत इत्यादी.

वास्तविक पाहता दरवर्षी पावसाळ्यामध्ये वृक्षारोपण मोहिमांना सर्वत्र उधाण येते. मात्र त्यापैकी किती झाडे जगतात हा एक संशोधनाचाच विषय आहे. म्हणूनच केवळ एक दिवसापुरते वृक्षारोपणाचे सोहळे आयोजित न करता लावलेल्या प्रत्येक झाडाला किमान तीन ते पाच वर्षे संरक्षण देऊन खत-पाणी व्यवस्थापन करायला हवं. या दृष्टीने वृक्षलागवड करताना नियोजन आणि पूर्वतयारी अत्यंत महत्त्वाची असते. स्थानिक भौगोलिकता, परिसंस्था व जैवविविधता असे घटक विचारात घेऊनच वृक्षारोपण करायला हवे. मुळात वृक्षारोपण करताना ते कशासाठी करायचे आहे, याबद्दल सर्वप्रथम स्पष्टता असायला हवी आणि त्यानुसारच रोपांची निवड करायला हवी. वृक्षलागवडीचे नियोजन करताना कोणते वृक्ष कुठे आणि कसे लावावेत, याबद्दलचे ज्ञान असणे ज्याप्रमाणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे वृक्षलागवड कुठे करू नये हेदेखील माहीत असायला हवे. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र, गवताळ परिसंस्थांचे प्रदेश, पश्चिम घाटातील वैशिष्ट्यपूर्ण सडे अशा ठिकाणी वृक्षारोपण करणे म्हणजे त्याठिकाणी नव्या पर्यावरणीय समस्या निर्माण करण्यासारखेच आहे.

### वन साक्षरता काळाची गरज

वन संवर्धनाच्या दृष्टिकोनातून आणखी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. ती म्हणजे, निसर्गामध्ये अशी एक व्यवस्था कार्यरत आहे की, ज्याद्वारे वनीकरणाची प्रक्रिया सातत्याने सुरुच असते. या व्यवस्थेमध्ये मधमाशा, खारूताई, वटवाघूळ, घुबड, हत्ती, वाघ अशा विविध छोट्या-मोठ्या जीवजाती प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान देत असतात. त्यांच्यामुळे नैसर्गिकरीत्या वन जोपासले जात असते. निसर्गाच्या नियमानुसार चालणारी वनीकरणाची ही प्रक्रिया अशीच अबाधित ठेवायची असेल तर मानवी हस्तक्षेपातून होणारा परिसंस्थेचा ऱ्हास टाळाला हवा. म्हणजेच परिसर आणि रानव्याचे नाते जपायला हवे. यात देशी वृक्षांना महत्त्व आहेच; पण त्याचबरोबर गवत, शेवाळ, वेली, झुडपे यांचे अस्तित्वही तेवढेच गरजेचे आहे. म्हणूनच मिश्र वनीकरण, परिसंस्थेचे पुनरुज्जीवन आणि व्यवस्थापन कसे करावे, याबद्दल यंदाच्या वन दिनानिमित्त प्रत्येकाने जाणून घ्यायला हवे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर प्रत्येकाने 'वन साक्षर' व्हावे आणि वन संवर्धनाप्रति संवेदनशील व कृतिशील बनावे. यातूनच वनांची शाश्वतता राखायला मदत होईल आणि शाश्वत वनेच आपल्याला शाश्वत भविष्य प्रदान करतील.

(लेखक हे वनराई संस्थेचे सचिव आहेत.)

### ग्राम विकासाला वनीकरणाची जोड

वन क्षेत्राच्या सभोवताली आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आढळून येते. त्यामुळे त्यांच्या सहभागाशिवाय वनांचे संवर्धन - व्यवस्थापन होऊ शकत नाही हे वास्तव आहे. मुळात वन आणि आदिवासी यांचे पूर्वापार चालत आलेलं एक अतूट असं नातं आहे. पिढ्यान्‌पिढ्या वनांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या या स्थानिक आदिवासी समुदायांना वनांचे लाभ घेण्याचे घटनात्मक अधिकार आहेत, तसेच पारंपरिक ज्ञानातून वनांचे व्यवस्थापन करण्याची सामूहिक जबाबदारीही कायद्याने त्यांना दिली आहे. आदिवासी समाज आणि वने यांचे नाते केवळ आर्थिक नाही, तर ते सांस्कृतिक, धार्मिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे आहे. म्हणूनच वनसंवर्धन आणि आदिवासी हक्कांचे संरक्षण करणे संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे. जंगलांचे रक्षण हे केवळ पर्यावरणासाठी नव्हे, तर या वनसंवर्धकांच्या अस्तित्वासाठीही गरजेचे आहे. त्यामुळे आपल्यालाही झाडे लावा, निसर्ग वाचवा हा संदेश अंगीकारून वनसंवर्धनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. लोकाभिमुख कायद्यांचा आणि योजनांचा वापर करून गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा-लेखासारखी आदिवासी गावं या दिशेने पथदर्शक काम करत आहेत. ग्राम विकासाला वनीकरणाची जोड देऊन आदर्शगावाच्या दिशेनं वाटचाल करणारी हिवरेबाजार आणि गावडेवाडी यांसारखी पश्चिम महाराष्ट्रातील (एके काळची दुष्काळी) गावंही मागे नाहीत. देशात काही ठिकाणी तर एखाद्या व्यक्तीच्या ध्यासातूनही घनदाट वन आकारास येत असल्याचे चित्र दिसत आहे. अशा काही गावांची आणि व्यक्तींची प्रेरणादायी उदाहरणं जगासमोर आणून त्यावर चर्चाही घडवून आणल्या पाहिजेत. जेणेकरून इतरांना त्यापासून प्रेरणा मिळू शकेल.

Mrgabharti_75000

**वनांचे महत्त्व ओळखून त्यांचे संरक्षण करून जागरूकता वाढवण्यासाठी २१ मार्च रोजी जागतिक वन दिवस साजरा केला जातो. जागतिक वन दिनाची या वर्षाची थीम वन आणि अन्न (Forests and Food) अशी आहे. अन्न सुरक्षा, पोषण आणि उपजीविकेमध्ये जंगलाचे महत्त्व अधोरेखित असून जंगले वाचली तरच मानवाला चांगले अन्न मिळू शकेल, त्यासाठी जंगलांचे संवर्धन व संरक्षण करणे आवश्यक आहे.**

# व्याघ्र संरक्षणातून वन संवर्धनाकडे...

वन संवर्धनाबरोबरच जंगलातील अन्न साखळी अबाधित राहणे आवश्यक आहे. जंगलातील वन्य प्राणी पुरेशा प्रमाणात राहिले तरच वनांचे संवर्धन योग्यरीत्या होते. जंगलातील अन्न साखळीमधील महत्त्वाचा घटक हा जंगलाचा राजा वाघ आहे. वाघांचे अस्तित्व अबाधित राहिले तरच वनांमधील प्राणी जीव जगतील. त्यासाठी महाराष्ट्राचा वन विभाग कार्यरत आहे.

व्याघ्र संवर्धन व संरक्षण हे पर्यावरणीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. वाघ हा एक अत्यंत महत्त्वाचा प्राणी आहे, जो वन्यजीवांचे तंतोतंत संतुलन राखण्यात मदत करतो. त्याचप्रमाणे वाघांमुळे अन्य वन्यजीवांच्या विविध प्रजातींचे संरक्षण होत आहे. अनेक संरचनात्मक आणि कायदेशीर उपायांमुळे वाघांची संख्या भारतात वाढत आहे. महाराष्ट्रातही गेल्या काही वर्षांत वाघांच्या संख्येत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

## महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्प

महाराष्ट्र राज्यात सध्या सहा राष्ट्रीय उद्याने, ५२ अभयारण्ये व २८ संवर्धन राखीव अशी एकूण ८६ संरक्षित क्षेत्रे असून त्यांचे क्षेत्रफळ सुमारे ११ हजार ६०.०९८१ चौ.कि.मी. आहे. राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या ३.५९ टक्के क्षेत्र हे संरक्षित क्षेत्र आहे. राज्यातील १९ संरक्षित क्षेत्रांचा (पाच राष्ट्रीय उद्यान व १४ अभयारण्य) समावेश करून सहा व्याघ्र राखीव क्षेत्र निर्माण करण्यात आले आहेत. त्यामध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, पेंच व्याघ्र प्रकल्प- नागपूर, मेळघाट व्याघ्र प्रकल्प-अमरावती, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प - कोल्हापूर, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प आणि बोर व्याघ्र प्रकल्प यांचा



Mrgabharti 75000

समावेश आहे.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार, दर चार वर्षांनी वाघांची गणना करण्यात येते. या पुढील गणना २०२६ मध्ये होणार आहेत. पूर्वी वाघांचे प्रत्यक्ष दर्शन, पदचिन्हे आणि इतर दुय्यम पुराव्यांच्या आधारे वाघांच्या संख्येचा अंदाज करण्यात येत असे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान (एनटीसीए) व भारतीय वन्यजीव संस्थेच्या वतीने देशभरात वाघांची गणना केली जाते. २००६ मध्ये देशात नव्या सुधारित पद्धतीने वाघांच्या संख्येचा अंदाज करण्यात आलेला आहे. २०१९ पासून (एनटीसीए) व भारतीय वन्यजीव संस्थेच्यावतीने व्याघ्र गणना केली जाते. त्यानुसार सन २०२२ मध्ये पाचवी अखिल भारतीय व्याघ्र प्रगणना करण्यात आली. त्या अहवालानुसार महाराष्ट्रात किमान ४४४ वाघांचे अस्तित्व आढळून आले आहे.

महाराष्ट्राच्या वन विभागाने केलेल्या प्रयत्नांमुळे गेल्या काही वर्षांत राज्यातील वाघांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे आढळून आले आहे. सन २००६ मध्ये १०३, २०१० मध्ये १६९, २०१४ मध्ये १९०, २०१८ मध्ये ३१२ आणि २०२२ मध्ये ४४४ एवढे वाघ अस्तित्वात असल्याचे आढळून आले आहेत. त्यापैकी राज्याच्या संरक्षित क्षेत्रामध्ये २५०, तर जवळपास २०० वाघांचा वावर हा संरक्षित क्षेत्राच्या बाहेर आढळून आला आहे.

गेल्या काही वर्षांत जशी वाघांची संख्या वाढत आहे, तसेच त्यांच्या शिकारीचे, अवेळी मृत्यूचे आणि मनुष्य-वाघ संघर्षांच्या समस्याही निर्माण होत आहे. त्यावर महाराष्ट्र वन विभाग अभ्यास करून उपाययोजना करत आहे.

### वाघांच्या मृत्युमागचे वास्तव

गेल्या काही काळातील वाघांच्या मृत्यूच्या कारणांचा अभ्यास वन विभागाने केला आहे. त्यानुसार, विकास प्रकल्पांमध्ये विशेषतः रेखीय प्रकल्पांमध्ये (उदा. रस्ते, कालवे, रेल्वेमार्ग) वाढ, स्वतःचा नवीन प्रदेश (Territory) निर्माण करण्यासाठी प्रौढ नर वाघांची भटकंती, प्राण्यांमधील अंतर्गत संघर्ष व शावकामधील नैसर्गिक निवडीच्या कारणांमुळे अशक्त शावकांचा मृत्यू, अवैध विजेच्या तारांमधून विजेचा धक्का लागणे, अवैध शिकारी, जंगल तुकड्यांमध्ये

### वाघांचे संरक्षण व संवर्धनासाठी उपाययोजना

वाघांचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र वन विभागाच्या वतीने खालीलप्रमाणे कार्य करण्यात येत आहे.

- वाघाच्या वास्तव्याच्या ठिकाणी गस्ती करून संनियंत्रण करण्यात येत आहे.
- व्याघ्र संरक्षण दलातील पथकामार्फत अतिसंवेदनशील क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते. तसेच डॉग स्कॉड अंतर्गतसुद्धा गस्ती करून शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- M-Stripes प्रणाली असलेल्या मोबाईलचा पुरवठा क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना करण्यात आला आहे. त्याद्वारे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते.
- राज्यातील वन्यप्राण्यांबाबत गुन्हे प्रकरणांची अद्ययावत माहिती ठेवण्याकरिता वन्यजीव गुन्हे कक्ष Wildlife Crime Cell प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, नागपूर येथे तयार करण्यात आला आहे.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तयार करण्यात आलेल्या सायबर सेलच्या माध्यमातून शिकारीच्या घटनांमधील आरोपींचा शोध घेण्यात येतो.
- अतिसंवेदशील क्षेत्रात आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके तयार करण्यात आले आहेत.
- रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी फलक लावण्यात आलेले आहेत.
- विद्युत प्रवाहामुळे वाघांचे व अन्य प्राण्यांचे मृत्यू होऊ नये, म्हणून वनविभाग व विद्युत वितरण विभाग मिळून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संयुक्त गस्त करण्यात येत आहे.
- वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी वर्षातून एक किंवा दोनदा पोलीस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा व्याघ्र कक्ष समितीच्या सभेचे आयोजन करण्यात येते.
- अवैध शिकार रोखण्यासाठी खबऱ्यांची मदत घेण्यात येत आहे.
- गावकऱ्यांचे बैठका घेऊन, पत्रके लावून त्यांच्यात जनजागृती निर्माण करण्यात येत आहे.
- वाघांचे सनियंत्रण करण्यासाठी मानद वन्यजीव रक्षक यांचे सहकार्य व मार्गदर्शन वेळोवेळी घेण्यात येत आहे.
- ज्या क्षेत्रात वाघाचे अस्तित्व आहे, त्या ठिकाणी Tiger Trackers म्हणून गस्ती पथकाची नेमणूक करून त्यांच्यामार्फत वाघांवर लक्ष ठेवण्यात येत आहे.
- वाघ असलेल्या क्षेत्रात कृत्रिम पाणवठे निर्माण करून पाण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.
- वाघाचे भ्रमणमार्ग, पाणवठे व महत्त्वाच्या ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून संशयास्पद हालचालींवर पाळत ठेवण्यात येते. तसेच पाण्यामध्ये विषप्रयोग होऊ नये, याकरिता नियमित पाणवठ्यांची तपासणी केली जाते.
- व्याघ्र क्षेत्रात गवत कुरण व इतर मृद् व जलसंधारणाची कामे करून त्या ठिकाणी गवत व इतर चराई योग्य प्रजाती यांची लागवड करून तृणभक्षी प्राण्यांसाठी कुरण निर्मिती केली जात आहे.
- वाघ संवर्धनासाठी प्रादेशिक वन कर्मचाऱ्यांचे संवेदनीकरण करण्यात येत आहे.
- व्हीएनआयटीच्या मदतीने वाघ, बिबट्या आणि अस्वल यांच्या हालचाली आणि मानवी वस्तींच्या सान्निध्याचे निरीक्षण करण्यासाठी एआय आधारित मानव-प्राणी संघर्ष शमन यंत्रणा कार्यान्वित केली जात आहे. गावे किंवा कृषी क्षेत्राच्या परिघाजवळ आयपी कॅमेरे लावण्याचा विचार सुरू आहे.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्पात तयार करण्यात आलेल्या सायबर सेलच्या माध्यमातून शिकारीच्या घटनांमधील आरोपींचा शोध घेण्यात येतो.

Mrgabharti_75000

विभागल्याने व मानवी जनसंख्या वाढल्यामुळे वन्यप्राणी व मानव संघर्ष अशा विविध कारणांमुळे वाघांचा मृत्यू होत असल्याचे आढळून आले आहे.

## मानव-वन्यजीव संघर्ष

मानव-वन्यजीव संघर्ष ही एक गंभीर पर्यावरणीय आणि सामाजिक समस्या आहे. मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्षामुळे दोघांनाही हानी पोहोचत आहे. या संघर्षामुळे अनेक वन्यजिवांच्या प्रजातींच्या




अस्तित्वावर धोका निर्माण होतो. जंगलाच्या जवळपास विकास कामे सुरू झाल्यामुळे मनुष्य-वन्यजीव संघर्ष वाढीस लागले आहेत.

## मानव-वन्यजीव संघर्षाची कारणे

वनक्षेत्रांची हानी आणि अतिक्रमण, अन्नांचा अपुरा पुरवठा आणि शिकार, मनुष्य व वन्यजीव यांच्यातील थेट संघर्ष, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे विस्थापन, अवैध शिकारी, लाकूड तस्करी आदींचा समावेश आहे.

## मानव-वन्यजीव संघर्षावरील उपाययोजना

याशिवाय मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी राज्यात नवीन २० जलद बचाव दल तयार करण्यात येणार आहेत. तसेच ताडोबा व्याघ्र प्रकल्पात प्रायोगिक तत्त्वावर ई-मेल आणि मोबाईल ॲपद्वारे जंगलाजवळच्या लोकांना धोक्याची सूचना देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याचबरोबर वाघांचे स्थलांतर, बफर क्षेत्राजवळील पडीक जमिनी, वन जमिनींचे वळतीकरण करणे, जलद प्रतिसाद पथकांसाठी पदांची निर्मिती आदी उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

मानव वन्यजीव संघर्षात विशेषतः गडचिरोली जिल्ह्यात होणारे वाघ हल्ले थांबवण्यासाठी मुख्यमंत्री तथा गडचिरोलीचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष लक्ष घातले आहे. वाघांचे हल्ले रोखण्यासाठी व मानव वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी कृतिआराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांत झालेल्या वाघांच्या हल्ल्यातील मृत्युंची माहिती घेऊन त्या मृतांच्या कुटुंबीयांना विशेष नुकसानभरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत.

## व्याघ्र संवर्धनासाठी एआयचा वापर : वने मंत्री गणेश नाईक

वाघांचे मृत्यू रोखण्यासाठी राज्य शासनाचा वन विभाग अनेक उपाययोजना राबवत आहे. वाघांचे संवर्धन, संरक्षण आणि मानव-वाघ संघर्ष टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. संवेदनशील गावाजवळील वाघ/बिबट्या/अस्वले या प्राण्यांची उपस्थितीचा अंदाज घेण्यासाठी आणि रिअल टाईम अर्लट तयार करण्यासाठी या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येणार आहे. वाघांचे संवर्धन व संरक्षण होणे हे अत्यावश्यक आहे. वाघांच्या शिकार व तस्करीला आळा घालण्यासाठी आसाम सरकारच्या धर्तीवर कठोर कायदा करण्याचा विचार आहे. शिकारी, अवैध विद्युत तारा यांच्यापासून वाघांचे संरक्षण करण्यासाठी कठोर कारवाई करण्याच्या सूचना वने मंत्री गणेश नाईक यांनी दिल्या आहेत.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार राज्याचे वनक्षेत्र किमान ३० टक्के असायला हवे. या अनुषंगाने महाराष्ट्राचे वनक्षेत्र २१ टक्क्यांवरून ३०% पर्यंत नेण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. जंगलांच्या गाभा क्षेत्रामध्ये रानफळांची रायवळ आंबे, बोर, जांभूळ इत्यादी झाडे लावल्यास शाकाहारी प्राण्यांसोबतच मांसाहारी प्राण्यांच्यादेखील अन्नाची सोय होईल. त्यामुळे भक्ष्याच्या शोधार्थ वाघ मानवी वस्तीपर्यंत येणार नाहीत, यासाठी वन मंत्री गणेश नाईक हे प्रयत्नशील आहेत.

व्याघ्र संरक्षणासाठी शासन आणि विविध स्वयंसेवी संस्था सातत्याने काम करत आहेत. वाघांचे संरक्षण हे केवळ त्यांच्या प्रजातीसाठी नाही तर संपूर्ण निसर्गासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,** विभागीय संपर्क अधिकारी

Mrgabharti_75000

संत अभंगांचे केवळ पठण, गायन किंवा चिंतन करून नव्हे, तर त्यांचे प्रत्यक्ष आचरण केल्यानेच त्यांचा खरा अर्थ समजतो. तुकाराम महाराजांच्या अभंगांचे गाडगे महाराजांनी प्रत्यक्षीकरण केले. लौकिकाची लाज टाकून, त्याग व निरपेक्ष सेवा स्वीकारून त्यांनी संतत्व गाठले. आचार आणि विचार यांचा संगम आवश्यक असून, केवळ बाह्य आचाराने नव्हे, तर आंतरिक शुद्धीनेच खरा संत होतो.

# एक तरी अभंग अनुभवावा!

**डॉ. दिलीप धोंडगे**

संतांच्या अभंगवाणीचा समाजमनावर होणारा परिणाम मोजणे अवघड आहे; पण परिणाम मात्र होतो. समाजातील काही घटक आपल्या वर्तनात इष्ट बदल घडवून आणतात, असे सर्वसाधारण चित्र दिसते; पण प्रमाणशः बदलाचा अभ्यास काही झालेला नसावा. समाजशास्त्रज्ञांनी असा अभ्यास करायचा ठरवला तर वारकरी संप्रदायाच्या आचारसंहितेच्या अंगाने सर्वेक्षण करून निष्कर्ष प्रस्थापित करता येतील.

## अभंगवाणीचा अनुभव

भजन, कीर्तन, वारी इत्यादी घटकांना लक्षात घेऊन आचरणाची आकडेवारीही काढता येईल; पण हे सर्व ढोबळमानानेच कळेल. आचरणे व अनुभवणे यात निश्चितच भेद आहे. सामूहिक आचरण व वैयक्तिक आचरण यांतही भेद आहे. अनुभवणे ही आचरणाच्या वरची अवस्था आहे. ती खूप अवघड आहे. *'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी।।'* असे नामदेवराय का म्हणाले, याचा विचार करता येतो. नऊ हजार ओव्यांचा ग्रंथराज, त्यांतील एक तरी ओवी अनुभवावी असे नामदेव महाराज तळमळीने सांगतात. एक तरी म्हणजे एक का होईना, ती अनुभवावी म्हणजे, ती जगून दाखववी. तिचे प्रत्यक्षीकरण करून दाखवावे. त्या साडेतीन चरणी ओवीत काय एवढे असणार असा प्रश्न कोणालाही पडू शकतो; पण त्या साडेतीन चरणी ओवीत सबंध ज्ञानेश्वरीभर जे असणार आहे तेच असणार. तत्त्वज्ञान, काव्य, सिद्धान्त किंवा सिद्धान्ताचे स्पष्टीकरण करणारा दृष्टान्त असणार आहे, एकजिनसी स्वरूपात! जे



सागरात ते त्यातील एका थेंबात. सागराचे आचमन केले तर उत्तमच; पण ते सर्वांना शक्य नसते किंबहुना कोणालाच शक्य नसते, तर त्या थेंबाचे तरी आचमन करावे. जो कोणी हे करतो, तो संतच होतो.

तुकोबांच्या एका अभंगाचे असे प्रत्यक्षीकरण केले व ती व्यक्ती संतच गणली गेली. संत असण्याबद्दल सर्वच संत उदासीन होते, त्याप्रमाणे प्रत्यक्षीकरण करणारी ती व्यक्तीही अर्थातच उदासीन होती. भक्त म्हणून आपला अधिकार सिद्ध करणाऱ्या अनेक श्रेष्ठ व्यक्ती होऊन गेल्या किंवा होताना दिसतात. पण संत या पदवीला पोहोचलेले कोणी दिसत नाही. संतांच्या शिकवणुकीने अंतर्बाह्य बदलणाराच संत होतो. बाह्य बदलाची अनेक उदाहरणे सापडतात. आचार धर्माप्रमाणे बाह्यतः वर्तन करणाऱ्या अनेक व्यक्ती सापडतात. वाचेचा रसाळ दिसेल; पण अंतरी निर्मळ असेलच असे नव्हे. अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ यांचं एकत्रीकरण सापडायला हवं, ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे.

तुकोबांचा प्रत्यक्षीकृत अभंग असा:

*सांडुनिया सर्व लौकिकाची लाज ।*
*आळवा यदुराज भक्तिभावे ।*
*पाहुनिया झाडे ओरबाडुनि पाला।*
*खाऊनि विठ्ठला आळवावे ।।*
*वेचुनिया चिंध्या भरोनिया धागा।*
*गुंडाळोनि ढुंगा आळवावे।*
*तुका म्हणे ऐसे मांडिल्या निर्वाण ।*
*तया नारायण उपेक्षीना ।।*

## संत गाडगे महाराजांचा लौकिक व त्याग

सर्व प्रकारच्या लौकिकाची लाज टाकून यादवांचा स्वामी जो श्रीकृष्ण त्याचे भजन करावे म्हणजे श्रीकृष्णाला आळवावे. ज्यांचा पाला खाण्यासारखा आहे अशी झाडे पाहून त्यांचा पाला ओरबाडून खावा आणि विठ्ठलाचे भजन करावे. रस्त्यातील चिंध्या वेचाव्या आणि

Mrgabharti_75000

एकेक जोडण्यासाठी त्या शिवाव्या आणि त्यांचे महावस्त्र तयार करून ते नेसावे आणि पांडुरंगाला आळवावे. तुकाराम महाराज आपल्या अभंगाच्या अखेरच्या कडव्यात म्हणतात की: अशा प्रकारचे निर्वाण एखाद्याने मांडल्यानंतर परमेश्वर त्याची उपेक्षा करीत नाही. निर्वाण मांडणे म्हणजे परकाष्टेचे वैराग्य धारण करणे. अंगात शक्ती आहे, जमीनजुमला आहे, पैसाअडका आहे, यांच्यात वाढ करण्याची युक्तीप्रयुक्ती आहे; पण या किंवा इतर लौकिकसंबद्ध गोष्टींचा त्याग करायचा आणि निष्काम भावनेने परमेश्वराला आळवायचे, परमेश्वराचे सखोल चिंतन करायचे. घरात धनधान्य आहे, फळफळावळ आहे, सुकामेवा खरेदी करण्याची ऐपत आहे, पण त्या सगळ्यांकडे पाठ फिरवायची व झाडपाला खाऊन तृप्त व्हायचे आणि आनंदाने जगायचे; पण ही तृप्ती लाभते ती विठ्ठलाला आळवण्याने. उंची वस्त्रे प्रावरणे वापरण्याची हौस आहे, तसा चोखंदळपणाही आहे, त्यासाठी लागणारा पैसा खर्च करण्याची क्षमताही आहे; पण जाणीवपूर्वक चिंध्याचिंध्यांचे जोडलेले वस्त्र अंगाभोवती गुंडाळून विठ्ठलाला आळवायचे. असे हे परम वैराग्य.



एव्हाना या अभंगाचे प्रत्यक्षीकरण करणाऱ्या संताचे नाव आपणास आठवलेच असणार. अर्थातच संत गाडगे महाराज. लोकांनी ठेवलेले नाव. ढेबूजी झिंगराजी जानोरकर हे लौकिक नाव केव्हाच गळून गेलेले. गाडगे महाराज. केवढे पवित्र नाम! जराही विचित्र वाटू नये. समाजातील अज्ञान, अनिष्ट चालीरीती आणि अंधश्रद्धा पाहून त्यांनी निरपेक्ष लोकसेवेचे व्रत स्वीकारले. यासाठी लौकिकाची लाज सोडली. म्हणून तर लोकांनी गाडगे महाराज म्हटले, चिंधडे बुवा म्हटले, गोधडे बुवा म्हटले. लौकिकाची लाज सांडली नसती तर ढेबूजीचे बापूजी असे नामांतर करून पुढे राव असेही पद चिकटवून घेतले असते. महाराज खाण्याबाबतही उदासीन होते. श्रीमंत भक्तांनी दिलेले चांगले अन्न ते भिकाऱ्यांना वाटून टाकीत आणि स्वतः गोरगरिबाघरी भिक्षा मागून गावाबाहेर झाडपाल्याच्या चटणीसह खात. महाराजांचा देह केवढा धिप्पाड! दुहेरी हाडपेराच्या महाराजांच्या अंगातली ताकद कधी कमी झाली नाही. बारा जीवनसत्वांचा कधी अभाव जाणवला नाही. आसक्ती नसली की जीवनसत्वांचा अभाव जाणवत नाही. जिभेचे चोचले जितके पुरवू तितके थोडे पडतात. रसनेचे अंकित होणाऱ्याला रसनाच खाऊन टाकते. 'अशी ही मरीमाय सोतासोतालेच खाय' असे बहिणाबाई चौधरींच्या भाषेत म्हणता येते. चिंध्या वेचायच्या, त्यांना जोडण्यासाठी धागे घालायचे आणि ते लज्जा रक्षणासाठी गुंडाळून विठ्ठलाला भजायचे. लौकिकाची लाज सांडण्याचा हा प्रकर्ष होय. लोकांनी वापरलेली व फेकून दिलेली फाटकी वस्त्रे म्हणजे चिंध्या. गाडगे महाराजांच्या शरीरावर ते वस्त्र महावस्त्रासारखे दिसायचे. जातीच्या सुंदराला सर्व काही शोभावे याप्रमाणे. लौकिक जगतामध्ये फॅशन नावाच्या गोष्टीला ऊत आलेला आहे. लौकिक सांभाळण्यासाठी एक नूर आदमी दस नूर कपडा अशी स्थिती आहे; पण अस्तित्वाचा लोप करून टाकायचा. नामरूपाने राहायचेच नाही ही त्यागाची परमावधी होय. असे अटीतटीचे जो जगतो, त्याची नारायण उपेक्षा करीत नाही; पण जनता जनार्दनही करीत नाही. दर शतकात अशी चरित्रे उजळत जातात. त्यांच्या जाण्यानंतरही कीर्तीचा सुगंध आसमंतभर दरवळत राहतो. मरून उरणे याला म्हणतात. जगताना जे हरघडी मरतात, असे कोट्यवधी जिवाणू असतात. काळावर आपली नाममुद्रा जनतेकडून उमटवली जाणे हे भाग्य फारच थोर; पण हे आपसूक लाभत नाही. त्यासाठी निर्वाण मांडावे लागते, पराकाष्ठेचे वैराग्य धरावे लागते, अटीतटीचे जगावे लागते.

### संतत्वाची खरी ओळख

तुकोबांचा अभंग लक्षावधी, कोट्यवधी साक्षर वाचतात. त्यावर पांडित्यपूर्ण निरूपण करतात, ख़्याल गायकीत गातात, कीर्तनात सोडवला जातो, विद्यापीठात अभ्यासला जातो. आऊटपुट काय? मस्त निरूपण जमवले, गाणं फारच जमलं, अभंगावरचं कीर्तन रंगल, प्रश्नाचं छान उत्तर लिहून भरपूर मार्क्स पटकावले. लौकिकाकडून लौकिकाकडे. एका निरक्षराने आपल्या अक्षर प्रतिभेच्या जोरावर अर्थ जाणून घेतला आणि तत्क्षणी कृतीत उतरवण्याला प्रारंभ केला. अभंगाचे प्रत्यक्षीकरण केले. हा अभंगाचा खराखुरा अर्थ. संत होण्यासाठी जैविक नाते लागत नाही. देहाने निरसावे लागते, लौकिकमुक्त व्हावे लागते. तुकोबांचाच एक अभंग आहे :

*नव्हती ते संत करिता कवित्व। संतांचे ते आप्त नव्हती संत ।।*
*येथे नाही वेश सरत आडनाव। निवडे घावडाव व्हावा अंगी।।*
*नव्हती ते संत धरिता भोपळा । करिता वाकळा प्रावरणासी ।।*
*नव्हती ते संत करिता कीर्तन। सांगता पुराणे नव्हती संत ।।*
*नव्हती ते संत वेदाच्या पठणे। कर्म आचरणे नव्हती संत ।।*
*नव्हती ते संत करिता तप तीर्थाटन । सेविलिया वन नव्हती संत ।।*
*नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणे। भस्म उधळणे नव्हती संत ।।*
*तुका म्हणे नाही निरसला देहे। तोंवरी आवघे सांसारिक ।।*

तुकोबांनी देह निरसन किती तपः सामर्थ्याची कसोटी पाहणारे आहे, हे स्पष्ट केले आहे. आधुनिक कालखंडात गाडगे महाराजांनी त्याचे प्रत्यक्षीकरण करून दाखवले. यामुळे गाडगे महाराजांनी म्हटले होते की, संत तुकाराम आमचे गुरू आहेत व माझा कोणीही शिष्य नाही.'

**(लेखक हे संत साहित्याचे अभ्यासक आहेत.)**

Mrgabharti_75000



# महामानवाला विनम्र अभिवादन...

## (भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकोत्तर पुरुष होते.
त्यांनी समाजातील उपेक्षितांसाठी केलेले कार्य हे अजोड स्वरूपाचे आहे.
ते प्रकांडपंडित होते, त्यांचे विविध विषयांवर प्रभुत्व होते.
समाजकारण, अर्थकारण, राजकारण, कृषी, कामगार, शेतकरी, जलधोरण
या विषयांवरील विविध लेखांचा समावेश या अंकात केला आहे.

Mrgabharti 75000

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एक श्रेष्ठ संविधानतज्ज्ञ होते. त्यांनी जगातील अनेक देशांच्या संविधानाचा अभ्यास केला होता. कायदा आणि संविधानाबाबत त्यांचा सूक्ष्म आणि सखोल अभ्यास होता. अप्रतिम आणि अद्वितीय असे भारतीय संविधान लिहिल्याबद्दल अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने मानद पदवी देऊन त्यांचा उचित गौरव केला.

# श्रेष्ठ संविधानाचे निर्माते!

**डॉ. प्रदीप आगलावे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान लिहून संविधानसभेत संविधानातील कलमांवर अभ्यासपूर्ण भाष्य केले. संविधानसभेतील सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांची समाधानकारक आणि विचारप्रवृत्त करणारी उत्तरे त्यांनी दिली. याची प्रचिती संविधानसभेतील चर्चा वाचल्यानंतर येते. त्यांनी भारतीय संविधानातील विविध कलमांच्या संदर्भात केलेले भाष्य हे आजदेखील उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकरिता मार्गदर्शक आहे. न्यायमूर्ती बाबासाहेबांच्या विधानांचा आधार घेऊन निर्णय घेतात. डॉ. आंबेडकर हे जागतिक ख्यातीचे संविधानतज्ज्ञ होते; परंतु ते एका दिवसात संविधानतज्ज्ञ बनले नाहीत. त्याकरिता त्यांनी जगातील विविध कायद्यांचा आणि संविधानाचा अतिशय चिकाटीने अभ्यास केला, त्यासाठी खूप परिश्रम घेतले.

## संविधानाचा अभ्यास

डॉ. आंबेडकर यांनी संविधानाचा अभ्यास कशा प्रकारे केला? या संदर्भातील एक घटना अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थी आणि अभ्यासकांनी अभ्यास कसा करावा, या संदर्भात त्यांना मार्गदर्शन करणारी ही घटना आहे. भारताला अधिक राजकीय अधिकार देण्याच्या संदर्भात विचारविमर्श करण्यासाठी एक आयोग नियुक्त करण्याची घोषणा इंग्लंडचे प्रधानमंत्री स्टेनले बाल्डविन यांनी केली. आणि २६ नोव्हेंबर १९२७ ला भारतीय संविधानिक आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे अध्यक्ष सर जॉन सायमन हे होते. म्हणून या आयोगाला 'सायमन कमिशन' असे संबोधले जाते. सायमन आयोगाशी विचारविमर्श करण्यासाठी राज्यस्तरावर विधिमंडळ सदस्यांच्या एका समितीची निवड करण्यात आली. या सात सदस्यांच्या समितीवर डॉ. आंबेडकर यांची सदस्य म्हणून ५ ऑगस्ट १९२८ ला मुंबई विधिमंडळातून निवड झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्थशास्त्र आणि कायदा या विषयांचा सखोल व सूक्ष्म अभ्यास होता. त्यांनी राजकारणावरील काही पुस्तके वाचली होती. डॉ. आंबेडकर यांना जाणीव झाली की, आता भारतीय राजकारणात संविधानाचा विषय फार मोठ्या प्रमाणात चर्चेत येईल. अशा वेळी मौन राहणे अत्यंत धोक्याचे आहे. ते विचार करू लागले की, सायमन आयोगाशी विचारविमर्श करण्याची संधी मला मिळाली आहे. म्हणून अस्पृश्यांच्या राजकीय हितांची सुरक्षा करण्यासाठी आणि देशाच्या राजकीय अधिकारांकरिता आपण काही भरीव कार्य केलेच पाहिजे. प्रदेश समितीवर निवडून आल्याचे जाहीर झाल्याबरोबर बाबासाहेबांनी ६ आणि ७ ऑगस्टला आपल्या काही मित्रांकडून ४०० रुपये उधार घेतले. ८ ऑगस्टला तारापूरवाला बुक सेलर्सच्या दुकानातून ८५० रुपयांची संविधानाशी संबंधित पुस्तके विकत घेतली. ९ ऑगस्टपासून सकाळी आपल्या कार्यालयाच्या खिडक्या आणि दरवाजा बंद करून विकत घेतलेल्या १५-२० ग्रंथांच्या अभ्यासाला ते बसले.



काही लोक यायचे आणि दरवाजा ठोठावत. डॉ. आंबेडकर आपल्या त्रासिक मुद्रेने त्यांना परत जायला सांगत. काही वेळानंतर आणखी दुसरे लोक यायचे. ते

Mrgabharti 75000

देखील दरवाजा ठोठावत. त्यांनादेखील ते परत जायला सांगत. त्यामुळे संविधानाशी संबंधित ग्रंथाचा अभ्यास करण्यामध्ये अडथळा व्हायचा. आपल्या अभ्यासात लोकांचा त्रास होतो, ही बाब लक्षात घेऊन त्यांनी त्यांचे कार्यकर्ते मडकेबुवा यांना सांगितले की, 'मडके बुवा, दरवाज्याला बाहेरून कुलूप लावा. सकाळी, दुपारी आणि सायंकाळी इराण्याकडून मला खिडकीतूनच चहा देण्याची व्यवस्था करा आणि दुपारचे व संध्याकाळचे जेवणदेखील खिडकीतूनच द्या.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितल्याप्रमाणे मडके बुवांनी व्यवस्था केली. तसेच त्यांनी डॉ. आंबेडकर यांना सांगितले की, 'जर तुम्हाला काही कामासाठी माझी आवश्यकता वाटली, तर मला बोलावून घ्या. मी कार्यालयाच्या बाहेरच्या बाकावर झोपून राहीन.' अशा प्रकारे कार्यालयाच्या दरवाज्याला बाहेरून कुलूप लावून डॉ. आंबेडकरांनी सतत दोन आठवडे अभ्यास केला. संविधानाच्या अभ्यासाची सुरुवात त्यांनी अशा प्रकारे केली होती. तारापूरवाला बुक सेलर्सकडून नंतरदेखील नवीन पुस्तके खरेदी केली. पुढे या दुकानाची पुस्तके खरेदीची इतकी उधारी झाली की, त्यांना उधारीचे पैसे परत करण्यासाठी १९३६ मध्ये 'चारमिनार' ही इमारत विकावी लागली.



## पहिली गोलमेज परिषद

भारताच्या भावी संविधानाच्या संदर्भात भारतीय प्रतिनिधींशी चर्चा करण्याचे ब्रिटिशांनी मान्य केले. त्याकरिता इंग्लंडमध्ये १२ नोव्हेंबर १९३० पासून पहिली गोलमेज परिषद आयोजित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गोलमेज परिषदेत आमंत्रित केले गेले.

पहिल्या गोलमेज परिषदेत प्रारंभिक सत्रानंतर एकूण ९ उपसमित्या बनवण्यात आल्या. संयुक्त संविधान समितीचा अपवाद वगळता बाकी सर्व समित्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सदस्य होते. दुसऱ्या आणि तिसऱ्या गोलमेज परिषदेतदेखील ते हजर होते. गोलमेज परिषदेत संघीय संरचना, प्रांतीय संविधान, अल्पसंख्याक, मताधिकार, संरक्षण, सेवा इत्यादी समित्यांमध्ये त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. या सर्व समित्यांच्या अहवालामध्ये त्यांच्या विचारांचा प्रभाव आढळून येतो. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे भारतीय संवैधानिक सुधारणांबाबत संयुक्त समितीच्या पुढे सर पॅट्रिक जेम्स फॅगन, सर जॉन थॉम्पसन, कर्नल बूरस, जेम्स व हटन, सर विन्स्टन चर्चिल, गिडने, सर सॅम्युअल होअर इत्यादी जवळपास २० व्यक्तींच्या साक्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संवैधानिक सुधारणांच्या संदर्भात विन्स्टन चर्चिलसारख्या मुत्सद्दी व्यक्तींना कोंडीत पकडले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोलमेज परिषदेतील उपसमितीच्या बैठकीत जे विचार मांडले होते, त्याचेच प्रतिबिंब १९३५च्या भारत कायद्यामध्ये आढळून येते. डॉ. आंबेडकर यांनी १९४७ ते १९४९च्या दरम्यान भारतीय संविधान लिहिले असले, तरी त्यापूर्वीच्या १९३५च्या भारत कायद्यावर डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव आढळतो. १९ जुलै १९४६ रोजी बंगाल प्रांतातील जस्सौर आणि खुलना या मतदारसंघातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. ९ डिसेंबर १९४६ पासून संविधानसभेच्या कामकाजास सुरुवात झाली. १७ डिसेंबर १९४६ रोजी जवाहरलाल नेहरू यांनी मांडलेल्या उद्देश प्रस्तावावर डॉ. आंबेडकर यांचे पहिले भाषण झाले. डॉ. आंबेडकर यांचे कायद्याबाबतचे ज्ञान आणि त्यांच्या विश्लेषणाच्या तर्कसंगत पद्धतीमुळे संविधानसभा भारावून गेली. त्यांचे विरोधक असलेल्या सदस्यांनीदेखील त्यांची स्तुती केली. डॉ. आंबेडकर यांनी भारतीय संविधानाचे प्रारूप तयार करून ते संविधानसभेला २४ मार्च १९४७ रोजी सादर केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अजून मसुदा समितीचे सदस्य आणि अध्यक्ष बनायचेच होते. त्यापूर्वीच त्यांनी संविधानाच्या विविध समित्या आणि उपसमित्यांवर काम करून संविधानाच्या कार्याला योग्य दिशा दिली. भारताच्या संघटित राज्याचे संविधान लिहून ते घटना समितीला सादर केले. त्यांनी आपले नियोजित संविधान मार्च १९४७ मध्ये प्रकाशित केले होते. यावरून हे स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकर यांनी ऑगस्ट १९२८ पासूनच संविधानाच्या सखोल आणि सूक्ष्म अध्ययनाला प्रारंभ केला होता. त्यांनी संविधानाच्या अभ्याससाठी अतिशय कठोर परिश्रम घेतले. त्यांच्यासारखा श्रेष्ठ संविधानतज्ज्ञ भारतात कुणीही नव्हता.

(लोकराज्य एप्रिल २०१५ मधून पुनर्मुद्रित)

Mrgabharti_75000

**तहानेने कासावीस झालेल्या ज्या अस्पृश्य मुलाला घोटभर पाणी कोणीतरी ओंजळीत वरून वाढेल, यासाठी एखाद्याच्या दयाळूपणाची तासन्‌तास वाट पाहावी लागत असे, त्या मुलाने पुढे या देशातील सर्व स्तरांतील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी धोरणांची आखणी करावी, हा काळाचा आणि त्या मुलाने पुढे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' होऊन संपादित केलेल्या प्रगाढ विद्वत्तेचा महिमा होता, याचे कृतज्ञ स्मरण या देशातील नागरिकांनी पाण्याच्या प्रत्येक घोटागणिक ठेवावयास हवे!**

# बाबासाहेबांची जलनीती!

**डॉ. आलोक जत्राटकर**

'चवदार तळ्याचे पाणी प्यायल्याने तुम्ही आम्ही अमर होऊ, असे नाही. आजपावेतो चवदार तळ्याचे पाणी प्यायलो नव्हतो, म्हणून तुम्ही आम्ही काही मेलो नव्हतो. चवदार तळ्यावर जायचे ते केवळ त्या तळ्याचे पाणी पिण्याकरिता नव्हे; तर इतरांप्रमाणेच आम्हीही माणसे आहोत, हे सिद्ध करण्याकरिताच आपणास त्या तळ्यावर जावयाचे आहे.' २६ डिसेंबर १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली भूमिका उपरोक्त शब्दांत स्पष्ट केली आहे. बाबासाहेबांनी पाण्याचा सत्याग्रह केला असेल अथवा मंदिर प्रवेशाचा, त्यांना तेथे प्रवेश मिळवण्यात स्वारस्य नव्हते, तर चातुर्वर्ण्य व्यवस्थेमध्ये शूद्रातिशूद्रांना, अस्पृश्यांना नाकारलेल्या समता हक्काची प्रस्थापना करण्यासाठी त्यांनी आपल्या समग्र चळवळी उभारल्या, हे लक्षात घ्यायला हवे.



## भारताच्या जल आणि विद्युत ऊर्जा धोरणाची पायाभरणी...

पाणी हा विषयही बाबासाहेबांसाठी समता आणि न्याय प्रस्थापनेच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. 'जातिनिर्मूलन' या ग्रंथामध्ये बाबासाहेबांनी सामाजिक न्याय व समता प्रस्थापनेसाठी सुचविलेल्या उपायांमध्ये संसाधनांच्या फेरवाटपाचा मुद्दा आहे. त्यामध्ये भूसंपत्ती व उद्योगधंद्यांचे समान वाटप, सार्वजनिक क्षेत्राचे सक्षमीकरण, श्रमिक आणि शेतकऱ्यांचे संरक्षण, शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये समान संधी यांचा समावेश होता. पाणी हा विषयसुद्धा संसाधनांच्या फेरवाटपामध्ये महत्त्वाचा असून ते इतके मूलभूत संसाधन आहे की, त्याच्या वितरणातील विषमता ही आर्थिक आणि सामाजिक अन्यायाला कारणीभूत ठरते. म्हणूनच आपल्या 'स्टेट्स अँड मायनॉरिटीज' या ग्रंथात पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क असल्याचे प्रतिपादन करतात. जलसंपत्तीवर केवळ काही मूठभरांचा नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचा अधिकार असला पाहिजे, असे बाबासाहेब सांगतात. म्हणूनच राज्यघटनेमध्ये त्यांनी जलसंपत्तीचा समावेश सार्वजनिक मालकीत करण्याची शिफारस केली. त्यासाठी नद्यांचे व जलस्रोतांचे नियंत्रण हे केंद्र सरकारच्या हातात असावे, यासाठी ते आग्रही राहिले.

बाबासाहेबांनी हे केवळ सैद्धांतिक पातळीवर सांगितले असे नव्हे, तर अत्यंत कृतिशील पद्धतीने भारताला प्रथमच त्याचे स्वतंत्र जल आणि ऊर्जा धोरण प्रदान केले. बाबासाहेबांची ही कामगिरी ऐतिहासिक स्वरूपाची आहे. १९४२ ते १९४६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ब्रिटिश सरकारच्या प्रभारी केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये ऊर्जा, जलनियोजन, कामगार, खनिकर्म आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री होते. त्याचप्रमाणे १९४७ ते १९५१ या कालावधीत स्वतंत्र भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळात कायदेमंत्री होते.

या कालावधीत बाबासाहेबांनी अनेक महत्त्वाची धोरणे आखली आणि भारताच्या जल आणि विद्युत ऊर्जा धोरणाची पायाभरणी

Mrgabharti_75000

केली. जलधोरणाच्या नियोजन आणि विकासातील बाबासाहेबांचा सहभाग फारच कमी लोकांना ठाऊक आहे. बाबासाहेबांनी या काळात प्रथमच केंद्रीय स्तरावर व्यापकपणे पाणी, खनिज संसाधने, वीज इत्यादींसाठी नियोजन हा मूलभूत विषय म्हणून विचारात घेण्यास सुरुवात केली. त्यामध्ये जल व विद्युत विकासासाठी धोरण निश्चित करणे, त्यासाठी आवश्यक प्रशासकीय आकृतिबंध तयार करणे, दामोदर, हिराकुड आणि सोन धरण प्रकल्प सुरू करणे आणि देशातील विविध राज्यांतील नद्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे आदी बाबींचा समावेश होता.

तत्पूर्वी १९३७ पर्यंत भारतातील पाणी वापरावर ब्रिटिश सरकारचे नियंत्रण होते. राज्यांना कालव्यामार्फत सिंचन सुविधा पुरविण्यासाठीही तेव्हा ब्रिटिश सरकार आणि संबंधित राज्यकर्त्यांमध्ये करार होत असे. १९३५च्या कायद्यान्वये राज्यांना बरेच अधिकार मिळाले. पुढे केंद्राच्या अधिकार कक्षेत भूजलमार्गावरील जहाज वाहतूक, माल वाहतूक यांचा समावेश केला गेला. या काळात सिंचन अगर वीज विकासासाठी स्वतंत्र कार्यालय नव्हते. देशातील विजेचा वापर, वितरण व्यवस्था यांचे कार्य आणि व्यवस्थापन यांविषयी काहीही माहिती वा आकडेवारी उपलब्ध नव्हती. अशा परिस्थितीत बाबासाहेबांनी या विभागांचा कार्यभार स्वीकारलेला होता.

बाबासाहेबांनी जलसिंचन, जलमार्ग, नौकानयन यांच्या मूलभूत कामासाठी राष्ट्रीय पातळीवर आर्थिक नियोजनास सुरुवात केली. जलसंसाधनांची निर्मिती, जलविद्युत निर्मितीसाठी धोरण निश्चित करून त्याच्या अंमलबजावणीस सुरुवात केली. जलनियोजनासाठी जल मंत्रालय, जल आयोग स्थापन करण्यात आले. देशातील नद्यांच्या विकासासाठी नदी खोरे प्राधिकरण सुरू करून जलनियोजनाला चालना दिली. जलसिंचन, जलपुरवठा, पूरनियंत्रण, जलविद्युत निर्मिती या संदर्भात राज्य सरकारांना मार्गदर्शन करणे, प्रकल्पांच्या कामासाठी वित्तीय मार्गदर्शन व सहकार्य पुरविणे, तांत्रिक तरतुदींचा सखोल अभ्यास करणे, भारतातील महत्त्वाच्या मोठ्या प्रकल्पांविषयी देखरेख करणे, देशातील विविध कार्यालयांकडून पाण्याविषयीची आकडेवारी संकलित करणे, त्याचे व्यवस्थापन करणे, पूरप्रवण नद्यांचा अंदाज बांधणे, पर्यावरण नियंत्रण करणे, धरण सुरक्षितता आणि जलसिंचन विषयक संशोधनाला चालना देणे अशी विविध प्रकारची कामे जल आयोगाच्या माध्यमातून करण्यात आली. यामुळे देशाच्या पाणी विषयक कार्याला मोठी चालना मिळाली. केंद्रीय वीज प्राधिकरणाची स्थापना ही बाबासाहेबांनीच १९४४ मध्ये केली, ज्यामुळे वीज निर्मिती व वितरण क्षेत्राला योग्य शिस्त आणि दिशा लाभली.

जलनियोजन करीत असताना त्याचा त्यांनी सूक्ष्म पातळीवर विचार केला. पाणी नियोजन, पाणी उत्पत्ती, मातीची होणारी झीज थांबविणे, जमिनी सुपीक करणे, शेतीची सुधारणा करणे, उद्योगासाठी वीजनिर्मिती करून विकास साधणे, शेती व उद्योगधंद्यांतील विकासासाठी सिंचन आणि विजेची आवश्यकता लक्षात घेऊन धरणांची बांधणी आणि त्याद्वारे वीजनिर्मितीकडे त्यांनी गांभीर्यपूर्वक लक्ष पुरविले. त्या अंतर्गतच त्यांनी दामोदर नदी खोरे, सोन नदी खोरे, महानदीसह ओरिसा नदी योजना, चंबळ नदी योजना आणि दख्खन नदीसाठी योजनांची पायाभरणी केली.



### देशातील पहिले दामोदर खोरे प्राधिकरण


भारतात रेल्वेचे जाळे निर्माण होण्यापूर्वी जलवाहतूक मोठ्या प्रमाणात चाले. दुर्लक्षित झालेल्या जलवाहतुकीकडे बाबासाहेबांनी लक्ष वेधले. जलमार्गाच्या विकासासाठी धोरण निश्चित केले. त्यात नदी, खाडी व इतर जलमार्ग सुरू करण्यासाठी प्रयत्न करणे, सिंचन व कालव्यांचा वापर अंतर्गत वाहतुकीसाठी करणे, कृत्रिम जलमार्गांची निर्मिती करणे, देशातील बंदरांचा विकास करणे या बाबींवर त्यांनी भर दिला. त्याचप्रमाणे आंतरराज्यीय नद्यांच्या अनुषंगाने नदी खोरे प्राधिकरणाची स्थापना केली. यानुसार, आंतरराज्य नदी व तिच्या उपनद्यांमधील पाण्याचा अधिकार प्रांत व राज्यांना देणे, धरण निर्मितीनंतर जमीन पाण्याखाली गेल्यानंतर संबंधित नागरिकांचे विस्थापन व पुनर्वसन आदी बाबींचा समावेश यात करण्यात आला. या नदी खोरे जलनियोजनाला १९४८ मध्ये संसदेने कायदा करून मान्यता दिली आणि देशातील पहिले दामोदर खोरे प्राधिकरण अस्तित्वात आले. यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रयत्न कारणीभूत होते.

दामोदर नदी प्रामुख्याने बिहार व पश्चिम बंगालमधून वाहते. ती बिहारमध्ये जमिनीची झीज करते, तर पश्चिम बंगालमध्ये महापुरामुळे जनजीवन विस्कळीत करते. त्यामुळे दोन्ही राज्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत असे. १९४३ मध्ये नदीला प्रचंड महापूर आल्याने काठावरची गावेच्या गावे पाण्याखाली गेली; रस्ते,

Mrgabbharti_75000

रेल्वेचे रुळ वाहून गेले. मोठ्या शहरांशी संपर्क तुटला. ही उद्ध्वस्त व भीषण परिस्थिती पाहिल्यानंतर बाबासाहेबांनी या प्रश्नात गांभीर्याने लक्ष घातले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने काही उपाययोजना सुचविल्या. त्यामध्ये दामोदर नदीचे संपूर्ण सर्वेक्षण करून नदी आणि उपनद्यांवर धरणे बांधणे, जलसिंचनासाठी जलसंवर्धन करणे, जमिनीची झीज थांबविण्याचे प्रयत्न करणे, धरणांवर वीजनिर्मिती करणे, नदी परिसरातील जंगलांचा विकास करणे, गंगा आणि ब्रह्मपुत्रा नद्यांचाही अभ्यास करणे, जलसिंचनाचा शेतीसाठी वापर करणे; तसेच जलवाहतूक निर्मितीसाठी प्रयत्न करणे या शिफारशींचा समावेश होता. बाबासाहेबांनी त्यांचा अभ्यास करून प्राधिकरण स्थापनेचा निर्णय तत्काळ घेतला.

बाबासाहेबांचे याविषयीचे मत अगदी सुस्पष्ट होते. जास्तीचे पाणी अगर पूर येणे ही लोकांना आपत्ती वाटत असे; पण बाबासाहेबांच्या मते ती आपत्ती नसून फक्त त्या अतिरिक्त पाण्याचे योग्य नियोजन करता आले पाहिजे. पाश्चात्य देशांप्रमाणे पाण्याचा वापर, जतन व संवर्धन यावर भर देऊन योग्य पद्धतीने नियोजन करता आले पाहिजे. त्यासाठी बाबासाहेबांनी स्वतः अमेरिकेतील टेनेसी खोरे योजनेचा सर्वंकष अभ्यास करून तेथील लाभ, समस्या आणि तंत्रज्ञान समजून घेतले होते. दामोदर खोरे विकासासंदर्भात कोलकता येथे झालेल्या बैठकीत मार्गदर्शन करताना ते म्हणाले होते की, पाण्याच्या सोयीमुळे जलसिंचन सुविधा निर्माण होतील. त्यामुळे अन्नधान्य वाढून शेतकऱ्यांची, खेड्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल. स्वस्त दराने वीज निर्माण झाल्यावर ती उद्योगांसाठी वापरता येईल. रस्ते, रेल्वेमार्गाला पर्याय म्हणून कमी खर्चाची, वेळ वाचविणारी जलवाहतूक सुरू होईल. पाण्यामुळे मत्स्योद्योग वाढून रोजगार संधी उपलब्ध होतील. राज्य सरकारांना त्याचा लाभ होईल.



दामोदर प्रकल्पामुळे ४७ लाख एकर फूट पाणी साठविले जाणार होते. तेथे सात लाख साठ हजार एकर जमीन बारमाही ओलिताखाली येणार होती. तसेच तेथे सुमारे तीन लाख किलोवॅट क्षमतेची वीजनिर्मिती होणार होती. याचा ५० लाख लोकांना फायदा मिळणार होता. त्यामुळे या प्रकल्पाबाबत सकारात्मक निर्णय घेण्याविषयी बाबासाहेबांनी बिहार व पश्चिम बंगाल राज्यांना तयार केले आणि प्रकल्पाचा मार्ग मोकळा केला. यातून दामोदर नदीवर तिलैया, मैथान, कोणार, पंचेत हिल, दुर्गापूर ही धरणे व बंधारे साकार झाले. एकीकडे प्रकल्पाची तयारी करीत असताना दुसरीकडे बाबासाहेबांनी या प्रकल्पाखाली जाणारी जमीन, हजारो गावांतील विस्थापित होणारे नागरिक यांच्या पुनर्वसनाचाही विचार केला. त्यांना केवळ नुकसान भरपाई न देता नवीन घरे देणे आणि त्यांच्या कामधंद्याची व्यवस्था करणे याकडे त्यांचा कटाक्ष होता. नुकसान भरपाईसह जमिनीच्या बदल्यात जमीन हे त्यांचे सूत्र दोन्ही राज्यांनी मान्य केले. याच धर्तीवर पुढे बाबासाहेबांनी ओरिसातील महानदी प्रकल्पाचाही विकास केला. त्यातून हिराकुड धरण हे देशातील सर्वात लांब आणि जगातील सर्वात विशाल असे मातीचे धरण साकार झाले. त्यानंतर मध्य प्रदेशातून वाहत जाऊन गंगेला मिळणाऱ्या सोन नदीचाही दामोदर नदीप्रमाणेच बहुउद्देशीय विकास करण्यासाठी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. बाबासाहेबांनी अशा प्रकारे आपल्याकडील श्रम, जल आणि ऊर्जा मंत्रालयांचा संयुक्त वापर करून जलधोरणाचा व्यापक कृतिशील विकास केला. त्याची फळे आपण आजही उपभोगत आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतकेच करून थांबत नाहीत, तर जेव्हा ते भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष झाले, तेव्हा या जलधोरणाला कायद्याचे स्वरूप देण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. नदी खोरे प्राधिकरणाची स्थापना राज्यघटनेत नोंद झाली. राज्यघटनेचा मसुदा तयार झाला, तेव्हा त्यात भारताचे स्वतंत्र जलधोरण निश्चित करण्यात आले. यामध्ये बाबासाहेबांचा मोलाचा वाटा राहिला. पूरनियंत्रण, जलसिंचन, नौकानयन, वीजनिर्मिती यासाठी आंतरराज्य जलमार्ग विकासाचा मुद्दा तिथे समाविष्ट करण्यात आला. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तत्काळ कार्यवाही करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार किंवा संसदेच्या कायद्यानुसार आंतरराज्य नद्यांचे नियमन व विकास साध्य करण्यात येईल, अशी घटनेत दुरुस्ती करण्यात आली. तसेच दोन राज्यांमधील पाणी वाटप व नियंत्रण यांच्या वादाबाबत लवाद नेमण्याची तरतूद संसद करू शकते, असे कलमही त्यात अंर्तभूत केले. संसदेने १९५६ मध्ये केलेले आंतरराज्य जलविवाद कायदा, नदी मंडळ कायदा आणि आंतरराज्य नद्या व नदीखोरे यांमधील पाणीतंट्याबाबत लवादाची तरतूद हे बाबासाहेबांच्या दूरदृष्टीचेच फलित म्हणावयास हवे.

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे भाक्रा-नांगल नदी खोरे विकासाचा प्रकल्प प्राधान्याने हाती घ्यावा, यासाठी बाबासाहेबांनी १९४४ मध्ये युनायटेड स्टेट्स ब्युरो ऑफ रिक्लेमेशनच्या तज्ज्ञाला आमंत्रित करून या प्रकल्पाची व्यवहार्यता पडताळून पाहिली होती. सदरची जागा धरण बांधकामासाठी योग्य असून पाया आणि बंधाऱ्यांसाठी पुढील शोध घेण्याचा सल्ला त्याने दिला होता. त्यानुसार या धरणाच्या कामाला गती देण्यात आली. १९५४ मध्ये या धरणाच्या उद्घाटन प्रसंगी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी 'धरणे ही आधुनिक भारताच्या विकासाची मंदिरे आहेत,' असे उद्गार काढले. त्या मंदिरांच्या पायाभरणीचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते, ही बाब येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**(लेखक हे फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारकार्याचे अभ्यासक आहेत.)**

Mrgabharti_75000

**सुशासन हा लोकशाही, समताधिष्ठित, न्यायाधारित कल्याणकारी राज्य स्थापनेकरिता अत्यावश्यक घटक आहे. लोकशाही व्यवस्था जरी स्वीकारली तरी सुशासनाशिवाय ती सामाजिक, आर्थिक लोकशाहीमध्ये परिवर्तित होणे शक्य नाही. त्याचकरिता मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात राज्यघटना, सत्ताधाऱ्यांना शासन कोणत्या उद्देशाने आणि कशा प्रकारे चालवले पाहिजे, याचा दिशानिर्देश देते.**

# देणगी सुशासनाची!

**डॉ. रमेश शंभरकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रखर राष्ट्रवादी नेते होते. त्यांना भारत एक सशक्त राष्ट्र म्हणून घडवायचे होते. एक असा राष्ट्रीय समाज, जो फक्त समतेवर आणि न्यायावर आधारलेला, व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि पर्यायाने राष्ट्राचा विकास हेच ध्येय असलेला, निकोप मानसिकतेचा समाज हेच त्यांचे एकमेव उद्दिष्ट होते. व्यक्ती हीच समाजाच्या आणि राष्ट्राच्या केंद्रस्थानी असल्यामुळे त्याच्या अधिकाराची सनद राज्यघटनेत असावी, असे त्यांचे ठाम मत होते. भारताच्या राज्यघटनेवर डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव आपल्याला स्पष्ट दिसतो. ते व्यक्तिस्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. राज्यघटनेबद्दलची त्यांची अपेक्षा म्हणजे राज्यघटना एक राजकीय दस्तऐवज न राहता तो सामाजिक पुनर्रचना करणारा दस्तऐवज झाला पाहिजे अशी होती. शोषित व पीडित घटकांना दुर्लक्षून राष्ट्र घडणे शक्य नाही, असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकर यांना प्रकर्षाने वाटत होते की, या देशामधून जोपर्यंत जातिव्यवस्था आणि आर्थिक शोषणाची व्यवस्था नष्ट होत नाही, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळत नाही, श्रमिक कामगारांना श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही, मुलांना शिक्षणाच्या संधी पुरेशा आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध नाहीत, तोपर्यंत राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने परिपक्व होत नाही व कायद्याचे आणि न्यायाचे राज्य निर्माण होणे शक्य नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना असे वाटत होते की, या देशातील दलित-शोषित-वंचितांना फक्त संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळू शकतो आणि त्याकरिता संविधानसभेमध्ये जाण्याची त्यांची धडपड होती.

## घटनेतील प्रस्तावना, मूलभूत अधिकार

भारतीय राज्यघटनेतील प्रस्तावना, मूलभूत अधिकार राज्याच्या धोरणाची तत्त्वे आणि निश्चित वर्गाकरिता विशेष तरतुदी हे भाग शोषित, वंचित समूहाच्या अस्तित्वाशी संबंधित भाग आहेत. त्यांना मुख्य सामाजिक आणि राजकीय प्रवाहात सामील करून घेणारे आहेत. डॉ. आंबेडकर यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे पहिले प्रतिबिंब प्रस्तावनेमध्येच दिसते. त्यात व्यक्तीची प्रतिष्ठा (डिग्निटी ऑफ इंडिविज्युअल) हा शब्दप्रयोग अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण त्याशिवाय लोकशाहीची इतर मूल्ये केवळ निरर्थक ठरतात. त्यांचा संघर्ष हा माणसाच्या प्रतिष्ठेचाच होता. जी प्रस्थापित व्यवस्थेत दिसत नव्हती.

धार्मिक परंपरा आणि वहिवाटी ह्याच भारतीय समाजात अमानुषता आणि विषमता रुजवण्यास कारणीभूत ठरल्या आहेत. धार्मिक परंपरा आणि वहिवाट असंविधानिक ठरवून संविधानाने लोकशाहीचा मार्ग प्रशस्त केला. डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाची पूर्णपणे छाप असलेला भाग म्हणजे राज्यघटनेतील भाग ४ - राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे. यांना मार्गदर्शक तत्त्वेच का म्हणावे? राज्य म्हणजे काय? प्रयत्न (स्ट्राईव्ह) हाच शब्द का वापरला गेला? याचा खुलासा त्यांनी ज्या भक्कमपणे केला, त्यावरून घटनेचा हा भाग त्यांना अत्यंत महत्त्वाचा वाटत होता हे स्पष्ट होते. त्यांची राज्ये आणि अल्पसंख्याकांमधील समाजवादी विचारसरणी,



Mrgabharti_75000

राष्ट्रहित, एकजीव असा भारतीय समाज निर्माण करण्याची तळमळ, स्त्री समता, शोषणरहित सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था घडवण्याचे उद्दिष्ट या भागातील अनुच्छेदांमध्ये प्रतिबिंबित होते. या भागातील तरतुदींना न्यायसंस्थेचे पाठबळ नसले, तरी त्यांचे महत्त्व कमी लेखता येत नाही हे त्यांनी घटना समितीसमोर सांगितले. डॉ. आंबेडकर यांनी मार्गदर्शक तत्त्वांना सुशासनाची पूर्वअट म्हणून मान्यता दिली आहे. शासन कोणत्याही पक्षाचे असो, ते सुशासन (गुड गव्हर्नन्स) देणारेच असले पाहिजे हा त्यांचा आग्रह का होता, हे तपासणे आज गरजेचे आहे. अनुच्छेद ३८ राज्याला कल्याणकारी समाजव्यवस्था साध्य करण्याचा निर्देश देते. ज्यामध्ये लोकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्राप्त राहील. अनुच्छेद ३९ मध्ये निर्देश आहे की, स्त्री-पुरुषांना उपजीविकेची पुरेशी साधने, जनसामान्यांच्या सर्वोत्तम हिताकरिता भौतिक साधन संपत्तीची मालकी, नियंत्रण आणि वाटप, धनसंपत्ती आणि उत्पादनाच्या साधनांचा सामान्यांच्या हिताविरुद्ध संचय होणार नाही, असे आर्थिक धोरण, स्त्री- पुरुषांना सारख्या कामाकरिता सारखे वेतन, स्त्री-पुरुषांचे आरोग्य, शारीरिक क्षमता आणि मुलांचा दुरुपयोग होणार नाही. तसेच आर्थिक गरजेपोटी कोणालाही त्यांच्या वयाच्या आणि क्षमतेच्या प्रतिकूल व्यवसाय करावा लागणार नाही. मुलांना मुक्त आणि प्रतिष्ठापूर्ण वातावरणात निरोगी पद्धतीने विकसित होण्याच्या संधी व सुविधा मिळाव्यात; तसेच मुले, युवकांचे शोषण आणि नैतिक व भौतिक गरजांच्या उपेक्षेपासून संरक्षण होईल, असे विशेष प्रयत्न राज्य करेल.'



## सत्तेतील खरा वाटा

अनुच्छेद ४१चा निर्देश आहे की, राज्य आपल्या आर्थिक क्षमता आणि विकासाच्या मर्यादेमध्ये बेरोजगार, वृद्ध, आजारी आणि अपंग यांच्या कामाचा, शिक्षणाचा आणि शासकीय मदतीचा अधिकार सुनिश्चित करेल. तसेच हलाखीचे जीवन जगणाऱ्या इतरांच्या बाबतीत परिणामकारक तरतूद करेल. अनुच्छेद ४० मध्ये ग्रामपंचायतीच्या रचनेविषयीचे निर्देश आहेत. डॉ. आंबेडकर यांना संपूर्ण ग्रामीण पुनर्रचना अभिप्रेत होती. जोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समाजातील खालच्या थरातील माणसाला स्थान मिळत नाही, तोपर्यंत त्याला सत्तेतील खरा वाटा मिळत नाही, असे त्यांचे मत होते. भारतातील श्रमिक हा दुहेरी शोषणाचा बळी आहे. एक, भांडवलदाराकडून होणारे आणि दुसरे जातिव्यवस्थेमुळे होणारे शोषण, प्रस्थापित व्यवस्थेमध्ये श्रमाला व श्रमिकाला दोघांनाही प्रतिष्ठा नाही. अनुच्छेद ४२ व ४३ मध्ये ही व्यवस्थाच पालथी करण्याचा निर्देश आहे. अनुच्छेद ४३ बहिष्कृत माणसाला मुख्य सामाजिक प्रवाहामध्ये आणण्याची जबाबदारी राज्यावर सोपवतो. अनुच्छेद ४४ भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देण्याची क्षमता असलेला आहे. भारताच्या राज्यक्षेत्रात सर्व नागरिकांसाठी समान नागरी संहिता सुनिश्चित करण्याचा राज्य प्रयत्न करेल. ही तरतूदच नावीन्यपूर्ण आणि सामाजिक समता निर्माण करणारी आहे. अनुच्छेद ४५ मधील १४ वर्षापर्यंतच्या मुलांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्याचे प्रयत्न करण्याचा राज्याला दिलेला निर्देश डॉ. आंबेडकर यांच्या शिक्षणाप्रति आग्रहाची साक्ष आहे. दलित-शोषित वंचित समाजाचे काळजीपूर्वक शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धन करून त्यांचे सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करून त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्याचे प्रयत्न ही सरकारची जबाबदारी आहे. डॉ. आंबेडकर यांचा विचार होता, त्याचप्रमाणे या समूहात स्वाभिमान निर्माण व्हावा, त्यांच्या मानसिक आरोग्याकरिता त्यांचे शारीरिक आरोग्य सुधारणे गरजेचे आहे. याकडे योग्य लक्ष देऊन शासनाने तसे धोरण राबवण्याचे निर्देश अनुच्छेद ४६ व ४७ मध्ये दिलेले आहेत. स्वघटनेतील अशा विविध तरतुदींमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारताच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला आहे.

## स्पष्ट आणि आग्रही

भारतीय राज्यघटनेची मार्गदर्शक तत्त्वे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचे सुस्पष्ट असे प्रतिबिंब आहे. मार्गदर्शक तत्त्वांबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर किती आग्रही होते हे त्यांनी 'स्ट्राइव्ह' शब्दाच्या प्रयोजनाबद्दल जे स्पष्टीकरण दिले त्यावरून दिसून येते. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये 'द स्टेट स्टॉल स्ट्राइव्ह' ही शब्दयोजना केलेली आहे. काही सदस्यांनी तो शब्द काढून टाकण्याची केलेली सूचना फेटाळून लावताना ते म्हणतात, राज्यघटनेतील हा शब्द माझ्या मते अत्यंत महत्त्वाचा आहे. हा शब्द वापरण्यामागे आमचा उद्देश आहे की, मार्गदर्शक तत्त्वांना मूर्त रूप देण्याकरिता शासनाच्या मार्गात कितीही अडचणी आल्या किंवा प्रतिबंधित करणारी परिस्थिती जरी निर्माण झाली तरी; कोणत्याही कठीण आणि प्रतिकूल परिस्थितीमध्येसुद्धा मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करण्याचे राज्य प्रयत्न करेल.

(लोकराज्य एप्रिल २०१६मधून पुनर्मुद्रित)

Mrgabharti_75000

**विसाव्या शतकातले असामान्य, अतुलनीय, बुद्धिजीवी व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. ज्यांनी जग आकलनाचा दूरदर्शीपणा बुद्धीच्या सामर्थ्यावर मिळवला होता. सुप्रसिद्ध मार्क्सवादी अर्थशास्त्रज्ञ पाल बरण यांनी हुशार आणि बुद्धिजीवीमध्ये फरक केला आहे आणि तो फरक म्हणजे हुशार माणसे त्यांची हुशारी स्वतःकरिता, स्वतःच्या भल्याकरिता उपयोगात आणतात, तर बुद्धिजीवी आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यावर परिस्थितीचे सुयोग्य विश्लेषण करून समाज बदल घडवून आणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाल बरणच्या व्याख्येप्रमाणे सर्वोत्तम बुद्धिजीवीमध्ये मोडतात. अँटोनियो ग्राम्सी म्हणतात की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूलतः बुद्धिजीवी व्यक्तिमत्त्वाचे एक असामान्य उदाहरण होय, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्येक पैलू पूर्णतः समाजाचे न्याय्यहक्क जोपासणारा आहे.**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार

**डॉ. त्रिलोक हजारे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषिविषयक विचार देशाला आणि शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत. शेतकऱ्यांच्या समस्यांवरील उपाय त्यांनी Small Holdings in India and Their Remedies and Stats and Minorities मधून व्यक्त केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुख्य कल्पना अशी होती की, स्वतंत्र भारतात ग्रामजीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे प्रयत्न करेल, त्याचा पाया सामाजिक न्याय हाच असला पाहिजे. म्हणून औद्योगिकीकरण आणि शेती यांचे अतूट नाते असले पाहिजे. शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या लाभासाठी निर्माण करणे आवश्यक आहे. विकास कार्यक्रमातून मिळणाऱ्या लाभांची न्याय्य तत्त्वावर समान वाटणी आणि आजवर जे वंचित म्हणून जगत आले त्यांना अग्रहक्क देण्याची गरज त्यांनी वारंवार प्रतिपादन केली आहे. डॉ. आंबेडकर यांचा भर स्वावलंबनावर होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्रिटिश सरकारला परखडपणे बजावले की, भारतावरील कर्जाचा बोजा काही अंशी तरी शिरावर घ्यावा. आपल्या विश्लेषणात बाबासाहेब म्हणतात, '१९५८ च्या कायद्यापासून लाभ होईल, तो इंग्लंडच्या खिशात आणि कर्जाचा डोंगर भारताच्या डोक्यावर.' डॉ. आंबेडकर यांचे हे विश्लेषण त्यांच्या प्रखर राष्ट्रीय बाण्याचे प्रतीक होते.



## दामोदर नदी प्रकल्प

१९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या दामोदर नदी पूर चौकशी कमेटी समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत सरकारचे मजूर प्रतिनिधी म्हणून केलेले भाषण शेतकऱ्यांना हितावह ठरले. दामोदर नदीच्या पुरामुळे हजारो लोकांचे प्राण जात आणि लाखो रुपयांचे नुकसान होत असे. दामोदर नदीला पूर येऊ नये, त्या पाण्याचा उपयोग शेती, विद्युत आणि वाहतुकीसाठी करता यावा म्हणून दामोदर नदी प्रकल्पाला मान्यता मिळवण्याची शिफारस केली. जलमार्ग आणि रेलमार्ग यात काहीच फरक नाही, या सत्याची आपण पुरेपूर दखल घेतली नाही आणि जर का रेलमार्ग हा

Mrgabbharti_75000

### वतनदारी आणि शेतकरी

सन १८७४ च्या वतन ॲक्टमध्ये कोणतीही वतनी मालमिळकत असल्यास ती व वंशपरंपरेचा हुद्दा व त्यासंबंधीचे हक्क व अधिकार हे मिळून वतन होते, अशी वतन या शब्दाची व्याख्या करण्यात आली आहे. वतन या शब्दामध्ये दोन गोष्टींचा समावेश होतो, १) वंशपरंपरेचा हुद्दा २) वतनी मालमिळकत (जमीन)

पूर्वीच्या काळी दर गावास वंशपरंपरेच्या हुद्देदारांची संख्या २४ असे. त्यापैकी १२ जणांना बलुतेदार व बाकी १२ जणांना अलुतेदार असे संबोधण्यात येत होते. पेशवाईत या संख्येत खूप वाढ झाली होती. इंग्रज सरकारचा अंमल सुरू झाला, तेव्हा या बेसुमार वाढलेल्या वतनपद्धतीत काटछाट करण्याचा विचार ठरला व त्याप्रमाणे या अलुत्या-बलुत्यांचे तीन वर्ग करण्यात आले. १) सरकार-आवश्यक वतनी गावकामगार, २) रयत आवश्यक वतनी गावकामगार व ३) सरकार व रयत यास अनावश्यक असे वतनी गावकामगार, यापैकी दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्गातील वतनदार, जे सरकारला आवश्यक नाहीत, अशांना कामाच्या तगाद्यापासून मुक्त करण्यात आले. जेणेकरून त्यांची स्थिती आणि गावातील रयतेची स्थिती सारखीच झाली व त्यामुळे त्यांना वतन ॲक्ट लागू करण्यात आलेला नाही. वतनदाराची कामे निश्चित नाहीत. कोणताही नोकर झाला तरी त्याने करावयाची कामे निश्चित असावयास पाहिजे होती. विशेषतः महार वतनासंबंधी ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, महारांची कामे मुळीच निश्चित झालेली नव्हती. इतकेच नव्हे, तर ती मुद्दाम होऊन सरकारने अनिश्चित ठेवली होती. सन १८७४चा वतन ॲक्ट जेव्हा पास करण्यात आला, तेव्हा त्याच्या १८, ६९ व ८३ या कलमांवर वादविवाद चालू असताना काही लोकांनी महारांची कामे ठरावीक करण्याच्या दृष्टीने त्या कलमांत फेरफार करण्यात यावा अशी सूचना त्यावेळी कायदे कौन्सिलात आणली होती; परंतु सरकारने आपल्याला महारासारखे काही सांगकामे व हरकामे नोकर पाहिजेत, म्हणून ती सूचना मान्य केली नव्हती, स्वतःची उन्नती करण्याच्या बाबतीत महार समाजाकडून चाललेल्या प्रयत्नांमध्ये 'महारकी वतन' ही एक मोठी आडकाठी होती. वतनदार महारांना भाकरीचे हक्क याच्या रूपाने त्यांच्या कामाचा मोबदला देण्याची जी वहिवाट आहे, तीच महार समाजाच्या असाहाय्य व निकृष्ट स्थितीचे मूळ कारण होते. काही समाजात, केलेल्या कामाचा मोबदला म्हणून त्यांना थोडीशी जमीन इनाम देण्यात येत असे आणि काही थोडेसे रुपये. हे दिलेले वेतन इतके अल्प होते की, त्यात उपजीविका करणे कठीण होते. त्यात सुधारणा करून वतनदारीवर होणारा अन्याय दूर करण्यावर बाबासाहेबांचा भर होता. १९३७ साली बाबासाहेबांनी मांडलेल्या विधेयकात कोणावरही वतन सोडून देण्याच्या बाबतीत सक्ती करण्याची तरतूद केलेली नसली, तरी वतन नष्ट करावे असेच बाबासाहेबांचे मत होते आणि ते त्यांनी वतनदारांपासून लपवूनही ठेवले नाही. वतनात सुधारणा करण्यापेक्षा ते खारीज केलेले बरे, असे त्यांचे मत होते. वतनामुळे वतनदार स्वाभिमानशून्य झाले आहेत. त्यांच्यामधील महत्त्वाकांक्षा साफ नष्ट झाली आहे, असे बाबासाहेबांना वाटत होते. वतन नष्ट झाल्याशिवाय वतनदाराची सुधारणा होणे शक्य नाही, अशी त्यांची खात्री झाली होती. सर्वांना 'स्वाभिमानानेच जीवन जगा' असे सांगणारे व त्याकरिता त्यांना प्रवृत्त करणारे एकमेव द्रष्टे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.

राज्यानुसार विभागला जाऊ शकत नाही, तर जलमार्गसुद्धा कोणत्याही हालतीत राज्या-राज्यांमध्ये विभागला जाऊ शकत नाही. याच्या उलट आपण आपल्या घटनेला जलमार्ग व रेलमार्ग यात फरक करण्याचा हक्क दिला आहे. ज्यामुळे रेलमार्ग तर केंद्रीय समजले जातात; पण जलमार्ग हे राज्याचे समजले जातात आणि ह्या चुकीचे खूप सारे वाईट परिणाम दिसून येतात. उदाहरणादाखल, जर एखाद्या राज्याला विद्युत निर्माण करायची आहे आणि त्यासाठी त्याला पाण्याची गरज आहे; पण ते पाणी ते राज्य वापरू शकत नाही. कारण जिथे बांध घातला आणि पाणी अडविले असे ठिकाण दुसऱ्या राज्यात आहे व ते राज्य कृषिप्रधान आहे. त्या राज्याला विद्युत निर्माण करण्यात कोणताच रस नाही किंवा त्या प्रकल्पासाठी तेवढा पैसा नाही आणि त्यामुळे दुसऱ्या गरज असलेल्या राज्याला हे राज्य ते ठिकाण वापरू देत नाही. आपण कितीही तक्रार केली तरी ते राज्य असे अ-मित्रत्वाचे धोरण अवलंबू शकते आणि Provincial autonomy च्या नावाखाली त्याला न्यायिक ठरवू शकते. म्हणून रेलमार्ग व जलमार्ग यात कुठलीही तफावत ठेवू नये. कृषिप्रधान देशात पाणी आणि विद्युत याचा पुरवठा व समतोल असेल, तर ग्रामीण भारत संपन्न होईल. शिफारस करताना कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली गेली. सर्वांना समान हक्काचा सल्ला देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होते, हे सिद्ध होते.

### खोती उर्फ गुलामगिरीतून मुक्तता

खोती पद्धतीखालील शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिती वाईट असायची, परंतु इतर बाबतीतही त्यांची अवनती झाल्याचे दिसून येते. विशेषतः स्वाभिमान, तडफ, हिंमत हे मनुष्याच्या उन्नतीस आवश्यक असलेले गुण खोतीसारख्या गुलामगिरीमध्ये पिळून निघाल्यामुळे नष्ट झाले होते. खोतीच्या जाचाची कल्पना माहितगाराखेरीज इतरांना होणे शक्य नव्हते. खोत म्हणजे गावातला एक लहानसा सुलतान असतो. जेव्हा गावची खोती वेगवेगळ्या लोकांमध्ये व त्याच्या अनेक घराण्यांमध्ये हिस्सेरसीने विभागली असते, तेव्हा अनेक सुलतानांचा जुलूम गावातल्या शेतकऱ्यांना सोसावा लागतो. शेतकऱ्याला सरकार -देणे देऊन शिवाय खोती हक्काबद्दल वेगळे देणे द्यावे लागते. रयतवारी पद्धतीमध्ये फक्त सरकारलाच देणे द्यावयाचे असे. खोतीमध्ये अशा रितीने शेतकऱ्यावर कराचा बोजा अधिक पडायचा, परंतु त्याखेरीज नानाप्रकारांनी कुळांकडून खोत पैसे उकळीत असतात.

Mrgabharti 75000

कुळाने पैसे भरले म्हणजे रीतसर पावती द्यावयाची नाही, असा खोताचा बाणा असल्यामुळे कुळाची शेंडी नेहमी खोताच्या हातात राहत असे. खोत ब्राह्मण असला तर कुळाच्या परसांतल्या झाडावर फणस राहायचा नाही आणि भाजी लावूनही त्याला व त्याच्या घरातल्या माणसांना ती खायला मिळायची नाही. खोत मराठा किंवा मुसलमान असला तर तो कोंबडी शिल्लक ठेवायचा नाही. म्हणजे कुळाला स्वामित्व असे कोठेच नव्हते! जे काही त्याच्या घरात असेल ते खोताच्या मालकीचे! एखादा शेतकरी खोताच्या जुलमाचा प्रतिकार करण्यास पुढे सरसावला तर त्याला वठणीस आणण्याची अनेक साधने खोतापाशी असत. दुसरा एक उपाय म्हणजे शेतकऱ्यांची गुरे चरणीस गेली असता कोंडवाड्यात घालणे हा होय. गावातली चराईची जमीन खरोखर सबंध गावाच्या मालकीची असते. तिच्यावर खोत



आपला मालकी हक्क गाजवीत असत आणि गुरावाचून शेती शक्य नसल्यामुळे शेतकऱ्याला आपल्या ऐपतीप्रमाणे व जरूरीप्रमाणे गुरे बाळगावीच लागत. शेतकऱ्याच्या खास मालकीची चराईची जमीन नसल्यामुळे गावचराईत ती धाडावी लागत. अर्थात शेतकरी स्वाभाविकपणेच खोताच्या कचाट्यात सापडत होता.

खोताच्या जुलमाचा दुसरा सर्वांत वाईट प्रकार म्हणजे वेठीच्या कामाची पद्धती होय. कायद्याने वेठीला मनाई केली होती, परंतु खोत हा गावातला कर्तुमकर्तुम सामर्थ्यवान असल्यामुळे कायद्यातील मनाई असून-नसून सारखीच होती. खोताच्या खासगी म्हणून काही जमिनी असत. या जमिनीमधील लागवडीची सर्व कामे खोत लोक वेठीने करून घेत. या कामाबद्दल शेतकऱ्याला व त्याच्या बायकामुलांना धड पोटापुरतीही मजुरी मिळत नसे. खोत हाच गावातला सावकार असतो व त्या रूपानेही शेतकऱ्याच्या मुलांना शिक्षण मिळू नये, यासाठी खोत हरप्रकारे प्रयत्न करत असत. कारण शेतकरी लिहावयास व वाचावयास शिकले, तर आपली सुलतानी अशीच चालू देणार नाहीत याची त्यांना खात्री होती. त्याखेरीज शेतकऱ्यांवर खोतांचा सामाजिक जुलूम तर विचारूच नये. कुणबी मुंबईला येऊन दोन पैसे मिळवून गावी गेला आणि त्याला धोतर, कोट, रुमाल, वापरण्याचे सामर्थ्य असले, तरी गावात गेल्यावर धोतर सोडून लंगोटी नेसणे भाग पडे. खोताने ठरवलेल्या हीन दर्जाचाच पोषाख केला पाहिजे, नाहीपेक्षा त्याने आपली मर्यादा ओलांडली असे खोत समजत! कुणब्याच्या बायकांवरसुद्धा विशिष्ट पद्धतीने लुगडे नेसण्याची सक्ती असे!

खोती पद्धती समूळ नष्टच केली पाहिजे. सध्या खोतीसंबंधीचा कायदा आहे. तो अत्यंत अपुरा आहेच, परंतु जो कायदा आहे त्याची अंमलबजावणी योग्य रितीने होऊ शकत नाही आणि जोपर्यंत खोती नष्ट होत नाही, निदान तिची नखे काढून टाकण्यात येत नाहीत व तिचे दात पाडण्यात येत नाहीत, तोपर्यंत त्या कायद्याची अंमलबजावणी योग्य रितीने होणे केव्हाही शक्य नाही. सदरील कायद्यात तात्पुरती दुरुस्ती करूनही काही उपयोग व्हावयाचा नाही. याकरिता डॉ. आंबेडकर यांनी कायदे कौन्सिलमध्ये खोतीसंबंधीचे एक बिल आणण्याचे ठरवले होते व तसे त्यांनी चिपळूणच्या शेतकरी परिषदेमध्ये जाहीरही केले.

बाबासाहेबांनी खोती पद्धत नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक १७ सप्टेंबर १९३७ रोजी मांडले. खोत हा गावचा मालक आहे. त्यास ते गाव गहाण टाकता येते. विकता येते, खोती कुळांची धारेकरी कुळे बनविता येतात. सरकारला खोताने कबुली दिली, म्हणजे सरकारला ती नाकबूल करता येत नाही. भात जमिनीतून होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धा भाग आणि वरकस जमिनीतील ५० पिकाचा एक तृतीयांश भाग खोताने कुळाकडून वसूल करावा अशी पद्धत होती. ओसाड तसेच जंगलांनी वेढलेल्या पडित बुडित जमिनी अपार श्रम करून आणि भांडवल खर्च करून लागवडीस आणल्या आणि अशा प्रकारे कुळांना त्रास देऊन गावेच्या गावे वसविली आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पद्धत नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक आणून जमीनदाराकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक कमी करण्याचा प्रयत्न केला आणि खोती ही प्रवृत्ती शेतकऱ्यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे, अशा स्वरूपाचे कायदे केलेत. राष्ट्रीय स्तरावर सर्वांच्या फायद्याचे काम करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रीय एकात्मतेत भर घातली. शेतकऱ्यांविषयी बाबासाहेबांना केवढी कणव होती, हे यावरून दिसून येते.

(लोकराज्य ऑक्टोबर २००६मधून पुनर्मुद्रित)

Mrgabharti_75000

**बाबासाहेबांनी संपूर्ण भारताला एक नवा मार्ग दाखवला. भारतीय प्रतिभेला अनेक साखळ्यांमधून मुक्त केले, निर्मितीच्या आणि सृजनाच्या दिशा खुल्या केल्या, विद्रोहाला वैश्विक प्रमाण दिले आणि तरी भारतीय मातीशी, इतिहासाशी नाळ तोडली नाही. येणाऱ्या काळामध्ये सर्वांनाच बाबासाहेबांच्या या भव्य दृष्टीचा प्रत्यय येणार आहे. म्हणून जाणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक बाबासाहेबांचे मोठेपण खुलतच जाणार आहे.**

# पथिक नव्या वाटेचा!

**अविनाश धर्माधिकारी**

आपण महान व्यक्ती आणि त्यांच्या विचारांची जातिपातींमध्ये विभागणी करतो. एवढी आपली बुद्धीसुद्धा चातुर्वर्ण्यामध्ये सडून गेलीय. याचा सर्वाधिक फटका बाबासाहेबांना बसला आहे. जातिव्यवस्थेने जन्मापासून आणि उभ्या जन्माची मुस्कटदाबी केलेली. गुणवत्ता असून 'अस्पृश्य' म्हणून पावलापावलावर ती खुडून काढण्याचीच व्यवस्था. गायकवाडांच्या दरबारात अधिकारी झाले तरी बडोद्यात कुणी राहायला जागा देईना, दरबारात पाणी देईना, दारावरचा उच्चवर्णीय शिपाईसुद्धा फाइल टेबलावर लांबून फेकायचा. ज्या पाणवठ्यावर घोड्या-गाढवा-कुत्र्या-मांजरांनी पाणी प्यायलेलं चालत होतं, त्याच्यावर माणूस म्हणून पाणी प्यायला गेला, तर मारहाण होत होती आणि ज्या देवाधर्माच्या नावाने पायरीत गाडले होते, ती पायरी ओलांडून गाभाऱ्यात जाऊ म्हटले, तर आधी मान्य करून ऐनवेळी अरुंद गल्लीत गाठून रक्तबंबाळ होईपर्यंत मारले जात होते. याच्या एक शतांश जरी सोसण्याची कुणावर वेळ आली असती तर तो माणूस-विचार-संघटना 'खड्ड्यात गेला तुमचा देव आणि खड्ड्यात गेली तुमची संस्कृती' असे म्हणाला असता. स्पष्टच सांगायचे तर असे म्हणाला असता तर काही चूक नव्हते; पण बाबासाहेब असे म्हणाले नाहीत, असे वागले नाहीत. एकदाच गांधीजींना म्हणाले, 'तुम्ही कोणत्या देशाबद्दल बोलता, मला देशच नाही.' पण त्यामध्ये व्यथा होती, विध्वंस नव्हता.

### बाबासाहेबांची दूरदृष्टी

सर्व समाजाला कवेत घेऊन प्रतिभावंत दिशेकडे नेण्याचीही बाबासाहेबांची दूरदृष्टी राज्यघटना, हिंदू कोडबिल, समान नागरी कायदा अशा सर्व गुंतागुंतीच्या विषयांमध्येसुद्धा दिसते. राज्यघटनेचा मूलभूत ढाचा बेसिक स्ट्रक्चर डॉक्ट्रिन ही बाबासाहेबांची देणगी आहे. नेहरूंचं मत होतं, घटनेत बदल करण्याचे सर्व अधिकार संसदेकडे असावेत. बाबासाहेबांनी दाखवून दिले की, घटना संसद निर्माण करते, संसद घटना निर्माण करू शकत नाही - म्हणजेच घटनेचे चरित्रच ज्या बदलांनी पालटून जाईल असे बदल करण्याचे अधिकार संसदेला असता कामा नयेत - ही 'बाबासाहेबांची दूरदृष्टी' आजच्या काळात खरी ठरली आहे. नाहीतर मतांच्या राजकारणात, संसदीय बहुमताच्या गदारोळात सापडून राज्यघटनेची कधीच धूळधाण उडाली असती.




गोलमेज परिषदेत त्यांनी ब्रिटिश पंतप्रधानाला सुनावले होते, आमचे आपसातले भेद आहेत, त्याचे लढे आम्ही लढू, पण त्याचा तुम्ही फायदा घ्यायचा प्रयत्न करू नका. इथे मी जो आहे तो संपूर्ण भारताचा प्रतिनिधी म्हणून आहे. ही ती तलवारीच्या दोन पात्यांवरची वाटचाल. एकाच वेळी दलित समाजाच्या राजकीय-सामाजिक हक्कासाठी लढायचे, तरी त्याच वेळी भारताचे हित साधायचे. बॅरिस्टर होते.(अर्थशास्त्रज्ञही होते).. जगभराचा तौलनिक कायदा कोळून प्यायलेले होते. आपल्यावर हल्ला झाला तर आत्मरक्षणासाठी हात उचलणे हा आपला हक्क आहे, त्याने कायदा मोडत नाही हे माहीत असून त्यांनी चवदार तळे आणि काळाराम मंदिर, दोन्ही सत्याग्रहांच्या वेळी आपल्या

Mrgabharti_75000

सहकाऱ्यांना उलट हात उचलण्यापासून, म्हणजेच सर्व समाजाला रक्तपातापासून रोखले. आपण कायद्याने लढाई लढू म्हटले - कायदा होताच बाजूचा, त्यासाठी देशावर इंग्रजांचे राज्य असावे लागत होते. याची प्रत्येक भारतीयाने शरमसुद्धा बाळगायला हवी.

अमेरिकेतून अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवून परतले. तिथल्या त्यांच्या गुरूनेही सलाम केला होता की, हा माझा विद्यार्थी माझ्यापेक्षा हुशार आहे. परतल्यावर सयाजीराव गायकवाड महाराज, छत्रपती शाहू महाराज यांच्या पाठिंब्यावर काम सुरू केले तरी घुसमट आणि मुस्कटदाबी संपत नव्हती. आपला शेवट जवळ आल्याचे दिसत



असताना छत्रपती शाहू महाराज यांनी माणगाव परिषदेत बाबासाहेबांकडे बोट दाखवून सांगितले, की इथून पुढचे नेतृत्व हा तरुण करेल. यात दोघांचेही क्रांतिकारकत्व उठून दिसते. दोन दशके प्रयत्न केल्यावर बाबासाहेबांनी जाहीर केले, 'हिंदू म्हणून जन्माला आलो; पण हिंदू म्हणून मरणार नाही.' त्यानंतरही सुमारे दोन दशके कार्य केल्यावर, आता अंतकाळ समोर दिसत असताना अखेर मार्ग निवडला तो प्रज्ञा, शील आणि करुणा या तत्त्वांवर उभ्या असलेल्या बौद्धधर्माचा.

## सखोल धर्मचिकित्सा

त्यापूर्वी बाबासाहेबांनी सखोल धर्मचिकित्सा केली. अनेक पुरोगामी, डावे वगैरे विचारवंत धर्मप्रेरणेची चिकित्सा करतच नाहीत, त्याची त्यांना ॲलर्जी असते. 'धर्म ही अफूची गोळी' पाशी त्यांची धर्मचिकित्सा संपते. मानवी जीवनातल्या अन्य आदिम प्रेरणेइतकी धर्म ही माणसाची आदिम प्रेरणा आहे, हे जाणून बाबासाहेबांनी परखड धर्मचिकित्सा केली आणि निवड केली विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ बौद्धधर्माची.

सर्व धर्मांचा सखोल तौलनिक अभ्यास, चिंतन केल्यानंतर बौद्ध धर्माचा स्वीकार करून बाबासाहेबांनी केवळ दलितांनाच नव्हे, तर सर्व भारताला, पुन्हा एकदा सृजनशील रस्त्यावर आणून सोडले. जातिव्यवस्थेच्या अन्यायातून पेटलेली मने त्या प्रतिक्रियात्मक, नकारात्मक आगीतच जळून जाऊ शकतात. प्रज्ञा-शील-करुणेचा स्पर्श देऊन बाबासाहेबांनी विद्रोहाला विधायक आणि वैश्विक आशय प्राप्त करून दिला. जातिव्यवस्थेने घडलेल्या दलितपणाच्या जाणिवांच्या वर उठून बौद्ध विचाराचा विश्वव्यूह माणसाच्या प्रतिभेला जागे करतो, भारताला, जगाला समृद्ध करतो. भारतात जन्म घेऊन जगभर पसरलेला विचार म्हणजे बौद्धधर्म.

## जग जिंकण्याची संस्कृती

इतर संस्कृतींमध्ये तलवार-तराजूच्या जोरावर जग जिंकण्याची प्रेरणा पूजली जाते. भारत 'धम्मचक्र प्रवर्तन' करून जग जिंकण्याची संस्कृती घडवतो. भारतावर अनेक, सतत लष्करी आक्रमणे झाली. भारताने जगावर अशी आक्रमणे केली नाहीत; पण खऱ्या अर्थाने पहिला विश्वधर्म कोणता असेल तर तो बौद्ध धर्म. तोसुद्धा सत्ती, तलवार, कत्तली, राजकारण किंवा आर्थिक गुलामी याने पसरलेला नाही, तर करुणेच्या, हृदयपरिवर्तनाच्या मार्गाने पसरला. जिथे गेला तो देश त्याने समृद्ध केला. बाबासाहेबांनी दलित-विद्रोह, तर या वैश्विक प्रेरणेकडे वळवलाच; पण संपूर्ण भारताला जाती-धर्मनिरपेक्षपणे भारताच्या समृद्ध वारशाची जाणीव करून दिली. म्हणून आधुनिक भारताच्या सेक्युलर लोकशाहीत संसदेमध्ये बुद्धाची ध्यानस्थ मूर्ती चालते. बौद्ध धर्माने इतिहासातही भारत समृद्ध केला, भविष्यातही करेल. जागतिकीकरणाच्या जमान्यात सर्व शोषित आणि भारतीय जाणिवांना सृजनशीलपणे जग जिंकण्याची दिशा दाखवली. बाबासाहेबांनी आपल्या या जाता न जाणाऱ्या चिवट जातिव्यवस्थेमध्ये प्रत्येक विद्रोहच स्वतः एक जात बनून विसावतो, असा आजचा अनुभव आणि उद्याचा धोका असला तरी 'बौद्ध वारसा' भारताला नव्या जगात वैश्विक कर्तृत्वाकडे नेईल.

## सर्वात मोठे योगदान

बाबासाहेबांना समान नागरी कायदा तेव्हाच हवा होता; पण तो येऊ शकेल अशी अजून परिस्थिती नाही, असे दिसल्यावर त्यांनी अत्याधुनिक, प्रगत अशा 'हिंदू कोडबिल'चा आग्रह धरला, भारतीय समाजव्यवस्था कायदेशीररीत्या जातिव्यवस्थेतून मुक्त करून आधुनिक पायावर कायदा-न्यायव्यवस्था उभी करणारे, स्त्रीला समाजात समान स्थान प्राप्त करून देणारे हिंदू कोडबिल हे माझे भारताला सर्वात मोठे योगदान आहे, असे ते म्हणाले. प्रत्यक्षात त्यांच्या हयातीत 'हिंदू कोडबिल' संमत झाले नाही, ते राजकारणाच्या कात्रीत सापडल्यामुळे, विरोध करणाऱ्या स्वतंत्र भारताच्या प्रथम राष्ट्रपती बाबू राजेंद्रप्रसाद यांच्यामुळे; पण बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर का होईना, भारतातला बहुसंख्याक समाज आधुनिक कायद्याच्या आधारावर उभा राहिला. हे आहेच त्यांचे सर्वात मोठे योगदान.

आज मार्टिन ल्यूथर किंगचा वारसा सांगत ओबामा ब्लॅकपणाच्या वर उठून जगातल्या सर्वात शक्तिमान राष्ट्राचे अध्यक्ष बनतात. बाबासाहेबांमध्ये असे सर्व मार्टिन ल्युथर किंग, मंडेला, बिशप टुटु सामावलेले आहेत. राज्यकर्ती जमात व्हा, असे म्हणताना त्यांनाही असा 'भारतीय ओबामा' अभिप्रेत असेल.

(लोकराज्य एप्रिल २०१६मधून पुनर्मुद्रित)

Mrgabharti 75000

तथागत बुद्ध आणि चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्यानंतर भारत देश व जगासमोर न भूतो न भविष्यति अशा कार्यकर्तृत्वामुळे परिवर्तनाचे दिशादर्शक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे पाहिले जात आहे. सामाजिक परिवर्तनाच्या या अग्रदूताच्या बुद्धीची झेप, त्यांची हुशारी, त्याचबरोबर त्यांचा सहानुभाव आणि त्यांची जिद्द, चिकाटी... साऱ्या गोष्टी अलौकिक आणि दुर्मिळ आहेत.

# अलौकिक आणि दुर्मिळ

नागसेन कांबळे

**एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात नवा इतिहास निर्माण करणारे बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त भारत सरकारसह महाराष्ट्र शासन आणि विविध संघटनांच्या माध्यमातून सगळीकडे कार्यक्रमांची रेलचेल चाललेली आहे. तथागत बुद्ध आणि चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्यानंतर भारत देश व जगासमोर न भूतो न भविष्यति अशा कार्यकर्तृत्वामुळे परिवर्तनाचे दिशादर्शक म्हणून डॉ. आंबेडकर यांच्याकडे पाहिले जात आहे. भारतातील तत्कालीन विषमतावादी व्यवस्थेने डॉ.बाबासाहेबांना पदोपदी अपमान करून खूप छळले; परंतु जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हिंमत न हरता इथल्या व्यवस्थेला बदलवून केवळ अस्पृश्य समाजावरच नव्हे तर, त्यांनी देशावरसुद्धा अनंत उपकार केले आहेत.**

न्याय, समता, स्वातंत्र्य व बंधुता या नीतिमूल्यांच्या आधारे भारतीय संविधानाची निर्मिती करून देशाच्या सर्वांगीण विकासात सिंहाचा वाटा असल्यामुळे आणि भारताला अखंड, सार्वभौम प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्र अशी ओळख करून दिल्यामुळे डॉ. बाबासाहेब जगाचे आकर्षण बनले आहेत. विषमतेचा ज्वालाग्नी शांत करणाऱ्या दयासागराने क्रांतीची मशाल हातात घेऊन मानवतेवरील कलंक पुसून टाकला. जातिवादी वर्णभेदामुळे शाळेच्या बाहेर बसणाऱ्या महामानवाने या देशाचे संविधान लिहिले हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल.




## अपार कष्ट

कोलंबिया विद्यापीठात असताना डबल एम.ए. व पीएच.डी.चे शिक्षण पूर्ण करण्यास साडे आठ वर्षे लागणार होती. ते शिक्षण पूर्ण करत असताना कधी अर्धपोटी, कधी उपाशी राहून १८-१८ तास अभ्यास करून फक्त अडीच वर्षांत ते शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पूर्ण केले. कोलंबिया, लंडन, उस्मानिया या विश्वविख्यात विद्यापीठांमध्ये अतिमहत्त्वाच्या विषयावर विद्वत्ताप्रचुर संशोधन करून जागतिक स्तरावर आपल्यातील सर्वोच्च गुणवत्ता सिद्ध केली. अथक परिश्रमामुळे मिळवलेल्या पदव्यांपैकी डी.एस.सी. ही पदवी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथून प्राप्त करणारे आजपर्यंतचे एकमेव भारतीय विद्यार्थी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. हा विक्रम अद्याप कोणीही मोडलेला नाही. लंडनमधील या संस्थेने डॉ. बाबासाहेबांच्या स्मरणार्थ त्यांचा पुतळा उभारून त्यांच्या नावे अभ्यासकेंद्रही सुरू केले आहे. संविधान निर्मिती या अतुलनीय कार्याची पावती म्हणून कोलंबिया विद्यापीठाने द्विशतक सांवत्सरिक या उत्सवाप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना एल.एल.डी.ही बहुमानाची पदवी ५ जून १९५२ रोजी प्रदान केली. भारतीय घटनेचे शिल्पकार, मंत्रिमंडळाचे सदस्य आणि राज्यसभेचे सदस्य, भारतीय नागरिकांपैकी एक प्रमुख नागरिक, एक महान सुधारक आणि मानवी हक्कांचा आधारस्तंभ असणारा पराक्रमी पुरुष असे कोलंबिया

Mrgabharti 75000

विद्यापीठाने त्यांना दिलेल्या मानपत्रात गौरवले आहे. शिवाय कोलंबिया विद्यापीठ स्थापनेच्या दोनशे पन्नास वर्षांतील सर्वोच्च हुशार विद्यार्थ्यांच्या यादीमध्ये नंबर एकवर डॉ. बाबासाहेब यांचे नाव असून विद्यापीठाने त्यांच्या सन्मानार्थ त्यांचा पुतळा उभारून त्यावर 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' असे सुवर्णाक्षरात लिहिले आहे.

कोलंबिया विद्यापीठात शिक्षण घेताना एकदा पंजाब केसरी लाला लजपतराय यांनी कुतूहलाने प्रा. सेलिग्मन यांना विचारले की, ग्रंथालयात सर्वात प्रथम येणारा आणि सर्वात शेवटी बाहेर पडणारा हा पुस्तकवेडा विद्यार्थी कोण आहे? त्यावर उत्तरादाखल बोलताना प्रा.सेलिग्मन लाला लजपतराय यांना मोठ्या अभिमानाने सांगतात की, केवळ हिंदी विद्यार्थ्यांमध्येच नव्हे तर संपूर्ण अमेरिकन विद्यार्थ्यांमध्येदेखील भीमराव आंबेडकर हा सर्वोच्च हुशार विद्यार्थी आहे.



## चतुरस्त्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविधांगी प्रचंड कार्यामुळे जगातील लोक त्यांना बोधिसत्त्व, कायदेपंडित, घटनाकार, इतिहासकार, अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, राजकीय मुत्सद्दी, पत्रकार, महान समाजसुधारक, उत्कृष्ट संसदपटू अशा चतुरस्त्र भूमिकांमधून पाहतात. उच्च शिक्षण आणि शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे योगदान आजही भारतीयांसह विदेशी लोकांनासुद्धा प्रेरणा देते.

भारतातील ब्रिटिश राजवटीच्या कालखंडात आपल्यातील परखड व बुद्धिवादी वक्तृत्वामुळे त्यांनी अनेकदा ब्रिटिशांनादेखील हादरून सोडले होते. मी प्रथम भारतीय आणि अंतिमही भारतीय असे सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर इथल्या जाचक अन्यायाविरुद्ध लढताना वैतागून म्हणतात, मला मातृभूमीच नाही. खरंतर असे म्हणण्यास त्यांना भाग पाडणारी येथील प्रस्थापित व्यवस्था म्हणजे भारताला लागलेली जातीयतेची कीड आहे.

## दीनदुबळ्या लोकांची भीमाई

डॉ. बाबासाहेब यांनी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या महाड येथे २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती जाळली. नैसर्गिक पाणी पिण्याचा अधिकार केवळ अस्पृश्य जातीत जन्मल्यामुळे ज्यांच्या वाट्याला आला नव्हता, मुक्त संचार हा ज्यांना अधिकार नव्हता, पशुप्राण्यांपेक्षाही हीन दर्जाचे जीवन ज्यांना बळजबरीने जगावे लागत होते अशा दीनदुबळ्या लोकांची भीमाई बनून आंधळ्यांना डोळे, लुळ्या-पांगळ्यांना हातपाय, बहिऱ्यांना कान अन् मुक्यांना वाचा फोडणारे दुसरे तिसरे इथे कुणीही नसून ते फक्त आणि फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरच आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या नीतितत्त्वांना संविधानात अंतर्भूत करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण देशावरच उपकार केले आहेत. ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती हा ग्रंथ १९२५ला लंडनच्या प्रकाशकांनी प्रकाशित केला. या ग्रंथामध्ये ब्रिटिशांवर प्रखर टीका करून आपण खरे देशभक्त असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सिद्ध केले आहे.

## अनंत उपकार

सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या डॉ.बाबासाहेबांनी इथल्या समाजरचनेत आमूलाग्र बदल घडवून भारतावर सर्वार्थाने अनंत उपकार केले आहेत. त्यांची धर्मांतराची भूमिका पाहिली तर त्यांनी १९३५ पर्यंत हिंदू धर्मातील मानवनिर्मित अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा, जातिभेद संपवण्यासाठी परिवर्तनाची लढाई लढली; परंतु त्यात त्यांना अपयश आल्यामुळे त्यांनी येवला येथे धर्मपरिवर्तनाचे रणशिंग फुंकले; पण धर्मपरिवर्तनाच्या भूमिकेमुळे देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला धक्का लागणार नाही याची पुरेपूर खबरदारी घेऊन, इथल्याच मातीतला विश्वशांती आणि बंधुत्वाची शिकवण देणारा बुद्ध धम्म स्वीकारून; भारताला त्यांनी सम्राट अशोकांची दूरदृष्टी प्रदान केली आहे.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे जरी त्यांना इथे दुर्लक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला गेला असला तरीही सुडाची किंवा बदलाची भावना त्यांनी मनाला शिवू दिली नाही. आचार्य अत्रेंशी बोलताना एकावेळी ते म्हणतात, जर मला हिंदू धर्माचा सूड घ्यावयाचा असता तर मी या देशाचे पाच वर्षात वाटोळे करू शकतो, परंतु देशाच्या इतिहासात मला विध्वंसक म्हणून माझे नाव नोंदवायचे नाही. भारतीय स्त्रियांना 'चूल आणि मूल' यातून मुक्त करण्यासाठी 'हिंदू कोडबिल' तयार करणारे डॉ. बाबासाहेब आहेत, हे वाचून त्यांचे अंत:करण किती मोठे होते याची जाणीव होते.

## गौरव

अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे धनी असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जगभरात गौरव होत आहे. CNN, IBN7, HISTORY TV18 या वृत्त वाहिन्यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या कार्यक्रमात २० कोटी लोकांनी GREATEST INDIAN म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करून त्यांचा सन्मान केला. ऑक्सफर्ड विद्यापीठाने जग घडवणाऱ्या शंभर अलौकिक महापुरुषांची जी यादी तयार केली त्यातही जागतिक महापुरुषांमध्ये प्रथम क्रमांकावर तथागत बुद्ध, द्वितीय क्रमांकावर वर्धमान महावीर, तृतीय क्रमांकावर चक्रवर्ती सम्राट अशोक, तर चतुर्थ क्रमांकावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन त्यांचा मोठा गौरव केला आहे.

(लोकराज्य एप्रिल २०१६मधून पुनर्मुद्रित)

Mrgabharti_75000

**विद्यापीठे, पाश्चिमात्य शिक्षणाची ओळख, न्यायालयीन व प्रशासकीय स्वरूपाच्या आधुनिक संस्थांची उभारणी आणि इतर सुधारणेबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिशांचे आभारही मानतात; पण आर्थिक नीतीच्या बाबतीत ते स्पष्ट आणि निर्भीड बोलतात. भारताने इंग्लंडला अमाप दिले आहे आणि इंग्लंडकडून भारताला अक्षरशः काहीही मिळालेले नाही ही दोन्ही विधाने आश्चर्यकारक वाटतील; पण आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले तर त्यातील सत्यता निर्विवाद आहे.**

# अर्थक्रांतीची शाश्वत सूत्रे

**डॉ. अनिल सूर्या**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिभेतून निघालेली आर्थिक क्रांतिसूत्रे राष्ट्र आणि मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी लाभलेला सूर्यप्रकाश आहे. ही आर्थिक क्रांतिसूत्रे आजच्या काळाजी गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अष्टपैलू हे व्यक्तिमत्त्व लाभलेले प्रज्ञापुरुष होते. अर्थशास्त्रावर त्यांनी लिहिलेल्या तीन महाग्रंथांवरून डॉ. आंबेडकर यांनी 'अर्थशास्त्र' या नावास मोठे केले आहे. त्यांच्या या तीन शोधग्रंथांतून त्यांनी आर्थिक विषयाच्या प्रत्येक पैलूवर खोल आणि विस्तारपूर्वक अभ्यास केला हे जाणवते. या ग्रंथात अर्थकारणाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले विवेचन हे त्यांच्या प्रज्ञेची साक्ष आहे, अर्थशास्त्राच्या परिपूर्ण ज्ञानाची साक्ष आहे.




अ) ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ द इस्ट इंडिया कंपनी (ईस्ट इंडिया कंपनी : प्रशासन आणि अर्थसूत्र) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात एम.ए.च्या पदवीसाठी अवघ्या २४व्या वर्षी वरील शोधनिबंध लिहिला. या ग्रंथाच्या माध्यमातून अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी पहिले पाऊल रोवले. हे १९१५चे पहिले पाऊल अर्थक्रांतीतील महत्त्वाचे पाऊल होते. ४२ पृष्ठांच्या शोधनिबंधातून सर्वांगास स्पर्श करून न्यायबुद्धीने ईस्ट इंडिया कंपनीवर डॉ. आंबेडकर चिडतात. ही त्यांची चीड त्यांचे भारतभूमीवर असलेल्या प्रेमाची आणि मायभूमीच्या स्वाभिमानाची साक्ष होय. व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. या व्यापारी ते राज्यकर्तेपर्यंतच्या प्रवासात इंग्रजांनी भारतीयांचे केलेले शोषण आणि अल्पसे फायदे या दोन्ही मुद्द्यांची सांगोपांग चिकित्सा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त होऊन ब्रिटिश सरकारची भारतावर अंमलबजावणी होण्यास सुरुवात झाली. सामान्य शेतकरी शेतसाऱ्याच्या वसुलीमुळे त्रस्त झाला. इतर भारतीयांवरही वेगवेगळे कर लावल्याने ब्रिटिशांची अर्थनिती भारतीयांवर अन्याय करणारी होती हे आणि ब्रिटिशांचा गैरवाजवी फायदा करणारी होती, अशी मते बाबासाहेब निर्भीडपणे मांडतात. विद्यापीठे, पाश्चिमात्य शिक्षणाची ओळख, न्यायालयीन व प्रशासकीय स्वरूपाच्या आधुनिक संस्थांची उभारणी आणि इतर सुधारणेबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिशांचे आभारही मानतात; पण आर्थिक नीतीच्या बाबतीत ते स्पष्ट आणि निर्भीड बोलतात - भारताने इंग्लंडला अमाप दिले आहे आणि इंग्लंडकडून भारताला अक्षरशः काहीही मिळालेले नाही ही दोन्ही विधाने आश्चर्यकारक वाटतील; पण आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले तर त्यातील सत्यता निर्विवाद आहे.

ब) द इव्हॉल्युशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया (ब्रिटिश भारतामधील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती) इ.स.१८३३ ते १९२१ या कालखंडातील ब्रिटिश भारतातील केंद्र शासन व घटक राज्ये यांच्यातील पद्धतशीर संशोधन म्हणजे डॉ. आंबेडकर यांचा 'भारताचा राष्ट्रीय नफा : एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास' हा शोधप्रबंध होय. हा शोधप्रबंध प्रा. सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी.साठी कोलंबिया विद्यापीठास डॉ. आंबेडकर यांनी १९१६ मध्ये सादर केला. हा शोधप्रबंध १९२५ मध्ये 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' या नावाने प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पीएच.डी. तर मिळवून दिलीच; पण सार्वजनिक वित्ताच्या क्षेत्रात त्यांना प्रथमांक मिळवून दिला. अशा प्रकारचा एका भारतीयाने लिहिलेला आगळावेगळा; पण वास्तव सांगणारा हा पहिलाच वित्तग्रंथ होय.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अभ्यासपूर्वक या शोधप्रबंधातून काढलेले काही रोखठोक आणि खरे निष्कर्षात्मक मुद्दे पुढीलप्रमाणे :-**

Mrgabharti_75000

अ) भारतातील प्रादेशिक वित्ताची सुरुवात.

ब) भारतातील प्रादेशिक वित्ताची वाढ आणि

क) भारतातील प्रादेशिक वित्ताची सुरुवात आणि वाढीवरील यंत्रणा. वरील मुद्द्याचा जगात पहिल्यांदाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेला परामर्श म्हणजे हा शोधप्रबंध होय.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते पैसा उभारणे आणि खर्च करणे या तात्कालिक गोष्टींच्या पलीकडे आर्थिक जबाबदारी स्वीकारणाऱ्यांनी पाहायला शिकले पाहिजे.
- भारतात शेतसाऱ्याचे प्रमाण शेतकऱ्यांना न पेलणारे होते. त्यांच्यावर सक्ती होत असे. त्यामुळे शेतीचा विकास खुंटला.
- जकात दोन्ही प्रकारे वसूल केली जाई. देशांतर्गत तसेच परदेशी व्यापार व्यवहारातून त्यामुळे एका बाजूस व्यापाराचा कोंडमारा झाला, तर दुसऱ्या बाजूस उद्योगांची मुस्कटदाबी झाली. हा अनिष्ट परिणाम जकातीमुळे झाला.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, करपद्धती ही एक क्रूर चेष्टा होती. कारण समाजरूपी शरीराच्या ज्या भागात दाट रक्त असते तेथे सुरी चालवली जात नव्हती, तर जो भाग गरिबी आणि दुबलतेच्या यातना सोसत होता, नेमका तेथेच घाव बसत होता.
- इ.स.१८०९ ते १८५७ या वर्षामधील खर्चाचे पृथःकरण करून या गरीब देशाच्या उत्पन्नापैकी ५२ ते ८० टक्के खर्च युद्धसेवांवर; पण शिक्षणासाठी, लोकोपयोगी कामासाठी, रेल्वे, जलवाहतूक, सिंचनासाठी, कालवे इत्यादी बाबींवर खर्च करण्यासाठी तरतूद नाही.
- प्रांतांना दिलासा देण्यासाठी आयकर चालू ठेवणे न्याय्य झाले असते, परंतु भारत सरकारच्या वित्त मंत्रालयातून न्याय यापूर्वीच हद्दपार झाला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'ब्रिटिश भारतामधील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' या जगप्रसिद्ध ग्रंथातून वरीलप्रमाणे अनेक मुद्दे काढता येतील. हा ग्रंथ म्हणजे १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ काळातील ब्रिटिशांच्या आर्थिक, राजकीय आणि काही प्रमाणात सामाजिकही बारीकसारीक सर्व गोष्टींचा परामर्श आहे. रुपयाचा प्रश्न, त्याचे मूळ आणि समाधान हा प्रबंध लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये 'डॉक्टर ऑफ सायन्स' या पदवीसाठी लिहिला गेला होता. १९२१ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संशोधनाचे कार्य हातावेगळे केले आणि १९२३ साली प्रथम प्रसिद्ध झाले. नंतर १९४७ साली पुन्हा दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली. चलनपद्धती, ग्राम अर्थव्यवस्था, वस्तूची अदलाबदल करून व्यवहार चालविण्यापासून ते सोने-चांदी या धातूक चलन आणि आजचे कागदी चलन खात्यापर्यंत सांगोपांग, जिज्ञासू प्रवृत्तीने अभ्यास करून या शोधग्रंथात अचूक व विस्तृत मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात, ब्रिटिश राजवटीपूर्वी मोगल साम्राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा पाया अकबराने घातला. त्या काळापासून भारतात प्रामुख्याने चलन म्हणून सोने, चांदी किंवा धातूचा वापर होत असे. तसेच ब्रिटिशपूर्व राजवटीत नोकरांना आणि सैनिकांनाही वस्तुस्वरूपाने पगार मिळत असे. ब्रिटिशांनी त्याऐवजी रोख पैसे देण्यात सुरुवात केली. त्यामुळे लोकांकडून कर असो वा इतर रोख पैशाच्या स्वरूपातच स्वीकारावे लागत असे. डॉ. आंबेडकर यांचे तर्कनिष्ठ आणि दृढ मत होते की, जोपर्यंत रुपयाच्या सामान्य क्रयशक्तीमध्ये स्थिरता येत नाही, तोपर्यंत हे चलन स्थिर होणे शक्य नाही आणि प्रामुख्याने हीच बाब विनिमय प्रमापामुळे शक्य होत नव्हती. या व्यवस्थेमुळे रोगाच्या मूळ कारणांचा शोध घेण्याऐवजी फक्त लक्षणेच विचारात घेऊन उपाय केला जात होता. डॉ. आंबेडकर यांनी हे सुचवलेले विचार मूलगामी आहेत.

## पशूप्रेम

१९३३ च्या पूर्वी बाबासाहेबांचे वास्तव्य बी.आय.टी. चाळीत असताना त्यांनी हरीण पाळले होते. बाबासाहेबांच्या 'राजगृह' निवासस्थानी टॉबी नावाचा कुत्रा होता. सायंकाळी घरी परतताना ते



टॉबीसाठी जिलेबी आणत. घटना मसुदा समितीचे अध्यक्ष असताना त्यांनी 'कॉकर सॉनियल' जातीचा कुत्रा पाळला होता. त्याचे नाव पीटर होते. पीटरची सोबती मोनिका नावाची कुत्री होती. बाबासाहेबांना मोनिकाचा फारच लळा होता. ते तिला हाताने जेवण भरवीत. टॉबीचे निधन झाले, तेव्हा बाबासाहेब धाय मोकलून रडले होते. एकनिष्ठ पीटरने बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर एक महिन्याच्या आतच देह ठेवला....

(लोकराज्य एप्रिल २०१६मधून पुनर्मुद्रित)

Mrgabbharti_75000

**भारतीय आर्थिक समस्यांची उकल करण्यासाठी त्याचप्रमाणे भारतीय अर्थशास्त्रीय विचार विकसित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लक्षणीय कामगिरी केलेली आहे. जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांसारख्या सामाजिक व्याधींच्या आर्थिक परिमाणांच्या डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या मर्मभेदक पृथक्करणामुळे अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांची सांगड घालणारे ते एक अतुलनीय पंडित ठरतात, तर भारतीय आर्थिक विकासाच्या त्यांच्या योजनांमुळे ते भारतीय आर्थिक नियोजनाचे तज्ज्ञ म्हणून समोर येतात.**

# अर्थशास्त्र, समाजशास्त्राला नवे परिमाण!

**डॉ. नरेंद्र जाधव**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवी हक्क व लोकशाहीचे कडवे समर्थक होते. लोकशाहीची त्यांची संकल्पना सर्वसामान्यपणे राजकीय स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाच्या ज्ञात कल्पनेपेक्षा अधिक व्यापक होती. लोकशाहीच्या सामाजिक व आर्थिक बाजूंवर डॉ. आंबेडकर यांनी भर दिला आणि बजावले की, जर सामाजिक व आर्थिक लोकशाही नसेल, तर केवळ राजकीय लोकशाही यशस्वी होऊ शकणार नाही.

## लोकशाहीची व्याख्या

अनेक तत्त्वज्ञांनी तसेच समाजशास्त्र व राज्यशास्त्राच्या लेखकांनी केलेल्या लोकशाहीच्या व्याख्यांचा उल्लेख डॉ. आंबेडकर यांनी केला आहे. वॉल्टर बॅगहॉटची 'चर्चेद्वारे राज्यकारभार' (गव्हर्नमेंट बाय डिस्कशन) व अब्राहम लिंकनने सुचवलेली 'लोकांचे लोकांसाठी, लोकांकडून चालवले जाणारे राज्य' या दोन व्याख्यांची ते खास करून आठवण काढत. तथापि या रुळलेल्या व वारंवार सांगितल्या जाणाऱ्या व्याख्यांहून वेगळी 'रक्तपाताचा अवलंब न करता जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवणारी राज्यपद्धती' अशी ते लोकशाहीची व्याख्या करतात. यावरून दिसून येईल की, डॉ. आंबेडकर राजकीय लोकशाहीला केवळ एक अंतिम साध्य मानत नव्हते, तर त्यांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे एक अमोघ साधन म्हणून ते लोकशाहीकडे पाहत होते. सामाजिक व आर्थिक लोकशाही जणू काही राजकीय लोकशाहीच्या पेशी व तंतू असतात. पेशी व तंतू जेवढे मजबूत तेवढे शरीरही, असा डॉ. आंबेडकर यांना विश्वास होता. सामाजिक व आर्थिक लोकशाही नसेल तर राजकीय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही, या तत्त्वाचे आकलन न झाल्यामुळे अनेक ठिकाणी संसदीय लोकशाहीच कुचकामी ठरवण्यात आली आहे, असे ते म्हणतात.

मे १९५६ मध्ये डॉ. आंबेडकर यांनी व्हॉइस ऑफ अमेरिका या संस्थेने आयोजलेल्या एका संवाद मालिकेत 'भारतातील लोकशाहीचे भवितव्य' या विषयावर भाषण केले. त्यात ते म्हणाले, 'लोकशाही म्हणजे प्रजासत्ताक किंवा संसदीय सरकार नव्हे. लोकशाहीची मुळे सरकारी पद्धतीत, संसदीय किंवा दुसऱ्या कोणत्याही पद्धतीत नसतात.' डॉ. आंबेडकर पुढे म्हणतात, 'लोकशाही म्हणजे सहजीवनाने राहण्याची एक पद्धती. लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधात शोधावयाची असतात.' लोकशाहीचे कट्टर समर्थक असलेल्या डॉ. आंबेडकर यांच्यासमोर एक भव्य कॅनव्हास होता. या कॅनव्हासवर माणसामाणसांमधील राजकीय, सामाजिक व आर्थिक नात्यांचे



Mrgabharti_75000

मनोहर रंग एकमेकांत मिसळून त्यामधून ते सामाजिक-आर्थिक लोकशाहीचे स्वयंपूर्ण चित्र चितारू पाहत होते.

## सामाजिक-आर्थिक लोकशाहीसाठी अत्यावश्यक पथ्ये

राजकीय समता आणि विचार व कृतीचे स्वातंत्र्य या गोष्टी कुठल्याही लोकशाही समाजाच्या कोनशिला समजल्या जातात. तथापि डॉ. आंबेडकर यांनी केवळ राजकीय हक्कांशी लोकशाहीची बांधिलकी असू नये, तर सामाजिक व आर्थिकबाबतीत समान संधी हाच लोकशाहीचा खरा अर्थ असला पाहिजे, यावर भर दिला.

डॉ. आंबेडकर यांनी प्रतिपादन केले की, स्वातंत्र्याबरोबरच लोकांना देशाच्या सामाजिक व आर्थिक घडामोडीत भाग घेण्याची समान संधी मिळणार नसेल, तर त्या स्वातंत्र्याचाच नाश होईल. लोकशाही यशस्वीपणे राबवण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या बाबींचा विस्ताराने ऊहापोह करताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'पहिली अट म्हणजे, समाजात प्रकर्षाने जाणवणारी उच्चनीचता असू नये, समाजात दडपलेला वर्ग असू नये, समाजात शोषित वर्गही असू नये, सर्व सुखसोयींचा व सवलतींचा लाभ उठवणारा एक वर्ग व केवळ हालअपेष्टा सहन करणारा, ओझी वाहणारा दुसरा वर्ग अशी स्थिती समाजात असू नये. अशा परिस्थितीतच अशा विभागलेल्या सामाजिक रचनेत रक्तरंजित क्रांतीची बीजे असतात व लोकशाही अशा क्रांतीला पायबंद घालू शकत नाही. याच भाषणात डॉ. आंबेडकर यांनी भाकित केले की, 'समाजातील वेगवेगळ्या वर्गात असलेली ही खोल दरी लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीतील मोठा अडथळा ठरण्याची शक्यता आहे. लोकशाहीत जो जो दडपला गेला आहे त्याला, जो जो तुडविला गेला आहे त्याला, ज्यांचे हक हिरावून घेतले गेले आहेत त्यांना आणि ज्यांना ओझी वाहावी लागतात त्यांना, तसाच आणि तेवढाच मतदानाचा अधिकार असतो जेवढा 'आहे रे' वर्गाला असतो आणि 'आहे रे' वर्ग 'नाही रे' वर्गाच्या तुलनेत नेहमीच अल्पसंख्याक असतो. ज्या अर्थी आपण बहुमताच्या कौलाला निर्णायक म्हणून मान्यता दिली आहे, त्या अर्थी अशी शक्यता आहे की, जर अल्पसंख्य 'आहे रे' वर्गाने स्वयंस्फूर्तीने आणि आपणहून आपल्या विशेष सवलतीचा त्याग केला नाही, तर त्यांच्यातील आणि समाजाच्या खालच्या स्तरातील दरी वाढून लोकशाहीचा नाश होईल आणि तिच्या जागी भलतेच काहीतरी येईल. तुम्ही जर जगातील वेगवेगळ्या भागातील लोकशाहीचा इतिहास तपासलात तर या सामाजिक अटीच्या पूर्ततेच्या अभावी तेथील लोकशाही नष्ट झाल्याचे आढळून येईल, याविषयी माझ्या मनात तिळमात्रही शंका नाही.

दुसऱ्या एका ठिकाणी जगातील दुसऱ्या काही भागातील संसदीय लोकशाहीच्या अपयशाच्या कारणांची मीमांसा करता ते नमूद करतात की, 'अनेक देशांत संसदीय लोकशाहीने स्वातंत्र्याची आस निर्माण केली; परंतु समतेचे महत्त्व ओळखण्यात ती अपयशी ठरली आणि स्वातंत्र्य नि समतेमधील समतोल साधण्याचा तर तिने प्रयत्नच केला नाही. त्याचा परिणाम असा झाला की, स्वातंत्र्याने समता गिळंकृत केली व लोकशाही म्हणजे एक फार्स झाला.'

स्वातंत्र्याच्या तत्त्वासारखीच बंधुत्वाच्या तत्त्वाची स्थिती झाली. डॉ. आंबेडकर यांच्या मते 'बंधुता' हे लोकशाहीचेच दुसरे नाव होते. त्याचप्रमाणे सामाजिक जुलूम, जातीयवाद, वेठबिगार, वाईट वागणूक आणि असुरक्षितता हे सर्व लोकशाहीच्या स्थापनेला हानिकारक होते.

## न्यायाचा अभाव

'न्यायाचा अभाव' हा लोकशाहीच्या मार्गातील दुसरा एक अडथळा आहे, हेही डॉ. आंबेडकर यांनी ओळखले होते. त्यांच्या मते समाज जर वस्तुस्थिती आणि व्यवहार यांच्यात समतोल राखू शकला, तर न्यायाची अंमलबजावणी होऊ शकते. जर समाजाने वस्तुस्थितीला आदर्श समजण्याची चूक केली (उदा. - वेगवेगळ्या वर्गाचे अस्तित्व), तर न्यायाच्या तत्त्वाला बाधा येईल. म्हणूनच चातुर्वर्ण्यात अनुस्यूत असलेल्या सामाजिक व आर्थिक बंधनांना नाकारणे ही आर्थिक न्यायासाठी पूर्वअट आहे आणि आर्थिक लोकशाहीच्या प्राप्तीसाठीही ती एक अत्यावश्यक बाब आहे.

डॉ. आंबेडकर सांगतात की, 'लोकशाहीसाठी सार्वजनिक सद्सद्विवेकबुद्धीची आवश्यकता असते. त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, आपण दक्षिण आफ्रिकेतील भेदभावाबद्दल इतके बोलत असताना आपल्याला याचे भान असते का की, आपल्या इथे प्रत्येक खेड्यात एक दक्षिण आफ्रिका आहे ही वस्तुस्थिती आहे. जाऊन पाहा म्हणजे कळेल याचे कारण.. आपल्यात सार्वजनिक सद्सद्विवेकबुद्धीचा अभाव आहे. अन्यायामुळे भरडल्या जाणाऱ्या अल्पसंख्याकांना या अन्यायापासून सुटका करून घेण्यासाठी कुणाकडूनही मदतीचा हात मिळत नाही. यामुळेच क्रांतिकारी प्रवृत्ती बळावतात व लोकशाही धोक्यात येते.'

अशाप्रकारे सामाजिक व आर्थिक बाबींत समान संधी, भ्रातृभावावर आधारित समाजव्यवस्था, न्याय मिळण्याची खात्री व सार्वजनिक सद्सद्विवेकबुद्धी या डॉ. आंबेडकर यांच्या मनोराज्यातील सामाजिक आर्थिक लोकशाहीच्या उदयासाठी आवश्यक अशा पूर्वअटी होत.

## घटनात्मक खबरदारी

इ.स.१९४७ मध्ये डॉ. आंबेडकर यांनी घटना समितीला एक निवेदन सादर करून अनुसूचित जातीच्या रक्षणासाठी घटनेत


### मार्गदर्शक तत्त्वे

डॉ. आंबेडकर म्हणतात, आर्थिक लोकशाही अनेक मार्गांनी साध्य करता येईल, असा लोकांना विश्वास वाटतो. काही लोकांना आत्यंतिक व्यक्तिवाद हा आर्थिक लोकशाहीचाच सर्वोत्कृष्ट प्रकार आहे असे वाटते, तर काही लोकांना समाजवादी राज्यामुळेच आर्थिक लोकशाही येईल असे वाटते. आर्थिक लोकशाही साध्य करण्यासाठी साम्यवादी मार्ग हाच एकमेव मार्ग आहे; परंतु एखाद्या प्रवाही कल्पनेला असे बंदिस्त करणे बरोबर नाही (आर्थिक लोकशाही) ही एक मूलतः बदलत जाणारी संकल्पना आहे आणि परिस्थिती व कालानुरूप ती सतत बदलत असते. म्हणून आर्थिक लोकशाहीचा पाया घालण्यासाठी, सरकारी धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा भारतीय घटनेत अंतर्भाव करण्याचा त्यांनी आग्रह धरला.

Mrgabharti_75000

कोणत्या तरतुदी असणे आवश्यक आहे त्यासंबंधीची आपली मते मांडली. या निवेदनाचे शीर्षक होते, 'राज्ये आणि अल्पसंख्याक'. या निवेदनात संसदीय लोकशाही कायम ठेवण्याच्या आवश्यकतेवर भर देऊन, साध्या बहुमताने राज्य समाजवादाची अंमलबजावणी रोखून धरता येऊ नये, त्यात दुरुस्ती करता येऊ नये वा मुळातच ती रद्द करता येऊ नये, म्हणून राज्य समाजवादाची अंमलबजावणी राज्यघटनेद्वारा व्हावी, असे त्यांनी सुचवले.

केवळ या रितीनेच संसदीय लोकशाही कायम ठेवणे, समाजवादाची अंमलबजावणी करणे व हुकूमशाही टाळणे हे तिन्ही हेतू साध्य करता येतील, असे डॉ. आंबेडकर यांना वाटत असे. नंतर घटना समितीसमोर भाषण करताना डॉ. आंबेडकर यांनी सांगितले की, 'नवीन राज्यघटना निर्माण करण्यामागे दोन उद्दिष्टे होती. १) राजकीय



लोकशाहीची पद्धत रूढ करणे. २) आर्थिक लोकशाही हेच आपले उद्दिष्ट आहे, असे नमूद करणे व कुठलेही सरकार सत्तेवर असो, ते आर्थिक लोकशाही आणण्यास बांधिल राहील असे जाहीर करणे.' याप्रमाणे आर्थिक लोकशाहीची संकल्पना भारतीय राज्यघटनेत सुरुवातीपासूनच घट्टपणे रुजवण्यात आली होती.

अर्थातच सरकारी धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा घटनेत समावेश करणे आवश्यक असले, तरी सामाजिक-आर्थिक लोकशाहीच्या अंमलबजावणीसाठी तेवढेच पुरेसे नाही, याची डॉ. आंबेडकर यांना जाणीव होती. म्हणून राज्यघटनेचा स्वीकार करताना केलेल्या भाषणात त्यांनी ताकीद दिली की, '२६ जानेवारी १९५० रोजी आपण एका विसंवादी जीवनात प्रवेश करणार आहोत. आपल्यात राजकीय समता असेल; पण आर्थिक आणि सामाजिक जीवनात विषमता असेल. राजकारणात एक व्यक्ती एक मत व प्रत्येक मताची समान किंमत हे तत्त्व आपण मान्य करू; परंतु आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात आर्थिक धाटणीमुळे सर्व व्यक्ती समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारत राहू, असे विसंवादी जीवन आपण कुठपर्यंत जगत राहणार आहोत? किती काळ समानता नाकारत राहणार आहोत? फार काळ आपण तसे करीत राहू, तर राजकीय लोकशाही संकटात सापडेल. शक्य तितक्या लवकर हा विसंवाद दूर केला पाहिजे, नाहीतर या असमानतेचे बळी ठरणारे लोक राजकीय लोकशाहीचा डोलारा उद्ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाहीत.'

## डॉ. आंबेडकर यांचे आर्थिक तत्त्वज्ञान

भारतीय अर्थशास्त्रीय विचार आणि भारताचे अर्थशास्त्रीय प्रश्न यासंबंधी डॉ. आंबेडकर यांनी जे विविधांगी व व्यापक योगदान दिले, त्यामुळे त्या प्रश्नांचे नाजूक आंतरदुवे काहीसे अस्पष्ट झालेले आहेत आणि म्हणूनच त्यांच्या वरवर भिन्न भासणाऱ्या अंशदानात एक सूत्रबद्धता आहे, हे ध्यानात घेणे आवश्यक ठरते. खरे पाहता, एक अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ. आंबेडकर यांनी केलेल्या सर्व योगदानांमागे एक सुस्पष्ट व सुसंबद्ध आर्थिक तत्त्वज्ञान आहे.

## आर्थिक तत्त्वज्ञानाचे सार

डॉ. आंबेडकर यांच्या सर्वंकष आणि विविधलक्ष्यी अर्थशास्त्रीय कामगिरीमागील आर्थिक तत्त्वज्ञानाचा उलगडा होऊ शकतो. त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचे मूलसूत्र आहे 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय.' डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाला सामाजिक, धार्मिक आणि नैतिक अधिष्ठान आहे. शोषित आणि पीडित समाज हा त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वयत्रींचा; राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अशा व्यापक दृष्टिकोनातून हे तत्त्वज्ञान पुरस्कार करते. जाती, पंथ यांचा विचार न करता दीनदुबळ्यांना आधार देऊन सर्व भारतीयांसाठी स्वातंत्र्य, समता आणि न्याय प्रस्थापित करणे हा डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा मूलाधार आहे. प्रज्ञा, शील आणि करुणा यांवर आधारित, जातीविरहित, वर्गविरहित आणि लोकशाहीप्रणीत समाजाची निर्मिती हे डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचे अंतिम उद्दिष्ट आहे. डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांकडे दुर्लक्ष करून भारतीय समाजाने त्यांच्यावर अन्याय तर केलाच आहे; पण स्वतःचेदेखील अपरिमित नुकसान करून घेतले आहे. डॉ. आंबेडकर यांचे आर्थिक तत्त्वज्ञान हे काही विशिष्ट घटकांसाठी नव्हते, तर संपूर्ण देशाचे हित त्यांच्या डोळ्यांसमोर होते. त्यांना केवळ दलितांचे नेते मानणे हा या महान राष्ट्रनेत्याचा अपमान तर आहेच; परंतु ते या देशाचे दुर्दैवदेखील आहे. भारतीय अर्थकारणावर डॉ. आंबेडकर यांनी केलेले विद्वत्तापूर्ण लेखन-संशोधन; तसेच प्रत्यक्ष जनआंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी केलेले कृतिशील अर्थशास्त्रीय योगदान लक्षात घेतले, तर डॉ. आंबेडकर हे भारतातील अत्यंत श्रेष्ठ अर्थतज्ज्ञ होते, यात शंका उरत नाही.

(लोकराज्य एप्रिल २०१६ मधून पुनर्मुद्रित)

Mrgabharti_75000

समता न्याय एकात्मता

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

barti
Pursuit for Social Equality



* २० मार्च *

# महाड चवदार तळे सत्याग्रह



**नरेंद्र मोदी**
प्रधानमंत्री



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

## ९८ वा वर्धापन दिन

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन



**एकनाथ शिंदे**
उपमुख्यमंत्री

**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

**संजय शिरसाट**
मंत्री, सामाजिक न्याय

**माधुरी मिसाळ**
राज्यमंत्री, सामाजिक न्याय

आपले विनित

सुनील वारे (भा.रे.ले.से.)
महासंचालक, बार्टी, पुणे

ओमप्रकाश बकोरिया (भा.प्र.से.)
आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे

डॉ. हर्षदीप कांबळे (भा.प्र.से)
प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मुंबई

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन**


Mrgabharti_75000

R.N.I.No. 14140

आज़ादी का अमृत महोत्सव | महाराष्ट्र शासन | G20

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ







### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय **lokrajya2011@gmail.com** या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.

### अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध

संकेतस्थळ : **https://dgipr.maharashtra.gov.in**
आणि **https://mahasamvad.in**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

**प्रति / TO**

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**केशव करंदीकर**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक केशव करंदीकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा. लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई - ४०० ०११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह